## अनुक्रमणिका

**प्रस्तावना**

**महिलांसंबधित गुन्हे आणि कायदे**

**प्रकरण पहिले**

**<u>कौटुंबिक प्रकरणांशी संबंधित अधिकार व कायदे</u>**

कौटुंबिक हिंसचारापासून महिलांचे संरक्षण कायदा,२००५

पोटगीसंबधी अधिकार व हक्कं

मुलांचा ताबा व पालकत्वाचे अधिकार

वडीलोपार्जित संपत्तीतील समान अधिकार

**प्रकरण दुसरे**

**<u>आरोग्याशी संबंधित अधिकार व कायदे</u>**

वैद्यकीय गर्भपात कायदा,१९७१

गर्भधारणापूर्व व प्रसूतिपूर्व निदानतंत्र वापर (लिंगनिवडीस प्रतिबंधक) कायदा,१९९४

**प्रकरण तिसरे**

**<u>महिलांविरूद्धचे फौजदारी गुन्हे व कायदे</u>**

हुंडा प्रतिबंधक कायदा, १९६१

हुंडाबळी: कलम- ३०४(ब)

विवाहितेस क्रूर वागणूक: कलम- ४८९(अ)

**प्रकरण चौथे**

**<u>महिलांसंबंधी लैंगिक अत्याचाराचे गुन्हे आणि कलमे</u>**

बलात्कार: (कलम-३७६ आयपीसी)

विनयभंग: (कलम-३५४ आयपीसी)

महिलांसंबंधी विविध गुन्ह्यांचा संक्षिप्त तक्ता

## प्रकरण पाचवे

## नागरिकांची सनद आणि फौजदारी गुन्ह्यांची प्रक्रिया

महाराष्ट्र पोलिस दलाची रचना

नागरिकांचे अधिकार व पोलिसांची कर्तव्ये

नागरिकांनी तक्रार कोठे नोंदवावी

फिर्याद किंवा गुन्ह्याची नोंद

एफ.आय.आर (प्रथम दर्शनी माहिती अहवाल)

झिरो एफ.आय.आर

झडती

पंचनामा

अटक व आरोपीचे अधिकार

पोलिस कोठडी

न्यायालयीन कोठडी

जामीन व जामीनाचे प्रकार

दखलपात्रं व अदखलपात्रं गुन्हे

जामीनपात्रं व अजामीनपात्रं गुन्हे

तडजोडपात्रं व अतडजोडपात्रं गुन्हे

सेशन ट्रायल, मॅजीस्ट्रेट ट्रायल

वॉरंट ट्रायल, समन्स ट्रायल

समरी ट्रायल

फौजदारी खटल्यातील टप्पे

महिला अत्याचाराच्या घटनांबाबत पोलिसांची कर्तव्ये

## कौटुंबिक प्रकरणांशी संबंधित अधिकार व कायदे

## कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायदा २००५

**प्रस्तावना -**

**स्त्रियांचे सर्व प्रकारच्या भेदभावापासून संरक्षण करणारा आंतरराष्ट्रीय करार म्हणजे "कन्व्हेंशन ऑन एलिमिनेशन ऑफ ऑल फॉर्म्स ऑफ डिसक्रिमीनेशन अगेन्स्ट विमेन"** - ज्याला थोडक्यात सिडॉ असे म्हणतात. (CEDAW-Convention on Elimination of All Forms of Discrimination Against women). संयुक्त राष्ट्रसंघाच्या समितीने केलेल्या सर्वसाधारण शिफारशींनुसार सर्व सदस्य राष्ट्रांनी देशातील स्त्रियांचे सर्व प्रकारच्या भेदभाव व हिंसेपासून संरक्षण करण्यासाठी ठोस पावले उचलली पाहिजेत हे मान्य केलेल्या करारावर भारतानेही स्वाक्षरी केली असल्याने भारत सरकार भारतातील महिलांचे हिंसेपासुन संरक्षण करण्यास बांधील आहे.

तसेच भारतीय राज्यघटनेच्या-

कलम १४- समानतेचा हक्क -

कलम १५- भेदभावापासून संरक्षणाचा हक्कं

कलम २१- स्वातंत्र्याचा, जीविताचा तसेच सन्मानाने जगण्याचा हक्कं.

या हमी दिलेल्या हक्कांचे संरक्षण करणे ही शासनाची जबाबदारी आहे. त्याचेच फलित म्हणून २००५ मध्ये कौ. हिं. म. संरक्षण हा कायदा अस्तीत्वात आला आहे.

महिलांवर होणाऱ्या हिंसाचाराचे मूळ हे आपली पुरुषप्रधान मानसिकता, विविध धर्मातील धार्मिक-सामाजिक रूढी-१९८० च्या दशकात हुंड्यासाठी विवाहित .भेदावर आधारलेले आहे-परंपरा आणि त्यानुसार असणाऱ्या लिंग महिलांचा मोठया प्रमाणात छळ आणि त्यापायी खून आणि आत्महत्या झाल्याची हजारो उदाहरणे आपल्यासमोर .आहेतहा छळ थांबावा आणि आरोपींना शिक्षा व्हावी म्हणून भारतीय दंड विधांनाच्या कलम ४९८ मध्ये कलम '४९८अ -' ही विशेष तरतूद करण्यात आली .

अनेक अत्याचारग्रस्त महिलांना या कलमाने सासरच्या छळपासून मुक्त करत आरोपींना शासन केलेतसेच ., फौजदारी कायद्याच्या कलम १२५ नुसार, विवाहितेला पतीकडून पोटगी मिळण्याचा हक्कं प्राप्त झालाह्या दोन्ही संरक्षणात्मक . तरतुदींनी महिलांना दिलासा दिला असला, तरी आर्थिकदृष्ट्या महिला सक्षम नसल्यामुळे त्यांच्या जगण्याचे प्रश्न मात्र कायम राहिलेअखेर ., एकंदरीत सर्वच प्रकारच्या कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांच्या हक्कांचे संरक्षण करण्यासाठी आणि कौटुंबिक हिंसा पुर्णपणे थांबावी या उद्देशाने कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायदा २००५ अस्तीत्वात आलामहत्वाचे म्हणजे ., भारतीय दंड संहिता या कायद्याच्या अखत्याररीत येत नसलेल्या सर्व प्रकारच्या हिंसाचाराची दखल या कायद्याने घेतली आहे .

**उददेश**

- महिलेचे कुटुंबातील व्यक्तींकडून होणाऱ्या हिंसाचारापासून संरक्षण करणे.
- महिलांच्या मानवी हक्कांचे संरक्षण करणे.
- कुटुंबसंस्था ही महिलांच्या हिंसाचाराचे कारण न ठरता तेथे महिलांचा विकास होण्यासारखे भयमुक्त वातावरण उपलब्ध होणे.
- कुटुंबात महिलांच्या मान, सन्मानाची जपवणूक होणे.
- महिलांच्या आर्थिक, सामाजिक कौटुंबिक विकासाच्या दृष्टीने प्रयत्न होणे.
- आपल्या देशात पुरुषप्रधान संकृती असल्यामुळे महिलांवरील अन्याय अत्याचारात दिवसेंदिवस वाढ होत असल्याची दिसते. कुटुंबातील पुरुष व इतर माणसे त्याच घरातील एखाद्या महिलेवर अन्याय-अत्याचार करतात असे अनेक घटनांवरून दिसून येते. **कुटुंबियांकडून होणाऱ्या हिंसेपासून महिलांचे एका स्वतंत्र यंत्रणेद्वारे संरक्षण करणे व तिला न्याय मिळवून देणे, हा या कायद्याचा मुख्य उददेश आहे. तसेच, हा कायदा पुरुष विरोधी नाही तर हिंसेच्या विरोधात आहे. हा कायदा समानता, मानवता, न्याय आणि नैतिकता यांचे समर्थन करणारा आहे.**

- <u>**महत्वाच्या व्याख्या**</u>
  - **कौटुंबिक हिंसाचार** - कौटुंबिक हिंसाचार म्हणजे अशा सर्व कृती ज्या महिलेच्या मानसिक, भावनिक किंवा शारीरिक आरोग्य, सुरक्षितता, जीवितास व कल्याणास अपायकरक आहेत.
  - **पीडिता**- म्हणजे अशी महिला (१८वर्षा वरील) जी प्रतिवादी म्हणजेच जाबदेणार बरोबर कौटुंबिक नात्यात राहत आहे किंवा पूर्वी राहिलेली आहे आणि जिच्यावर प्रतिवादीने कौटुंबिक हिंसाचाराची कृती केली आहे.
  - **प्रतिवादी (जाबदेणार)**- म्हणजे जिचा पिडीत व्यक्तीशी कौटुंबिक नातेसंबंध आहे किंवा राहिला आहे आणि पिडीत व्यक्तीने जिच्या विरोधात कौटुंबिक हिंसाचाराची तक्रार दाखल केली आहे, अशी कोणतीही सज्ञान पुरुष व्यक्ती.
  - **कौटुंबिक नातेसंबंध**- म्हणजे जेव्हा दोन व्यक्ती रक्तच्या नात्याने, विवाहाने किंवा विवाहसदृश नातेसंबंधाने तसेच दत्तक नातेसंबंधाने सामायिक घरात एकत्र राहत असतील किंवा कोणत्याही वेळी एकत्र राहिले असतील किंवा संयुक्त कुटुंब म्हणून एकत्र कुटुंबाचे सदस्य असतील अश्या दोन व्यक्तीमधील नातेसंबंध.
  - **सामाईक घर**- म्हणजे ज्या घरात पिडीत व्यक्ती कौटुंबिक नातेसंबंधात एकटी किंवा प्रतिवादी बरोबर राहत असेल किंवा कधी राहिली असेल असे घर.

    -पिडीत व्यक्ती आणि उत्तरवादी यांची संयुक्त मालकी किंवा भाडेदारी तत्वावर असलेले घर.

    -पिडीत व्यक्ती किंवा उत्तरवादीचा किंवा त्या दोघांचा संयुक्तपणे किंवा एकट्याने कोणताही हक्कं, मालकी हक्कं, हितसंबंध किंवा समान अधिकार असेल असे घर.

    -पिडीत व्यक्ती आणि उत्तरवादी या दोघांपैकी कोणाही एकाची मालकी किंवा भाडेदारी तत्वावर असलेले घर.

    -उत्तरवादी ज्या कुटुंबांचा सदस्य आहे अशा संयुक्त कुटुंबाच्या मालकीचे घर.

    -अशा सामाईक घरामध्ये उत्तरावादीचा किंवा पिडीत व्यक्तीचा कोणताही हक्कं, मालकी हक्कं किंवा हितसंबंध असो अगर नसो असे घर.

- **मुल-** म्हणजे १८ वर्षाखालील कोणतेही मूल - स्वतःचे, दत्तक, सावत्र किंवा वाढवलेले मुल.

- **स्त्रि-धन-** म्हणजे 'मुलीचे आई-वडील, किंवा दोन्ही पक्षाकडील नातेवाईक, आप्त, मित्रपरिवार तसेच लग्नात उपस्थित असलेल्या कोणत्याही पाहुण्याने 'नवऱ्या मुलीला' दिलेल्या भेटवस्तू!' यामध्ये मुलीला भेट म्हणून दिले गेलेले घर, गाडी, सोने-चांदीचे लहान-मोठे दागिने, मौल्यवान वस्तु, रोख रक्कम किंवा तिच्या नावावरील आर्थिक गुंतवणूक, कपडे, भांडी-कुंडी, इतर कोणत्याही प्रकारच्या संसारोपयोगी वस्तु, इत्यादि प्रकारच्या संपत्तीचा समावेश होतो. या सर्व संपत्तीवर केवळ त्या विवाहित स्त्रिचाच अधिकार असतो. त्यामुळे स्त्रिधन पती किंवा त्याच्या आईवडिलांच्या ताब्यात असल्यास आणि वैवाहितेने मागितल्यास तिला परत न देणे गुन्हा ठरतो.

- **<u>या कायद्याची ठळक वैशिष्टे</u>**
    - कौटुंबिक हिंसेची स्पष्ट व्याख्या
    - स्त्रीला राहत असलेल्या घरातच राहण्याचा हक्कं
    - सासरी, माहेरी, व सामाईक घरात राहणाऱ्या प्रत्येक स्त्रीला कौटुंबिक हिंसेपासून सुरक्षित राहण्याचा अधिकार
    - हिंसाग्रस्त स्त्रियांच्या हक्कांची स्पष्ट यादी
    - विवाहांतर्गत होणारा बलात्कार या कायद्यांतर्गत गुन्हा
    - हिंसाग्रस्त स्त्रियांना मदत मिळवून देण्यासाठी संरक्षण अधिकाऱ्यांच्या नेमणुक
    - स्त्रियांच्या हक्कांच्या संरक्षणासाठी विविध आदेश देण्याचे न्यायदंडाधिकाऱ्यांना अधिकार
    - न्यायालयीन आदेशाचे पालन न केल्यास फौजदारी कारवाईची तरतूद
    - महिलेच्या वतीने तिचे हितचिंतक, आप्त, नातेवाईक, मित्रापरिवारातील सदस्य, शेजारी, संरक्षण अधिकारी स्वतः किंवा नोंदणीकृत सामाजिक संस्था तक्रार देवू शकतात.
    - नोंदणीकृत सामाजिक संस्थाना कौटुंबिक हिंसेच्या घटनांमधे हस्तक्षेप करण्याचा कायदेशीर अधिकार आहे.

- **<u>हिंसाचाराचे प्रकार -</u>**

हिंसाचार मुख्यतः चार प्रकार पडतात. शारीरिक, मानसिक-भावनिक-शाब्दिक, लैंगिक आणि आर्थिक!

प्रत्येक स्त्रीला म्हणजे रक्ताच्या, विवाहाच्या किंवा विवाहासारख्या नात्यामधील स्त्री, दत्तकत्वामुळे नात्यात असलेली, तसेच एकत्र कुटुंबात राहणारी कोणत्याही स्त्रीला या कायद्याची मदत घेता येते. वरीलपैकी कोणत्याही नात्यामधून स्त्रीच्या संपर्कात येणाऱ्या पुरुषाकडून तिच्यावर हिंसा झाली तर कायदा तिला संरक्षण देतो. याचा अर्थ सासरी, माहेरी, विवाहित, अविवाहित, एकट्या राहणाऱ्या अशा सर्वच स्त्रियांवर होणाऱ्या कौटुंबिक हिंसेची दखल या कायद्याने घेतली आहे.

| **<u>शारिरीक हिंसेतील कृती</u>** | **<u>मानसिक,भावनिक व शाब्दिक हिंसेतील कृती:-</u>** |
|---|---|
| • चिमटा काढणे<br>• ढकलणे<br>• ओढणे<br>• जोरजोरात हलवणे<br>• चापट मारणे<br>• चावणे<br>• लाथ मारणे<br>• बुक्की मारणे<br>• वस्तू फेकून मारणे<br>• नियोजनपूर्वक, ठरवून मारणे<br>• मुकामार लागेल असे मारणे<br>• मारलेले दिसणार नाही असे मारणे<br>• भिंतीवर, जमिनीवर आदळणे आपटणे (डोके इ.)<br>• हाड मोडणे<br>• अंतर्गत इजा पोचवणे<br>• गर्भपात होईल असे मारणे किंवा गर्भपात करण्याची कारणे निर्ईण होतील असे मारणे.<br>• एखादे शस्त्र किंवा घरातील वस्तूंचा शस्त्र म्हणून वापर करणे.<br>• वैद्यकीय उपचार घेण्यास मनाई करणे.<br>• बंदूक, चाकू, काठी इ. सारख्या हत्यारांचा धाक दाखवणे.<br>• कायमचे अपंगत्व येईल असे मारणे. | इतर सर्व हिंसेपेक्षा भावनिक हिंसेचे पिडीतेच्या मनावर दूरगामी आणि )<br>.(खोलवर परिणाम होतात<br>• हसणे, बोलणे, उठणे, बसणे, हसणे, रडणे, आवड-निवड, सवयी, चुका यावर विनोद (जोक्स) करणे,<br>• तिच्यावर नियंत्रण ठेवणे.<br>• सतत अपमानित करणे<br>• भावनांकडे दुर्लक्ष करणे<br>• शिक्षा म्हणून एखादी गोष्ट करण्यास मनाई करणे (जसे, बाहेर जाण्यास, बोलण्यास, जेवण्यास इ)<br>• मोठ्या आवाजात बोलून दबाव टाकणे<br>• वेडी, मूर्ख, बेअक्कल अशी विशेषणे लावणे<br>• अपमानित आणि अपराधी वाटेल असे कुटुंबातील किंवा बाहेरील व्यक्तींसमोर बोलणे.<br>• विनाकारण अंगावर ओरडणे, खेकसणे, कुत्सितपणे हसणे, बोलणे.<br>• पाणउतारा करणे, खच्चीकरण करणे.<br>• मंदबुद्धी किंवा स्लो आहे म्हणणे.<br>• अमुक एखादी गोष्ट, काम तिला जमणारच नाही म्हणून कमी लेखणे.<br>• कोणतेही नुकसान झाल्यास तिलाच दोषी ठरवणे<br>• पत्नी, आई, बहिण, प्रेमिका म्हणून तिची लायकी नसल्याचे बोलून दाखवणे.<br>• रंग आणि शारीरिक ठेवणीवरून टोमणे मारणे, टोचून बोलणे.<br>• एकटे पाडणे<br>• बोलणे थांबवणे |

| | |
|---|---|
| | • त्याच्या/त्यांच्या मनाप्रमाणेच वागावे असे बंधन घालणे<br>• आधीच्या प्रेमसंबंधावरून टोचून बोलणे<br>• मुलांवरून वारंवार अपमान करणे<br>• तिच्यासमोर मुलांना मारणे किंवा त्यांचा ताबा घेण्याची धमकी देणे.<br>• शारीरिक दुखापत करण्याची, बदला घेण्याची धमकी देणे.<br>• तुला माझ्या/आमच्यासोबत राहण्याशिवाय पर्याय नाही असे धमकावणे.<br>• स्वतःच्या किंवा मुलांच्या बचावासाठी एखादी कृती केल्यास तिलाच दोषी ठरवणे.<br>• तिच्या मनात असुरक्षिततेची भावना निर्माण करणे.<br>• ती गर्भनिरोधके वापरत असल्याचा आरोप करणे आणि ते इतरांना सांगणे. |
| **लैंगिक हिंसेतील कृती:-**<br>• पिडीतेसमोर लैंगिक संबंधावर विनोद करणे<br>• स्त्रियांकडे लैंगिक भूक भागवण्याची वस्तू म्हणून बघणे<br>• इतर महिलांच्या सौंदर्यावरून पीडीतेला अपमानित करणे<br>• तिच्या लैंगिक गरजांकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करणे<br>• संबंधाबाबत तिच्यावर सतत टीका करणे किंवा दबाव टाकणे<br>• किळस आणि अस्वस्थ वाटेल अश्या प्रकारे स्पर्श करणे<br>• लैंगिक संबंध ठेवणे थांबविणे<br>• लैंगिक संबंधाबाबत ती उदासीन असल्याची, तिची लायकी नसल्याची टीका करणे<br>• वेश्या तसेच इतर अपमानस्पद शब्द वापरणे<br>• वेश्याव्यवसाय करण्यास भाग पाडणे.<br>• शरीरसंबंधाची सतत मागणी करणे<br>• जबरदस्तीने गरोदर राहण्यास भाग पाडणे<br>• गर्भानिरोधाकांचा वापर करण्यास भाग पाडणे<br>• गर्भानिरोधके वापरू न देणे<br>• नवऱ्याने गर्भानिरोधाकांचा वापर न करणे.<br>• गर्भपात करावयास लावणे<br>• इतर महिलांसोबत संबंध ठेवणे | **आर्थिक हिंसेतील कृती -:**<br>• हुंडा घेणे किंवा देण्यास भाग पाडणे.<br>• माहेरून महागड्या वस्तू किंवा पैश्याची मागणी करत राहणे.<br>• घरखर्चाला पैसे न देणे (घरभाडे, किराणा इ.साठी)<br>• मुलांचा खर्च न करणे (दवाखाना, शाळा इ.)<br>• आर्थिक उत्पन्न तसेच आर्थिक गुंतवणूक लपवणे.<br>• खर्चाला दिलेल्या पैश्याचा हिशोब मागणे<br>• नोकरी, व्यवसाय करू न देणे, किंवा जबरदस्तीने करायला लावणे, किंवा सोडायला भाग पाडणे.<br>• नोकरी, कामाला बाहेर जात असल्यास चारित्र्यावर संशय घेणे.<br>• आर्थिक उत्पन्न स्वतःच्या ताब्यात ठेवणे.<br>• तिचे ए.टी.एम.कार्ड (ATM) किंवा पासबुक स्वतःच्या ताब्यात ठेवणे.<br>• दागिने हिसकावून घेणे किंवा परस्पर विकणे.<br>• तिच्यानावे कर्ज काढणे<br>• आधीचे कर्ज तिला फेडायला लावणे<br>• घरखर्चासाठी तिचा पगार वापरणे<br>• स्वतः न कमावता पत्नीच्या पगारावर जगणे, |

| | |
|---|---|
| • स्वतःचेच संबंध बघण्याची सक्ती करणे<br>• अश्लिल चित्रफिती बघत बसणे किंवा बघण्याची सक्ती करणे<br>• इतरांसोबत संबंध ठेवण्यास भाग पाडणे<br>• तिला किळस वाटेल किंवा त्रास होईल असे संबंध ठेवणे.<br>• मारझोड, भांडण, शिवीगाळ करून जबरदस्तीने लैंगिक संबंध ठेवणे.<br>• संबंध ठेवतांना वस्तू किंवा हत्यारांचा वापर करून तिला त्रास होईल असे वागणे. | व्यसन करणे.<br>• नातेवाईकांच्या लग्नकार्यात तिचे पैसे खर्च करणे. |
| **नियंत्रण ठेवण्यातील कृती**<br>• सतत संशयी दृष्टीणे पाहणे.<br>• कोणाशी बोलते, भेटते, पाहते यावर बारीक नजर ठेवणे.<br>• तिने कुणाला लिहीलेली किंवा तिला आलेली पत्रे फोडून वाचणे. (माहेरचे नातेवाईक,मैत्रिणी इ.)<br>• फोनवरील संभाषण जवळ उभे राहून किंवा चोरून ऐकणे.<br>• फोन हिसकावून घेणे व समोरून कोण बोलतंय हे तपासून बघणे.<br>• टीव्ही, रेडीओ, मोबाईल वापरू न देणे.<br>• बाहेरील जगाशी संपर्क तोडणे व घरात बसवणे.<br>• घराबाहेर जाण्या-येण्याच्या वेळा ठरवून देणे.<br>• त्याच वेळेत परत येण्याचे बंधन घालणे.<br>• घरातील कामाच्या वेळा ठरवून देणे.<br>• शेजाऱ्यांशी बोलू न देणे.<br>• शेजारी नातेवाईकांकडे जाऊ न देणे.<br>• लग्न- कार्यात सहभागी होवू न नेणे.<br>• भावना व्यक्त करण्याची परवानगी न देणे.<br>• भावना व्यक्त केल्यास तर उडवणे.<br>• रडून दुखः व्यक्त केल्यास त्यावर हसणे, लक्ष न देणे, शिवीगाळ करणे, इत्यादी.. | **धमक्या देण्याचे प्रकार**<br>• घर सोडून जाण्याची धमकी<br>• तिला घर सोडण्यास सांगणे<br>• घटस्फोट घेण्याची, स्वतःला इजा करून घेण्याची, तिला व मुलांना इजा करण्याची किंवा मारून टाकण्याची धमकी<br>• आत्महत्या करण्याची धमकी<br>• ती घर सोडून गेल्यास घरात न घेण्याची<br>• मुलांना भेटू न देण्याची<br>• प्रिय व्यक्तीस त्रास देण्याची धमकी (मुले, आईवडील इ.)<br>• दुसरे लग्न करण्याची<br>• दुसऱ्या महिलेला घरात आणण्याची धमकी इत्यादी... |
| **तिच्या मनात अपराधीपणाची भावना निर्माण करणे**<br>• स्वतःच स्वतःला दुखापत करवून घेणे आणि बायकोने मारल्याचे सांगणे.<br>• घरात घडणारी कोणतीही वाईट घटना | **फसवणूकीतील कृती**<br>• खोटे बोलणे<br>• दिलेला वचन, आश्वासने मोडणे.<br>• स्त्रीचे पैसे, दागिने, वस्तू चोरणे/लपविणे. |

| | |
|---|---|
| बायको/सुनेच्या पांढऱ्या पायामुळेच घडते असे आरोप करणे<br>● तिच्या भांडखोर किंवा वाईट स्वभावामुळे नवऱ्याला व्यसन लागल्याचा दोष देणे<br>● ती त्याच्या शारीरिक गरजा पूर्ण करण्यास असमर्थ असल्याचे हिणवणे.<br>● ती चांगली बायको, आई किंवा सून नाही म्हणून हिणवणे. | ● फसवून दारू पाजणे<br>● चोरीचा आरोप करणे<br>● खोटे बोलण्यास भाग पाडणे अविचाराने वागण्यास भाग पाडणे<br>● स्त्रीने मांडलेले मत मोडीत काढणे<br>● नैराश्य, हताशपणा येईल असे वागण्यास भाग पाडणे<br>● मुले तसेच कुटुंबातील इतरांपासून तोडणे<br>● गर्भनिरोधक वापरत असल्याचे नाटक करणे<br>● गरोदरपण लादणे<br>● ब्लॅकमेल करणे इ. |

## **महत्वाची कागदपत्रे आणि त्यांची सुरक्षितता**

नात्याच्या कोणत्याही टप्प्यावर असुरक्षित वाटत असेल तर खबरदारी म्हणून काही कागदपत्रांची जुळवाजुळव करणे आणि ती कागपत्रे सुरक्षित ठिकाणी ठेवणे अत्यंत गरजेचे असते. खालील लागदपत्रे तुमच्यावर झालेल्या अन्यायाविरुद्ध दाद मागण्यात महत्वाची भूमिका बजावतात. त्यामुळे शक्य तितकी कागदपत्रे गोळा करण्याचा व सुरक्षित ठेवण्याचा प्रयत्न करावा.

- लग्नपत्रिका
- लग्नातील विधींचे फोटो
- लग्नामध्ये, लग्नापूर्वी अथवा लग्नानंतरच्या समारंभात मिळालेल्या भेटवस्तू, आहेर, रुखवत इत्यादीची यादी, माहेरून मिळालेल्या वस्तू खरेदीच्या पावत्या.
- लग्न कार्यालयात झाले असल्यास कार्यालयाच्या भाड्याची, जेवणाच्या कंत्राटाची तसेच इतर खर्चाच्या पावत्या.
- लग्नाच्या निमित्ताने सासर किंवा माहेरच्यांनी घेतलेल्या अथवा लग्नापूर्वी आई-वडिलांनी केलेल्या, तुम्हाला दिलेल्या अथवा तुमच्या अंगावर असलेल्या दागिन्यांची यादी, दागिने खरेदीच्या पावत्या.
- सासरच्या घराची कागदपत्रे, शेतजमिनीचे उतारे, इतर काही स्थावर जंगम मालमत्तेची कागदपत्रे.
- घरातील माणसे तुमच्याशी सतत भांडणे करत असतील, पैशाची किंवा इतर वस्तूंची मागणी करत असतील, धमकी देत असतील तर सासंदर्भात तुम्ही केलेले मोबाईल रेकॉर्डिंग, कुणाला पाठवलेले मेसेज, पत्राने, चिठ्ठीने लिहून कळवले असल्यास ते रेकॉर्डिंग, मेसेजेस, पत्र, चिठ्ठी इत्यादी.
- तुमच्या जन्मतारखेचा पुरावा, शैक्षणिक कागदपत्रे.
- मुलांची जमातारिख तसेच इतर शैक्षणिक पुरावे, कागदपत्रे.

- तुमची किंवा मुलाची शस्त्रक्रिया झालेली असल्यास, वैद्यकीय उपचार चालू असल्यास, तसेच तुमच्या प्रसूती संदर्भातील कागदपत्रे, बिले.
- सासरचे रेशनकार्ड, मतदार यादी अशा कोणत्याही ठिकाणी तुमचे नवऱ्याबरोबर नाव नोंदवलेले असल्यास तो कागद, कार्ड.
- घरातील कोणत्याही लग्नपत्रिका, निमंत्रांपत्रिकेमध्ये तुमचे नवऱ्याबरोबर नाव नोंदवलेले असल्यास ती पत्रिका.
- तुमची किंवा नवऱ्याची नोकरी असेल तर त्याची कागदपत्रे, पगाराच्या पावत्या.
- बँक, पतसंस्था, फंड्स, बचतगट, नवऱ्याचे बँक स्टेटमेंट, आर्थिक गुंतवणूक केलेली असल्यास त्याची कागदपत्रे, पासबुक. इत्यादी.

## कागदपत्रांची सुरक्षितता.

- मिळालेल्या कागदपत्रांच्या झेरॉक्स प्रती काढाव्यात. शक्य असल्यास नोटरी, किंवा दंडाधिकाऱ्याची सही व शिक्का त्यावर असावा.
- प्रत्येक कागदपत्रांची एक प्रत स्वतःकडे सुरक्षित ठेवावी.
- मुळ कागदपत्रे तुमच्या माहेरी, संस्थेत, मैत्रिणीकडे किंवा तुम्हाला विश्वास आहे अश्या व्यातीकडे ठेवावीत.
- काही कागदपत्रे मिळविणे कठीण असते जसे, ७/१२ चा उतारा. तो न मिळाल्यास, जमिनीचा गट क्रमांक, जामीन बागायत आहे की जिरायत, किती आहे, किती लांबीचे तुकडे आहेत, पाण्याचा, हिस्सा कोणाला, किती आहे, वाटेकरी किती आहेत, जमिनीच्या चतुःसीमा कोणत्या इत्यादी माहिती बारकाईने लिहून ठेवा.
- नवऱ्याच्या नोकरीचे पगारपत्रक (सॅलरी स्लीप्स) असेल, तर जपून ठेवावी. नसेल, तर नवऱ्याच्या कामाच्या ठिकाणाचा पत्ता, ऑफिस, कंपनीचे नाव, मालकाचे नाव, पत्ता, फोन नंबर, पगाराची रक्कम, पगारातून कापल्या जाणाऱ्या रकमेचा तपशील, पगारातून परस्पर केलेली गुंतवणूक, इत्यादी तपशील लिहून वेळेवर सापडतील अश्या ठिकाणी व्यवस्थित लिहून ठेवावेत.
- ज्या व्यक्तीकडे कागदपत्रे दिली आहेत त्या व्यक्तीबद्दल कालांतराने तुम्हाला शंका आल्यास त्याच्याकडून कागदपत्रे कशी मिळवणार आणि कुणाकडे ठेवणार हा विचार त्या व्यक्तीच्या हातात प्रत्यक्ष कागदपत्रे देण्यापूर्वीच करायला हवा.
- शक्यतो महत्वाच्या कागदपत्रांचे दोन, तीन सेट्स बनवून विश्वासातल्या दोघा-तिघांकडे ठेवावेत.

**या कायद्यानुसार खालील महिलांना हिंसाचाराविरुद्ध दावा दाखल करता येतो-.**

- कमावती महिला
- अविवाहित महिला
- विवाहित महिला
- मुलगी
- आई
- बहीण
- नणंद
- सासू
- भाऊजय
- विधवा
- विवाहाशिवाय एकत्र राहणाऱ्या महिला (लिव्ह-इन नाते)

**<u>पीडित महिला खालील व्यक्तींविरुद्ध खटला दाखल करू शकते</u>**

- पती
- कुटुंबातील सज्ञान पुरुष
- विवाहितेच्या नवऱ्याचे नातेवाईक
- विवाहाशिवाय एकत्र राहणाऱ्या महिलेचा सहकारी तसेच त्याचे नातेवाईक

**<u>महत्वाचे न्यायालयीन आदेश</u>**

पिडित महिलेने खटला दाखल केल्यास तिच्यावरील हिंसा रोखण्यासाठी न्यायालय खालील प्रकारचे आदेश त्वरित स्वरुपात देवू शकतं.

- **सुरक्षा आदेश (कलम १८) -** हिंसाग्रस्त/पिडीत स्त्री तसेच तिच्या मुलांच्या सुक्षेसाठी या आदेशानुसार न्यायदंडाधिकारी हिंसा करणाऱ्या व्यक्तीवर पुढील प्रकारची बंधने आणू शकतात.

➢ हिंसाग्रस्त स्त्री तसेच तिच्या मुलांना कोणत्याही प्रकारे त्रास न देणे.

➢ हिंसा करण्याची/ त्रास देण्याची धमकी न देणे.

➢ इतर कुणामार्फत त्रास न देणे/हिंसा घडवून न आणणे.

- पिडीत स्त्री किंवा तिच्या मुलांशी पत्रं, फोन किंवा प्रत्यक्ष भेटून संपर्क साधण्याचा प्रयत्न न करणे.
- तिच्या साधन संपत्तीपासून तिला न तोडणे
- न्यायालयीन आदेशाशिवाय कोणत्याही प्रकारची स्थावर साधन संपत्ती न विकणे
- तिला मदत करणाऱ्या किंवा तिच्यावर अवलंबून असणाऱ्या इतरांना त्रास न देणे.
- एकत्र किंवा स्वतंत्र नावावर असेलेली बँकेतील रक्कम, दागिने याची विल्हेवाट न लावणे.

- **निवारा आदेश (कलम १९) -**

    - खटला दाखल केला त्यावेळी पिडीत स्त्री ज्या घरात राहत असेल अशा कोणत्याही (सामाईक, स्वतंत्र, भाडेतत्वावरील) घरातून बाहेर न काढण्याचा आदेश.
    - सदर घरात तिला किंवा तिच्या मुलांना कोणताही त्रास न देण्याचा आदेश
    - स्त्री राहत असलेल्या घराचे वापराबाबतचे किंवा इतर कोणतेही हक्कं इतर कोणालाही देण्यास किंवा त्यासंबंधी कोणताही निर्णय घेण्यास मनाई
    - स्त्री राहत असेलेले घर अपिरीहार्य कारणामुळे तिला सोडावे लागणार असेल, तर तिची राहण्याची योग्य ती पर्यायी व्यवस्था करण्याचे पुरुषाला आदेश.
    - स्त्रीवर होणाऱ्या हिंसेची तीव्रता लक्षात घेवून आवश्यकता वाटल्यास पुरुषाला घराबाहेर राहण्याचा आदेश
    - पिडीता हिंसा करणाऱ्या इतर स्त्रियांच्या विरोधातही  तक्रार देवू शकते. परंतु, प्रत्येक स्त्रीला राहत्या घरामध्ये सुरक्षित राहण्याचा अधिकार कायद्याने दिला असल्यामुळे हिंसा करणाऱ्या स्त्रीला त्या घरातून बाहेर जाण्याचा/काढण्याचा आदेश देता येत नाही.

- **पोटगी आदेश (कलम २०) -** खटल्यातील व्यक्तींचे राहणीमान लक्षात घेवून न्यायालय पुढील कारणांसाठी आर्थिक तरतुदीचा आदेश देवू शकते-

- स्त्रीच्या उदरनिर्वाहासाठी,
- मुलांच्या उदरनिर्वाह आणि आरोग्य,शिक्षण इ. साठी
- घरभाडे, घरखर्चासाठी,
- औषोधोपचारासाठी
- स्त्रीच्या संपत्तीचे झालेले नुकसान, तोडफोड इत्यादीच्या दुरुस्तीसाठी

- **<u>मुलांच्या ताब्याचा आदेश</u> (कलम २१) –**

➢ न्यायदंडाधिकारी खटल्यातील गांभीर्य लक्षात घेवून खटला सुरु असेपर्यंत मुलाचा/मुलांचा ताबा स्त्रीकडे देवू शकतात.

➢ वडिलांना मुलांना भेटण्याची परवानगी द्यायची की नाही हे मुलांचे हित लक्षात घेवून न्यायदंडाधिकारी ठरवतात.

➢ परंतु, मुलांचा कायमस्वरूपी ताबा मिळवण्यासाठी कौटुंबिक न्यायालयात स्वतंत्र खटला दाखल करावा लागतो.

- **<u>नुकसान भरपाईचा आदेश</u> (कलम २२)-**

  ➢ पिडीतेवर झालेल्या हिंसेमुळे तिचे जे काही शारीरिक व मानसिक नुकसान झालेले असते, त्याची भरपाई करण्याचा आदेश.

  ➢ आधी पोटगीचा (कलम २०) आदेश दिला असेल तरी हा आदेश न्यायालय देवू शकते.

- **<u>एकतर्फी अंतरिम आदेश</u> (कलम २३)-**

  **<u>स्त्रीवर हिंसा झाली आहे आहे आणि यापुढेही होवू शकते याची खात्री पटल्यास</u>** न्यायदंडाधिकारी वरीलपैकी कोणत्याही बाबतीत एकतर्फी अंतरिम आदेश देवू शकतात. हिंसा करणारी व्यक्ती न्यायालयामध्ये गैरहजर असली तरीही न्यायदंडाधिकारी असा आदेश देवू शकतात.

| न्यायालयाचे आदेश | कलम | उद्देश |
|---|---|---|
| सुरक्षा आदेश | कलम १८ | पीडितेवर होणारी हिंसा ताबडतोब थांबवणे |
| निवारा आदेश | कलम १९ | राहत्या घरातून बाहेर न काढण्याचा किंवा राहण्याची स्वतंत्र व्यवस्था करणे. |
| पोटगीचा आदेश | कलम २० | पतीकडून पत्नी व मुलांच्या उदरनिर्वाहाची व्यवस्था करणे |

| | | |
|---|---|---|
| मुलांच्या ताब्याचा आदेश | कलम २१ | ५ वर्षाआतील मुलांचा तात्पुरता ताबा निर्विवाद आईला मिळणे. त्यावरील वयाच्या मुलांबाबत न्यायालय निर्णय घेत. |
| नुकसान भरपाईचा आदेश | कलम २२ | हिंसेमुळे झालेल्या शारीरिक-मानसिक नुकसानासाठी आर्थिक मदत मिळणे. |
| एकतर्फी अंतरिम आदेश | कलम २३ | खटल्याच्या गांभिर्यानुसार वरील पैकी कोणतेही एकतर्फी आदेश मिळणे. |

- **न्यायलयीन आदेशाचे पालन न करणे हा गुन्हा (कलम ३१) –**

  - न्यायालयाने दिलेल्या सुरक्षा आदेशाचे जाबदेणाऱ्याने पालन न केल्यास/ उल्लंघन केल्यास दखलपात्र व अजामीनपात्र गुन्हा दाखल होवू शकतो.
    **शिक्षा-** १वर्षापर्यंत तुरुंगवास किंवा २०,००० रु. (वीस हजार) पर्यंत दंड किंवा दोन्ही, अशी शिक्षा होवू शकते.

**कायद्याच्या अमलबजावणीची यंत्रणा -**

**संरक्षण अधिकारी-** 'संरक्षण अधिकारी' हे या कायद्याच्या अंमलजवणीच्या केंद्रस्थानी आहेतप्रत्येक तालुक्याच्या . तसेच जिल्ह्याच्या ठिकाणी मुख्य संरक्षण अधिकारी .ठिकाणी तालुका संरक्षण अधिकारी यांची नियुक्ती केलेली आहे .यांचे ऑफिस असते

**संरक्षण अधिकारी यांच्या जबाबदाऱ्या पुढीलप्रमाणे आहेत -**

- कौटुंबिक हिंसाचाराची तक्रार आल्यास संबंधित व्यक्तीस या कायद्याची संपूर्ण माहिती देणे.
- महिलेच्या इछेनुसार 'कौटुंबिक घटना अहवाल' (डी.आय.आर) भरून घेणे.
- न्यायालयात खटला/अर्ज दाखल करण्यासाठी महिलेस सर्वतोपरी मदत करणे.
- हिंसा करणाऱ्यांना न्यायलयीन नोटिस बजावून सुनावणीसाठी हजर राहण्यास सांगणे.

- महिलेस आवश्यकता असल्यास मोफत विधीसाहाय्य (वकील) उपलब्ध करून देणे.
- पीडित महिलेच्या गरजेनुसार सुरक्षा गृह, वैद्यकीय सेवा, समुपदेशन सेवा मिळवून देणे तसेच यासाठी लागणारी वाहनव्यवस्था उपलब्ध करून देणे.
- हिंसाचाराच्या गांभिर्यानुसार पोलिसांची मदत मिळवून देणे.
- न्यायालयाच्या आदेशानुसार मुलांची भेट तसेच ताबा मिळवून देण्यात मदत करणे.
- न्यायालयाच्या आदेशानुसार पीडित महिलेस तिच्या राहत्या घराचा तसेच घरातील वस्तु, दागिने, कागदपत्रे इ. मिळवून देण्यात मदत करणे.
- न्यायालयाच्या आदेशाचा भंग झाल्यास जाबदेणाराविरुद्धं फौजदारी गुन्हा दाखल व्हावा म्हणून महिलेच्या वतीने न्यायालयात अर्ज दाखल करणे.
- कौ.हिंसाचाराच्या प्रकरणांमध्ये वेळोवेळी न्यायालयास मदत करणे.
- पीडितेच्या राहत्या घराची, जाबदेणाऱ्यांच्या आर्थिक, स्थावर मालमत्तेची न्यायालयाच्या आदेशानुसार चौकशी करणे.
- पीडित महिला प्रत्यक्ष संरक्षण अधिकाऱ्याकडे पोहचू शकत नसल्यास किंवा इतर कोणत्याही स्त्रोतांकडून हिंसाचाराची माहिती मिळाल्यास सदर ठिकाणी प्रत्यक्ष जावून भेट देणे, अहवाल तयार करणे आणि आवश्यकतेनुसार न्यायालय किंवा पोलिसांना कळवणे.
- या कायद्याची माहिती सर्व स्तरातील महिलांपर्यंत पोचवण्यासाठी जागृतीपर कार्यक्रम घेणे.

**सेवाभावी संस्था, कायदेशीर मार्गदर्शन केंद्रे -** पीडित महिलेला मदत करण्याचे अधिकार काही सेवाभावी संस्था (महिला प्रश्नांवर काम करणाऱ्या एनजीओ) तसेच कायदा मार्गदर्शन केंद्रे यांना देखील आहेत. अशा संस्थादेखील महिलांना योग्य मार्गदर्शन करण्यापासून न्यायालयीन मदत मिळवून देण्यापर्यंत सर्वतोपरी सहकार्य करण्यास सक्षम असतात. परंतु, त्यांची महिला व बालविकास खात्याकडे अधिकृत नोंदणी आहे की नाही हे तपासून बघावे. नोंदणी नसल्यास फसवणूक होण्याची शक्यता असते.

**कौटुंबिक घटना अहवाल किंवा डी.आय.आर म्हणजे काय?**

कौटुंबिक हिंसाचाराची तक्रार आल्यास पीडित महिलेवर झालेल्या हिंसाचाराची जी माहिती नोंदवून घेतली जाते त्याला **कौटुंबिक घटना अहवाल** म्हणतात. यामध्ये महिलेवर झालेल्या मानसिक,भावनिक, आर्थिक, लैंगिक, तसेच शारीरिक हिंसाचाराची संपूर्ण माहिती असते. घडलेल्या हिंसाचाराच्या बारीक-सारिक नोंदी या अहवालात होणे आवश्यक असते. त्यासाठी पीडित महिलेने संरक्षण अधिकारी, सेवाभावी

संस्थेचे तसेच कायदा सल्ला केंद्राचे प्रतींनिधी यांच्यापासून काहीही न लपवता, न घाबरता योग्य माहिती पुरवणे अपेक्षित असते.

**कार्यकर्त्यांसाठी आवश्यक सूचना-** आपण काम करत असलेल्या समाजाच्या रूढी,परंपरा त्यातील महिलांचे स्थान, सामाजिक आर्थिक परस्थिती यानुसार कार्यकर्त्याने नेमके काय पाऊल उचलावे हे ठरवावे लागेल.

- ➢ सर्वप्रथम महिलेशी बोलून हिंसाचाराची घटना आणि त्यामागची कारणे माहीत करून घेणे.
- ➢ महिलेस कायद्याची माहिती देणे तसेच तिच्यात आत्मविश्वास निर्माण होण्यासाठी प्रयत्न करणे.
- ➢ हिंसाचार करणाऱ्यांना हा कायदा आणि त्याचे परिणाम याची जाणीव करून देणे.
- ➢ हिंसाचार करणाऱ्या व्यक्तींशी बोलून काही सामोपचाराचा मार्ग निघतो का ते बघणे.
- ➢ हिंसा थांबत नसल्यास पोलिसांची मदत घेणे.
- ➢ एफआयआर दाखल करण्याची आवश्यकता असल्यास सविस्तर घटना, वापरलेलं हत्यार/ हत्यारं, ठिकाण,वेळ, घटनेशीसंबंधित व्यक्तींची संपूर्ण माहिती, पत्ता, व्यवसाय, इ. ची सखोल देण्यास पीडितेला मदत करणे तसेच कायद्यातील आवश्यक कलमे इ. ची योग्य नोंद झाली आहे की नाही, याची खात्री करूनच एफआयआरवर पीडितेची सही/अंगठा देणे.
- ➢ न्यायालयात खटला/अर्ज दाखल करायचा असल्यास पीडित महिलेस संरक्षण अधिकारी यांचेपर्यंत घेवून जाणे तसेच खटल्यासंबंधी आवश्यक कागदपत्रे/पुरावे मिळवण्यात मीहिलेस मदत करणे.
- ➢ कौटुंबिक हिंसाचाराची दखल घेण्यास पोलिस टाळाटाळ करू शकतात. याबाबत वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांकडे तक्रार नोंदवता येते.

**कोणत्याही महिलेला निर्विवादपणे हिंसमुक्त जीवन जगण्याचा हक्कं बजावता यावा हा या कायद्याचा मुख्य उद्देश आहे. हिंसा करणाऱ्या व्यक्तिला पहिल्यांदा स्वत:चे वर्तन सुधारायची संधी दिली जाते. न्यायालयाचा आदेश मिळाल्यानंतरी जर हिंसक वर्तन थांबले नाही तर शिक्षा होवू शकते.**

## आपल्या भागातील महत्वाचे फोन क्रमांक आणि पत्ते

- **राज्य महिला हेल्पलाईन - १८१**
- **जिल्हा महिला बाल विकास कार्यालय** ....................

- **<u>तालुका संरक्षण अधिकारी कार्यालय</u>** ...........................
- **<u>जिल्हा संरक्षण अधिकारी कार्यालय</u>**
- **<u>संरक्षण अधिकारी मोबाईल</u>** ........................
- **<u>अधिकृत सेवाभावी/सामाजिक संस्था</u>** ..................................
- **<u>स्थानिक पोलीस कार्यालय</u>** ..............................
- **<u>वन स्टॉप सेंटर</u>** ................................

## तक्रार दाखल करण्याचे मार्ग व पिडीतेचे अधिकार

स्त्री



अधिकारांविषयी जनजागृती करणे.
DIR भरून कोर्टात खटला दाखल करणे.
पिडीतेस आवश्यक त्या सेवा – सुविधा पुरवणे.

न्यायदंडाधिकारी

खटला दाखल झाल्यावर गरजेनुसार मोफत विधिसेवा/वकील मागता येतो.

वकिलामार्फत वैयक्तिक पातळीवर खटला दाखल करता येतो.

योग्य ते आदेश/निर्णय देणे

## पोटगीसंबंधीचे अधिकार आणि कायदे

**प्रस्तावना -**

भारतीय कुटुंबपद्धतीच्या इतिहासात डोकावलं तर फारच थोड्या महिला आर्थिकदृष्ट्या स्वतंत्र असल्याचे दिसून येते. एकीकडे काही मोजक्याच महिला ह्या कुटुंबाप्रमुख किंवा राज्यकर्त्या म्हणून ओळखल्या गेल्या तर दुसरीकडे समाजाने अगणित महिलांना 'बाईने केवळ घर सांभाळायचे आणि पुरुषाने अर्थार्जन करायचे' ह्याच पारंपरिक विचारसरणीत बांधून ठेवले. आयुष्याच्या अखेरपर्यंत केवळ चूल आणि मूल यामध्येच गुरफटल्या गेल्यामुळे, शिक्षण आणि आर्थिक स्वावलंबन या विचारापासून त्या कायमच्या दूरच राहिल्या. तसेच, पूर्वी सासर-माहेरच्या संपत्तीतही त्यांना वाटा मागण्याचा हक्क समाजाने दिला नसल्याने उदरनिर्वाहासाठी त्या पूर्णत: पती व कुटुंबावरच अवलंबून होत्या. थोडा विचार केला तर लक्षात येईल की आजच्या काळातही महिलांची हीच परिस्थिति आहे. मुली शिकून स्वावलंबी बनत असल्या, तरी आपल्या समाजव्यवस्थेमध्ये मुलीची मानसिकता 'सासरी जावून सासरच्यांसाठी चोवीस तास उपलब्ध असणारी' अशीच जाणीवपूर्वक घडवली जाते. लग्नापूर्वी उत्तम नोकरी करणाऱ्या कित्तेक मुली पतीच्या सांगण्यावरून नोकरी सोडून घरातील लोकांचे हवे नको ते करणे यालाच करियर म्हणून निवडतात आणि आर्थिकदृष्ट्या पतीवर अवलंबून जगतात. मुळात कौटुंबिक जबाबदारी सांभाळणं ही आर्थिक उत्पन्न देणारी बाब नसल्यामुळे या श्रमाला सामाजिक प्रतिष्ठा नाही. त्यामुळे आर्थिकदृष्ट्या पतीवर अवलंबून असलेल्या महिलेचा शारीरिक-मानसिक छळही होत असला, तरी ती सहजपणे घरातून बाहेर पडू शकत नाही, हे सासरकडील लोकांना चांगलेच ठावूक असते. तसेच, घराबाहेर असुरक्षित आयुष्य जगण्यापेक्षा कौटुंबिक छळ सहन करत जगणं आजही महिलांना सुरक्षित वाटतं. शिवाय पती किंवा सासकडील लोकांनी तिला घराबाहेर हाकलणे, तिने स्वतःहून घर सोडावे म्हणून तिचा छळ करणे, नवऱ्याने सोडून जाणे किंवा दुसरे लग्नं करणे असा काही प्रसंग घडला, तर तिला तसेच तिच्या मुलांना उदरर्निर्वाहासाठी कुणापुढेही हात पसरावे लागू नये म्हणून पोटगीचा कायदा सक्षमपणे महिलांच्या सोबत आहे.

**उद्देश-**

कायदेशीर संरक्षणामुळे महिलांना हळूहळू स्वतःच्या हक्कांची जाणीव होत आहे व आता त्या आपले हक्कं मागू लागल्या आहेत. आर्थिकदृष्ट्या घरातील करत्या पुरुषावर अवलंबून असलेली पत्नी, आविवाहित मुली, आई-वडील, लग्नासारख्या नात्यातील (लिव्ह इन) महिला, लहान लहान मुले अशा सर्वांना हिंसाचारमुक्त आयुष्य मिळावे तसेच, जीवन जगण्यासाठी आवश्यक असणारी आर्थिक सुरक्षितता मिळावी यासाठी कायद्यात पोटगीची तरतूद करण्यात आलेली आहे.

पोटगी मागण्याची तरतूद वेगवेगळ्या कायद्याअंतर्गत केलेली आहे. 'हिंदू विवाह कायदा-१९५५', 'हिंदू दत्तकविधान आणि उदरनिर्वाह कायदा-१९५६', 'विशेष विवाह कायदा-१९५४', फौजदारी प्रक्रिया संहितेचे 'कलम १२५', 'कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे सरक्षण कायदा-२००५' या कायद्यांमध्ये पोटगीच्या विशेष तरतुदी दिलेल्या आहेत.

या कायद्याअंतर्गत पोटगी मंजूर करताना ज्या पुरुषाकडे पोटगी मागायची आहे ती व्यक्ती पोटगी देण्यासाठी सक्षम असणे किंवा त्याच्याकडे उदरनिर्वाहाची पुरेशी साधने असणे आवश्यक आहे.
याबरोबरच, जी व्यक्ति पोटगी मागते तिची आर्थिक स्थिति कशी आहे व तिच्याकडे उदरनिर्वाहाची साधने काय आहेत किंवा नाहीत याचाही न्यायालय पूर्ण विचार करून निर्णय देतं.

पूर्वी पोटगीची रक्कम काय असावी याचे निकष आधी ठरलेले होते. परंतु,
आताच्या कायदेबदलांनुसार हा निकष आता लागू होत नाही. पोटगी मागणाऱ्याच्या आणि देण्याऱ्याच्या गरजा, राहणीमान, उत्पन्न आणि प्रतिष्ठा याचा विचार पोटगीची रक्कम ठरवताना विचार केला जातो. कारण,कायद्याने पोटगी हा हक्कं म्हणून मान्य केलेला आहे.

**'विशेष विवाह कायदा-१९५४ व फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम १२५ मधील तरतुदी या धर्मनिरपेक्ष आहेत. म्हणजेच कोणत्याही धर्मातील महिलांना या कायद्यांतर्गत पोटगी मागता येते.**

**कायदेशीर दृष्ट्या पोटगी म्हणजे काय?**

पोटगी म्हणजे, कौटुंबिक न्यायालयाच्या निर्णयानुसार घरातील कमावत्या व्यक्तीवर अवलंबून असलेल्यांना आपल्या मूलभूत गरजा भागवण्यासाठी आणि योग्य दर्जाचे आयुष्य जगण्यासाठी देण्यात येणारा खर्च होय. हा खर्च कमावत्या व्यक्तीच्या उत्पन्नातून दिला जातो. यामध्ये खाणे, राहणे (घरभाडे असल्यास), जीवनावश्यक प्रवास करणे, आरोग्य तसेच शिक्षणासाठी येणारा खर्च याचा समावेश होतो.

सामाजिक न्यायाच्या नियमांनुसार पत्नी, मुले आणि आईवडील यांना लागणाऱ्या खर्चाची तरतूद करणे हे घरातील कमावत्या पुरुषाचे कर्तव्य आहे व ते देणे कायद्याने बंधनकारक आहे.

**पोटगी मागण्याचा अधिकार कोणा-कोणाला आहे?**

- कायदेशीर पत्नी,
- घटस्फोट झालेली परंतु दूसरा विवाह न केलेली महिला
- १८ वर्षे वयाच्या आतील कोणतेही मुल (कायदेशीर लग्नातून झालेली किंवा लिव्ह इन नात्यातून जन्मलेले)
- अविवाहित प्रौढ मुली,
- वयोवृद्ध नैसर्गिक पालक
- दत्तकविधानाद्वारे झालेले पालक
- विधवा सावत्र आई (जर तिला स्वतःचे मुलगा-मुलगी नसतील तर)

- १८ वर्षे वयाच्या वरील कोणतेही शारीरिक किंवा मानसिक व्यंग असललेले किंवा शिक्षण घेत असलेले मूल
- लग्न झालेली परंतू १८ वर्षा आतील मुलगी जिच्या पतीचे उत्पन्न अपुरे पडत असेल तर. (परंतू, अशी पोटगी ठराविक काळापर्यंच मागता येते).
- लग्नासारख्या नात्यातील महिला (इतर कुणाशी लग्नबंधनात नसल्यास)

वरीलपैकी कुणीही जर आर्थिक दृष्ट्या सक्षम नसतील, तसेच त्यांच्याकडे उत्पन्नाचे कोणतेही साधन नसेल किंवा काम करण्यास ते सक्षम नसतील, किंवा ते कमवत असलेल्या रक्कमेत त्यांचा खर्च भागात नसेल तर कायद्याने पोटगी मागता येते.

परंतू, कोणतेही सबळ कारण नसतांना पत्नी पतीला सोडून गेली आणि तसे न्यायालयात सिद्धं झाल्यास तिला पोटगी मिळत नाही.

**कोण-कोणत्या कायद्या आणि कलामंतर्गत पोटगी मागता येते?**

१. **फौजदारी कायदा १९७३च चे कलम १२५-** या कलामांतर्गत वर उल्लेख केलेल्या सर्व व्यक्तींना पोटगी मागता येते. महत्वाचे म्हणजे हे कलम सर्व धर्मातील व्यक्तिला लागू आहे. त्यामुळे वैयक्तिक कायदे असलेल्या धर्मातील व्यक्तींनाही त्यांच्या धर्मातील काही नियम पाळून या कलमा नुसार पोटगी मागण्याचा अधिकार आहे.
**कलम १२५ हे एक स्वतंत्र कलम आहे. त्यामुळे इतर कोणत्याही कायद्या-कलामांतर्गत पोटगीचा दावा सुरू असला किंवा आधी कोणत्याही कलमानुसार पोटगी मिळालेली असली तरी या कलमानुसार स्वतंत्र दावा दाखल करण्याचा अधिकार आहे.**

२. **हिंदू विवाह कायदा १९५५** – हा कायदा हिंदू, बौद्ध, शीख आणि जैन धर्मियांनादेखील लागू आहे) या नुसार,
**कलम२४-** पत्नी किंवा पती (पती शरीरिकदृष्ट्या अक्षम असेल तरच)
**कलम२५-** घटस्फोटाचा दावा सुरू असेल किंवा घटस्फोट झाला तरीही पत्नी मागू शकते. तसेच,
**कलम २६-** शिक्षण आणि आरोग्यासाठी लहान मुले पोटगी मागू शकतात.

३. **हिंदू दत्तकविधान आणि निर्वाह कायदा,१९५६** नुसार,
**कलम१८-** पत्नी
**कलम१९-** विधवा सून
**कलम२०-** विवाह संबंध किंवा विवाहबाह्य संबंधातील मुले आणि वयोवृद्ध माता-पिता पोटगी मागू शकतात.

४. **कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायदा २००५ (डीव्ही कायदा)**

**कलम २०-** लग्नाची पत्नी आणि मुले, लग्नासारख्या नात्यातील महिला आणि तिची मुले, तसेच कौटुंबिक हिंसाचाराचा बळी ठरलेली, कौटुंबीक नात्यातील व सामायिक घरात राहिलेली कोणतीही महिला कायद्यांतर्गत पोटगी मागू शकते. यामध्ये मुलगी, आई, पत्नी, बहीण इ. चा समावेश होतो.

**५. विशेष विवाह कायदा, १९५४ नुसार लग्न झाले असल्यास,**
**कलम ३७-** नुसार पत्नी पोटगी मागू शकते.

**पोटगीचा खटला/दावा कुठे दाखल करता येतो?**

**पत्नीच्या बाबतीत-**

- पती राहत असल्याचे ठिकाण
- पत्नी राहत असल्याचे ठिकाण
- काही काळासाठी पती राहिला असल्याचे ठिकाण
- पती-पत्नी जिथे शेवटी राहिले ते ठिकाण

**आई वडिलांच्या बाबतीत-**

- आई-वडील राहत असल्याचे ठिकाण
- मुल राहत असल्याचे ठिकाण

**पत्नी नोकरी करत असेल तर पोटगी मागता येते का?**
-होय! कारण**,**पत्नी कमवत असल्यास तिला पोटगी मागण्याचा आधिकार नसतो हा गैरसमज आहे. जर पतीची मिळकत ही पत्नीपेक्षा जास्त असेल आणि पत्नी कमवत असलेली रक्कम ही तिच्या किंवा मुले असतील तर त्यांचा खर्च भागवण्यासाठी अपुरी पडत असेल तर पत्नी तिच्या स्वतःसाठी आणि मुलांसाठी पतीला पोटगी मागू शकते. त्यामुळे कमावत्या पत्नीला पोटगी मागण्याचा अधिकार आहे.[1]
**तसेच, पती-पत्नी एकाच घरात राहत असतील परंतु, पती पत्नीला घर खर्चाला किंवा तिच्या गरजा भागवण्यासाठी पैसे देत नसेल तरीही पत्नी पोटगी मागू शकते.**

**घटस्फोटाची केस/ खटला कोर्टातच सुरू असेल तर पोटगी मागता येते का?**
-होय! पती किंवा पत्नी या दोघांपैकी कुणीही घटस्फोटासाठी खटला दाखल केला असेल तरीही पत्नीला तिच्या स्वतःसाठी तसेच मूल किंवा मुले असतील तर त्यांच्यासाठी पतीकडून खालील कलामंतर्गत पोटगी मागता येते.
**हिंदू विवाह कायदा-कलम-२४** (केवळ या कलामंतर्गत पती देखील पत्नीला पोटगी मागू शकतो.)
**डिव्हि कायदा-कलम-२०**
**फौजदारी कायदा-कलम-१२५**

[1] शैलजा आणि इतर वि. खोबन्ना २०१७.

**समजा, घटस्फोट झाला असेल तरीही पत्नी पोटगी मागू शकते का?**
-होय! कारण, घटस्फोटावेळी पत्नीला काहीच रक्कम मिळाली नसेल किंवा मिळालेली रक्कम ही तटपुंजी असेल आणि एखाद्या कारणामुळे ती आर्थिकरीत्या सक्षम होवू शकत नसेल तर तिचे दुसरे लग्न होईपर्यंत ती तिच्या पतीला घटस्फोट झाल्यानंतरही फौजदारी कायदा-कलम-१२५
नुसार तसेच हिंदू विवाह कायद्याच्या कलम-२५ नुसार पोटगी मागू शकते.[2]

**पोटगी मागणीसाठी घटस्फोट किंवा कौटुंबिक हिंसाचाराचा खटला दाखल करणे आवश्यक असते का?**
-नाही. जर एखादया महिलेला पतीविरोधात कोणताही खटला दाखल करायचा नसेल परंतु, तिला आणि तिच्या मुलांना पोटगीची आवश्यकता असेल, तर फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १२५ नुसार ती मागू शकते.

**कौटुंबिक हिंसाचाराचा खटला सुरू असेल तर पत्नीस कलम १२५ नुसारही पोटगी मागता येते का?**

- होय! वरील दोन्ही दावे हे वेगळ्या स्वरूपाचे आहेत तसेच त्यातील तरतुदीही पुर्णपणे वेगळ्या आहेत. त्यामुळे एक खटला सुरू असतांना पत्नीस दुसरा कायदा आणि  कलमाची मदत घेण्याचा कायदेशीर अधिकार आहे.[3]

**विशेष महत्वाचे-** बरेचदा, पोटगी द्यावी लागू नये म्हणून पती पत्नीला नांदवायला नेण्यास तयार होतो. तसेच, तिने घटस्फोटाचा, कौटुंबिक हिंसाचाराचा, ४९८-अ चा किंवा पोटगीचा खटला दाखल केला असेल तर मागे घ्यायला लावला जातो. अशावेळी तिच्या वैवाहिक आयुष्यात घडलेल्या हिंसाचारांच्या घटनांचा पूर्ण विचार करून खटला मागे घ्यावा की नको हे तिने विचारपूर्वक ठरवावे. कारण, बरेचदा भावनेच्या भरात येवून महिला सर्व खटले मागे घेतात परंतु, अत्याचाराच्या घटना पुन्हा सुरू होतात. अशावेळी कोर्टात चालू असलेला खटला काही काळ तसाच प्रलंबित ठेवता येतो. कारण, एकदा कोर्टातून खटला काढून घेतल्यावर पतीने पुन्हा त्रास द्यायला सुरुवात केल्यास, पुन्हा खटला दाखल करणे फार किचकट असते.

**न्यायालयीन फारकतीच्या आदेसानुसार पती-पत्नी विभक्त राहत असतील तर पत्नीस पोटगी मागता येते का?**
- न्यायालयीन फारकत (कलम-१०) आणि घटस्फोट ह्या दोन्ही वेगळ्या गोष्टी आहेत. पती किंवा पत्नीने इतर कुणाशी लैंगिक संबंध केल्यास, छळ केल्यास, पत्नीचा त्याग केल्यास, हिंदू धर्माचा त्याग करून दूसरा धर्म स्वीकारल्यास, मानसिक संतुलन पुर्णपणे बिघडल्यास, गंभीर लैंगिक आजार झाल्यास, असाध्य आजार झाल्यास, एचआयव्ही/एड्स झाल्यास किंवा बलात्कार किंवा अनैसर्गिक लैंगिक संबंधासाठी पती दोषी आढळून आल्यास घटस्फोट न घेता पत्नी न्यायालयीन आदेशाने वेगळी राहू शकते. कायदेशीर फारकत घेतलेल्या महिलेला पोटगी मागण्याचा पूर्ण अधिकार असल्याचे उच्च न्यायालयाने म्हंटले आहे.[4]

**न्यायालय पोटगीची रक्कम कशाच्या आधारे ठरवतं?**

---

[2] मनोज कुमार वि. चंपा देवी,२०१५

[3] प्रकाश बाबुलाल डांगी वि. महाराष्ट्र राज्य सरकार,२०१७

[4] संजू देवी वि. बिहार राज्य सरकार,२०१४

- ज्या व्यक्तीने पोटगी मागितली आहे तिच्या दैनंदिन तसेच, वैद्यकीय, शैक्षणिक, घरभाडे, खाणे, कपडे, इ. गरजा पूर्ण होण्यासाठी लागणाऱ्या रक्कमेचा सारासार विचार करून न्यायालय पोटगीची रक्कम ठरवतं.

- त्याचप्रमाणे, पतीची आर्थिक स्थिती उत्तम असेल तर त्याचाही विचार न्यायालय करतं. त्यासाठी पत्नीला पतीच्या आर्थिक उत्पन्नाचे पुरावे सादर करणे आवश्यक असते.

- सर्वात महत्वाचे म्हणजे हिंसा थांबण्याची खात्री नसल्यास किंवा घरातील वातावरण असुरक्षित वाटत असल्यास पत्नीने सावधगिरीने पतीचे उत्पन्न, घर,शेती, दुकान, दागिने, भाड्याने दिलेली, घरे, खोल्या, फ्लॅट्स, प्लॉट, वडीलोपार्जित संपत्ती, पती वापरत असलेली गाडी, पती-पत्नी राहत असलेले घर, याविषयीचे पुरावे मिळवण्याचा प्रयत्न करावा. तसेच स्वतःचे दागिने आणि महत्वाची कागदपत्रे सुरक्षित ठिकाणी ठेवावीत.

- अनेक खटल्यांमधे पती स्वतःचे आर्थिक उत्पन्न कमी दाखवण्याचा प्रयत्न करतात. अशावेळी पतीच्या आर्थिक उत्पन्नाबाबतचे आधीच जमवलेले पुरावे न्यायालयात पोटगी मिळवतांना महत्वाचे ठरतात. कारण, पतीचे आर्थिक उत्पन्न आणि त्याच्या जीवनशैलीनुसार तसेच, पत्नी व मुलांच्या गरजेनुसार पोटगी मागण्याचा पत्नीला अधिकार आहे.

-

.............................................................................

**महिलेचा पुन्हा सासरी नांदायला जाण्याबाबतचा अधिकार**

**हिंदू विवाह कायदा,१९५५ - कलम ९-**

**या कायद्यातील कलम ९** नुसार पती किंवा पत्नी काही कारणामुळे एकमेकांना सोडून वेगळे राहत असल्यास पीडित व्यक्ती कलम ९ अंतर्गत कौटुंबिक न्यायालयात दावा दाखल करू शकते. पतीने नांदावयास न्यावे म्हणून पत्नी, तर पत्नीने नांदावयास यावे म्हणून पती म्हणून दावा दाखल करू शकतात.

घर सोडून जाण्याऱ्या व्यक्तीचे कारण पुराव्यावरून तपासून बघितले जाते. सदर कारण अयोग्य असेल तर न्यायालय पती-पत्नीस पुन्हा एकत्र राहण्याचा आदेश देवू शकतात. आदेश होवूनही पती-पत्नी एकत्र राहिले नाहीत किंवा पुन्हा विभक्त झाल्यास कुणावरही बळजबरी करता येत नाही. तसेच एका वर्षाच्या आत त्यांना घटस्फोट मिळू शकतो.
पती-पत्नी पैकी कुणीही नांदण्याचा खटला दाखल केला असेल तर दुसरी व्यक्ती घटस्फोटाचा खटला दाखल करू शकते.

**महत्वाचे-** पतीने घटस्फोट किंवा नांदायला येण्याचा खटला दाखल केला तरी तिच्या आयुष्यातील हिंसाचारांच्या घटनांनुसार ती कलम-४९८-

अ नुसार शारीरिक-मानसिक छळ, कलम १२५ नुसार पोटगी, किंवा कौटुंबिक हिंसाचारापासून संरक्षणाचा खटला दाखल करू शकते.

*********************************************************

## पालकांचे मुलांचा ताबा आणि पालकत्वाचे अधिकार

आई व वडील दोघांनाही पालक म्हणून सर्व अधिकार आहेत तरी विविध धर्मानुसार वडील हेच नैसर्गिक पालक असल्याचे मानले जाते. तसेच वडीलच घरचा कर्ता आणि कमविता असल्याने मुलांचा ताबा वडीलांकडेच असणार असा एक सर्वसामान्य गैरसमज समाजात दिसून येतो. परंतू, घटस्फोटानंतर त्या विवाहातून जन्माला आलेल्या अपत्यांचा ताबा आई किंवा वडील यापैकी कोणाकडे असेल हे मुलाचे हीत लक्षात घेऊन न्यायालय ठरवतं.

**ताबा आणि पालकत्व आधिकार यात काय फरक आहे?**

मुलांचा 'ताबा' (कस्टडी) आणि 'पालकत्व अधिकार' (गार्डियनशिप) यात फरक आहे. तो थोडक्यात समजून घेवूया. मुलांचा ताबा- म्हणजेच कस्टडी. यात शारीरिक ताबा असा अर्थ मुख्यत: अभिप्रेत असतो. मुलांचा शारीरिक ताबा म्हणजे मालकी हक्कं नसून मुलांचा सांभाळ करण्याची जबाबदारी असा अर्थ आहे. परंतू पालकत्व ही तात्पुरत्या ताब्यापेक्षा व्यापक संकल्पना आहे. पालकत्व म्हणजे जबाबदारी आणि अधिकार यांचा एकत्रीकरण असतं. मुलांची वाढ, विकास, संगोपन कशा पद्धतीने व्हावे, तो/ती सज्ञान होईपर्यंत त्याचे कायदेशीर प्रतिनिधित्व करणे, त्याच्या हक्कांचे संरक्षण करणे, या साऱ्या गोष्टी पालकत्वाच्या व्याख्येत येतात. थोडक्यात, पालकत्व म्हणजे कायदेशीररित्या अज्ञान मुलांचे पूर्ण निर्णय घेण्याचे अधिकार म्हणता येईल.

मुलांच्या वाढीसाठी आई आणि वडील दोघांचीही सारखीच गरज असते. पती-पत्नीत वाद निर्माण झाल्यावर मुलांच्या ताबा किंवा पालकत्वाचा प्रश्न निर्माण होतो. परंतु, वाढीच्या वयात लहान मुलांना आईची सर्वात जास्त गरज असते हे लक्षात घेवून न्यायालय मुलांचा ताबा आईकडे देवू शकतं. तसेच कायमस्वरूपी ताबा कुणाला मिळेल हे न्यायालयीन आदेशावर अवलंबून असत.

**कोणत्या कायद्यांतर्गत मुलांचा ताबा किंवा पालकत्वाचा दावा दाखल करता येतो?**

मुलांचा ताबा मागण्यासाठी खालील कायद्यातील तरतुदीं महत्वाच्या ठरू शकतात.

- हिंदू विवाह कायदा, १९५५ चे कलम- २६
- कौ.हिं.म.सं.कायदा, २००५ चे कलम-२१ नुसार तात्पुरत्या ताब्याचे आदेश
- हिंदू अल्पवयीन व पालकत्व कायदा, १९५६- नैसर्गिक पालकांच्या बाबतीत कलम-६ आणि आणि दत्तक विधानाद्वारे येणाऱ्या पालकत्वाबातीत- कलम-७,
- विशेष विवाह कायदा १९५४ चे कलम ३८

- सर्वधर्मीय गार्डियन्स अ‍ॅण्ड वॉर्डस अ‍ॅक्ट नुसार ताब्यासाठी दावा दाखल करता येतो. परंतू, प्रत्येक धर्माच्या तरतुदींनुसार कोणत्या कायद्याखाली खटला दाखल करावा हे ठरते. तसेच, आपण नेमक्या कोणत्या कारणांमुळे आणि कोणत्या कायद्याखाली ताबा किंवा पालकत्व मागत आहोत हे ही महत्वाचे असते.

ताबा हा काही काळासाठी म्हणजे तात्पुरता किंवा कायमस्वरूपी मिळू शकतो.

1. **तात्पुरता ताबा**– पती-पत्नी विभक्त राहत असतील आणि त्यांच्यामध्ये न्यायालयात खटला सुरू असेल सर्व विचार करून मुलाचा तात्पुरता ताबा कोणाकडे द्यावा हे न्यायालय ठरवत. समजा तात्पुरता ताबा आईकडे दिला असेल तर वडील मुलाला भेटण्याची परवानगी न्यायालयाला मागू शकतात.
2. **कायमस्वरूपी ताबा** – पती-पत्नी मधील खटला निकाली काढतांना न्यायालय मुलांच्या कल्याणाचा विचार करून जसे की, मुलांच्या हितसंबंधाचे रक्षण, त्यांचे शिक्षणाची सोय, शारीरिक-मानसिक-बौद्धिक विकास, वैद्यकीय गरजा, तसेच त्यांची ईछा या सर्व गोष्टींना विचार करून निर्णय देतं.
3. **सामायिक ताबा-** यामध्ये मुलांचा कायमस्वरूपी आणि कायदेशीर ताबा दोन्ही पालकांना दिलेला असतो. आई-वडील जरी विभक्त झाले असले, तरी याद्वारे मुलांना दोघांचेही प्रेम आणि सहवास मिळू शकतो. याबद्दल अद्याप कुठलेही कलम लिखित स्वरुपात नसले, तरी न्यायालयाच्या काही आदेशात अशा प्रकारे आई-वडील दोघांनाही मुलांचा ताबा देण्यात आलेला आहे.
4. **मुलांना भेटण्याचा हक्क-** आई-वडील हे मुलांचे नैसर्गिक पालक असतात आणि मुलांच्या सर्वांगीण वाढीसाठी दोघांच्याही प्रेमाची सारखीच गरज असते. त्यामुळे आई-वडिलांचा एखादा खटला सुरू असतांना मुलांचा तात्पुरता ताबा कुणा एकाकडे असेल किंवा घटस्फोट झाल्यानंतर कायमस्वरूपी ताबा कुणा एका पालकाकडे असला तरी न्यायालयाने घालून दिलेल्या निर्देशानुसार घटस्फोटांनंतरही दुसऱ्या पालकाला मुलांना भेटण्याची परवानगी असते. न्यायालयचे निर्देश दोघांनीही पाळणे आवश्यक असते. परंतु**,** भेटीची परवानगी मागणाऱ्या पालकापासून अपत्याला काहीही धोका वाटल्यास परवानगी नाकारण्याचे अधिकारही न्यायालयाला आहेत.
5. **आर्थिक आदेश-** तात्पुरता किंवा कायमस्वरूपी ताबा जर आईला मिळाला असेल परंतु, आई आर्थिकदृष्ट्या सक्षम नसेल, तर न्यायालय वडिलांना पोटगीचे आदेश देतं. मुलांच्या भरणपोषणासाठी ठराविक रक्कम मिळण्यासाठी न्यायालय प्रत्येक खटल्यातील गरजेनुसार आदेश देऊ शकतं. भरणपोषणाची रक्कम दोन्ही पालकांचे उत्पन्न लक्षात घेऊनच ठरविली जाते.

**थोडक्यात महत्वाचे**- हिंदू, खिश्चन, पारशी आणि विशेष विवाह कायद्यात मुलांच्या ताब्याच्या तरतुदींबाबत एकसारखेपणा आहे. हिंदू अल्पवयीन व पालकत्व कायदा, १९५६ नुसार मुलगा असो की मुलगी ५ वर्षाचे होईपर्यंत ताबा आईकडेच असतो. मात्र मुस्लिम कायद्यानुसार मुलगा ७ वर्षाचा होईपर्यंत आणि मुलगी वयात येईपर्यंत त्यांचा ताबा आईकडे असतो.

**आईपेक्षा वडिलांचे आर्थिक उत्पन्न जास्तं असेल तर मुलांचा ताबा वडिलांनाच मिळतो का?**

- नाही! केवळ वडिलांचे आर्थिक उत्पन्न जास्तं आहे म्हणून न्यायालय मुलांचा ताबा वडिलांकडे देतं हा गैरसमज आहे. ताबा देण्यासंदर्भात न्यायालय मुलाच्या सर्वांगीण वाढ आणि विकासाबाबत सखोल विचार करूनच निर्णय देतं. केवळ आर्थिक उत्पन्न हा एकच निकष निर्णय देतांना लावला जात नाही.

**महिलेने मुलांना सासरी ठेवून घर सोडल्यास मुलांचा ताबा मिळू शकतो का?**

- बरेचदा घर सोडण्यासाठी महिलेवर दबाव आणला जातो किंवा जबरदस्तीने तिला माहेरी पाठवले जाते. अशावेळी मुलांना परत भेटू देणार नाही अशी धमकीही तिला दिली जाते. मुलांना परत भेटता येणार नाही या भीतीपोटी स्त्रिया मुलांना सोबत न घेताच माहेरी निघून जातात. परंतु, त्यामुळे त्यांचा मुलांचा ताबा मिळण्याच्या हक्कावर गदा येत नाही. त्यासाठी न्यायालयात दाद मागता येते.

**मुलांना सोबत घेवून महिला घराबाहेर पडल्यास, पती किंवा सासरकडील मंडळी तिच्यावर गुन्हा दाखल करू शकतात का?**

-नाही! आई ही नैसर्गिक पालक असते आणि वडिलांइतकीच समान हक्कदार असते. त्यामुळे तिच्यावर मुले पळविली असा कोणताही गुन्हा दाखल होवू शकत नाही. परंतु, मुले परत मिळवण्यासाठी वडील न्यायालयात खटला दाखल करू शकतात. पाच वर्षापर्यंतचे मूल हे पूर्णतः आईवरच अवलंबूनन असतं, त्यामुळे मूल सोबत नेण्यास तिला कोणाच्याही परवानगीची आवश्यकता नाही.

**जाबदेणाऱ्यांकडे असलेला मुलांचा ताबा मिळवण्यासाठी कोणाची मदत घेता येते**?

-मूल आईचे दूध पिणारे असेल किंवा लहान असेल तर एखादी समाजसेवी संस्था, पोलिस, महिला मंडळ, महिला दक्षता समिति किंवा समाज सेवक यांची मदत घेता येवू शकते. परंतु, यासाठी लवकरात लवकर पाऊल उचलणे आवश्यक असते. कारण, बरेचदा फार कालावधी लोटल्यास मुले आईपासून दुरावण्याची शक्यता असते. तसेच, मुले आईपासून तुटावीत म्हणून पती किंवा कुटुंबातील इतर सदस्य जाणीवपूर्वक मुलांचे आईबद्दलचे मत कलुशीत करण्याची शक्यताही असते. त्यामुळे, मुले वडिलांना सोडून आईसोबत जाण्यास तयार होत नाहीत.

हे सर्व मार्ग निष्फळ ठरल्यास न्यायालयाची मदत घेणे हा शेवटचा पर्याय आहे. मुलांच्या दृष्टीने काळजी घेण्यास सर्वतोपरी समर्थ असलेल्या पालकास मुलांचा ताबा दिला जातो. याबाबत महिलांनी कुणाच्याही सांगण्यावर विश्वास न ठेवता योग्य कायदेशीर सल्ला घेणे योग्य ठरते.

## ‘वडिलोपार्जित संपत्तीतील मुलींचा समान अधिकार

### (हा कायदा हिंदू, बौद्ध, जैन आणि शीख धर्मियांना लागू आहे.)

भारतीय राज्यघटना १९५० साली लागू झाली. तेव्हापासून भारतात जन्म घेणाऱ्या प्रत्येक नागरिकाला समान हक्क लागू झाले आहेत. जगातील अनेक देशांपेक्षा भारतातील स्त्रियांविषयी आणि त्यांच्या समान हक्कांविषयीचे कायदे खूप प्रगत आहेत. परंतु, आपल्या देशात अनेक धर्म असल्यामुळे प्रत्येक धर्माचेही काही वैयक्तिक कायदे आहेत. (जसे की, हिंदू, मुस्लिम, ख्रिश्चन, पारसी इत्यादींचे वारसाहक्कासंबंधीचे नियम/कायदेही वेगवेगळे आहेत.) आपल्याकडे परंपरेने महिलांच्या हक्कांना दुय्यम स्थान असल्यामुळे हिंदू धर्मानुसार वारसाहक्काचे सगळे अधिकार घरातील पुरुषांनाच त्यांच्या मिळत आले आहेत. शिवाय, मुलींच्या संगोपन, शिक्षण, आरोग्य,लग्नाचा खर्च, हुंडा, लग्नात दिल्या जाणाऱ्या भेटवस्तू (आंदण) इत्यादी कारणांमुळे तिच्यावर झालेला खर्च गृहीत धरून, लग्नानंतर मुलींचा माहेरच्या संपत्तीतील हक्कं संपतो अशीच समाजाची मानसिकता आहे. सासरीही सगळी संपत्ति शक्यतो पती किंवा घरातील इतर पुरुष्यांच्याच नावे असते. अशा वेळी तिच्या पतीचे निधन झाल्यास किंवा कौटुंबिक हिंसाचाराचा प्रश्न उपस्थित झाल्यास तिला सासरच्या तसेच माहेरच्याही संपत्तीतूनही बेदखल केले जाते. या आणि अशा कित्तेक कारणांमुळे भारतातील महिला आजवर आर्थिक असुरक्षिततेत जगत आल्या आहेत.

परंतु, आता कायद्यातील सुधारणेनुसार मुली/महिलांचा त्यांच्या वडीलोपार्जित मालमत्तेवरचा हक्कं वैयक्तिक आणि अबाधित हक्कं मानला गेला आहे. ती उच्चशिक्षित आहे, ती नोकरी करते, भरगोस कमावते, लग्नावर फार खर्च केलाय, हुंडा दिलाय किंवा ती सासरची खूप  श्रीमंत आहे हे सर्व विचार आणि तिचा अधिकार ह्या दोन्ही वेगळ्या गोष्टी आहेत. कायद्यापुढे तिच्यावर केलेल्या खर्चाचा आणि मालमत्तेवरील तिच्या समान हक्काचा काहीच संबंध नाही. त्यामुळे ती विवाहित असो किंवा नसो तिला तिच्या हक्काच्या संपत्तीतील समान वाटा तसेच सन्मानपूर्वक, स्वावलंबी आणि सुरक्षित जगण्याचा हक्कं मिळावा हे कायद्याने ठळकपणे अधोरेखित केले आहे.

**वडिलोपार्जित संपत्ती म्हणजे काय?**

-संपत्ती दोन प्रकारची असते. एक म्हणजे एखाद्या व्यक्तीने वैयक्तिक उत्पन्नातून मिळवलेली आणि दुसरी वडिलोपार्जित संपत्ती.

कोणत्याही पुरुषाला आपल्या वडिलांकडून, आजोबाकडून किंवा पणजोबांकडून जी संपत्ती/ मालमत्ता प्राप्त होते (स्थावर किंवा जंगम) त्याला वडिलोपार्जित संपत्ती म्हणतात. जन्मानंतर अपत्याचा वडिलोपार्जित संपत्तीवर कायद्याने हक्कं स्थापित होतो.

**वडिलांच्या संपत्तीवर मुलीचा हक्कं असतो का?**

होय! राज्यघटनेच्या समान न्यायाच्या तत्वानुसार संपत्तीतून महिलांना बेदखल करणे हे त्यांच्यावर अन्यायकारक असल्यामुळे २००५ मध्ये या कायद्यात सुधारणा केली गेली. कारण, जुन्या ‘हिंदू वारसाहक्कं कायदा’ १९५६ नुसार केवळ अविवाहित मुलींनाच मालमत्तेत वाटणी मिळण्याचा अधिकार होता. त्यामुळे, समानतेचा विचार करून जुन्या कायद्यात सुधारणा होवून नव्या कायद्यानुसार आता मुलींनाही वडीलोपार्जित संपत्तीवर समान हक्कं प्राप्तं झाला आहे.

**काय आहेत हिंदू वारसाहक्कं कायद्यातील बदल?**
९ सप्टेंबर, २००५ च्या या **हिंदू वारसाहक्कं (सुधारणा) कायदा' २००५** कायद्यात केंद्र सरकारने कलम- ६ अंतर्भूत करून महत्त्वाचे बदल केले आहेत. त्यानुसार हिंदू कुटुंबात जन्माला आलेल्या मुलीला, नंतर ती विवाहित होवो अथवा अविवाहित राहो, वडीलोपार्जित मालमत्तेवर समान अधिकार मिळाला आहे.

हिंदू कुटुंबात जन्माला आलेल्या मुलाला/पुरुषाला जन्मत:च हा वारसाहक्कं मिळतो. त्याप्रमाणे, आता हिंदू कुटुंबात जन्माला आलेल्या मुलींनाही जन्मत:च हा वारसाहक्कं प्राप्त होतो असे या सुधारणा कायद्याने स्पष्ट केले आहे.[5]

**२००५ पूर्वी जन्म झालेल्या महिलांना हा कायदा लागू होतो का?**
**-होय. कारण,** ९ सप्टेंबर, २००५ आणि त्यानंतर जन्माला मुलींना हा कायदा लगेच लागू झाला. परंतु, यातून एक महत्वाचा प्रश्न न्यायालयापुढे आला. तो म्हणजे ९ सप्टेंबर, २००५ पूर्वी जन्माला आलेल्या मुलींच्या वारसाहक्काचे काय? त्यांना या कायद्यातून वगळणे योग्य होईल का? शेवटी, न्यायालयाने भारतीय घटनेच्या समानतेच्या तत्त्वाला अनुसरून २००५ नंतर वा त्यापूर्वी जन्मलेल्या सर्व हिंदू मुलींचा (बौद्धं, जैन, शीख  महिला धरून) समान वारसाहक्कं मान्य केला आहे.[6]

**२००५ पूर्वीच कायदेशीर वाटणी झाली असेल आणि त्यात महिलेला काहीही मिळाले नसेल किंवा तिने काहीच मागितले नसेल तर तर कायद्यानुसार तिला तिचा वाटा मागता येतो का?**

नाही! कारण, जर २००५ सालाच्या आधीच जर न्यायालयीन आदेशाने कुटुंबातील व्यक्तींमध्ये मालमत्तेची वाटणी झाली असेल अथवा कुटुंबांतर्गत समझोत्याने मालमत्तेची वाटणी होऊन त्याचे कायदेशीर कागदपत्र तयार करून त्याची सरकारदरबारी नोंदणी झाली असेल, तर या घटना होऊन गेल्यामुळे आणि त्याची कायदेशीर नोंद असल्यामुळे अशा परिस्थितीत वारसाहक्कातील वाटा  मिळण्यासाठीची  मागणी करता येणार नाही.

तसेच केवळ तोंडी व्यवहार करून मालमत्तेच्या वाटण्या झाल्या असतील तर तेही चालणार नाही. त्यासाठी कायदेशीर कागदपत्रं असणे आवश्यक असून त्या कागदपत्रांची कायदेशीर नोंदणी होणेही तितकेच आवश्यक  आहे.

**महिलेने वडीलोपार्जित संपपतीतील हक्कं सोडवा म्हणून प्रतिज्ञापत्रं किंवा ना-हरकत प्रमाणपत्रावर तिच्या सह्या घेणे कायदेशीर आहे का?**
वडीलोपार्जित संपपट्टीतील वाटा महिलेने घ्यावा की नाही हा केवळ तिचा निर्णय असतो. परंतु, तिने तिचा हक्कं सोडावा म्हणून बरेचदा तिच्यावर दबाव टाकून, फसवून तर कधी माहेर तुटेल ही भीती दाखवून   प्रतिज्ञापत्रं किंवा ना-हरकत प्रमाणपत्रावर तिची सही घेवून तिला संपपट्टीवरील हक्कं सोडण्यास भाग पाडले जाते. खरे  तर कायदेशीररित्या हक्कं सोडण्यासाठी संबंधित व्यक्तीला हक्कंसोड पत्र करून त्याची सरकारदरबारी रीतसर नोंदणी करणे अत्यावश्यक असते. त्यामुळे

---

5 दानम्मा@ सुमन सुरपुर वि. अमर व इतर, 2018

6 प्रकाश व इतर वि. फुलावती व इतर (२०१६)

महिलेवर असे दाबबावतंत्र वापरुन जमवलेल्या कागदपत्रांना प्रत्यक्ष न्यायालयीन प्रक्रियेत फारसे महत्त्व नसते.

**वडिलोपार्जित संपत्ती ज्याच्या ताब्यात असेल तो ती संपत्ती विकू शकतो का?**

-नाही! कारण या संपत्तीमध्ये जर अनेक हिस्सेदार असतील आणि संपत्तीची वाटणी झाली नसेल तर कुटुंबातली कोणतीही व्यक्ती ती संपत्ती स्वतःच्या मर्जीने विकू शकत नाही. याबाबतचे नियम अतिशय कडक आहेत. जर असे कुणी केलेच तर न्यायालयात दाद मागता येते. सर्वांची परवानगी असेल तर मात्र वडीलोपार्जित संपत्ती विकता येते.

**जर पहिली पत्नी वारल्यामुळे दुसरे लग्न केले असेल तर?**

-हिंदू विवाह कायद्यानुसार जर पहिल्या पत्नीच्या मृत्यूनंतर किंवा घटस्फोटानंतर दुसरं लग्न झालं असेल तरच ते लग्न कायदेशीर मानलं जातं.

अशा स्थितीत दुसऱ्या पत्नीच्या मुलांचा त्या व्यक्तीच्या संपत्तीवर हक्कं असतो, पण त्या व्यक्तीला वारसाहक्कानं मिळालेल्या संपत्तीवर त्यांचा हक्कं नसतो.

**एखाद्या व्यक्तीच्या स्वकमाईच्या/स्वकष्टार्जित संपत्तीवर कुणाचा हक्कं असतो?**

जर एखाद्या व्यक्तीने (स्त्री-पुरुष कुणीही) स्वतःच्या कमाईतुन संपत्ती विकत घेतली असेल तर तिची वाटणी कशी करायची हा सर्वस्वी त्या व्यक्तीचा अधिकार असतो. अशी संपत्ती ती व्यक्ती तिच्या जिवंतपणी किंवा मृत्यूपत्राद्वारे मृत्यूनंतर कुणाच्याही नावे करू शकते किंवा हवा तसा विनियोग करू शकते. त्यावर कुणीही वारसदार हक्कं सांगू शकत नाही.

**जर मृत्युपत्र करायचे राहून गेले असेल तर ?**

जर वडीलोपार्जित संपत्ती नसेल आणि एखाद्या व्यक्तीने त्याच्या स्वकमाईच्या संपत्तीबाबत मृत्यूपत्रं केलेले नसेल तर सदर व्यक्तीच्या मृत्यूनंतर त्याची पत्नी आणि मुलांचा हक्कं असतो. जर त्या व्यक्तीचे आई-वडील जिवंत असतील आणि ते देखील त्यांच्यावर उपजिविकेसाठी निर्भर असतील तर त्यांना देखील त्यातून हिस्सा मिळतो.

1. महिलेला मालमत्तेवरील वारसाहक्कं मिळवण्यासाठी काय करता येईल?

   १.बहीण-भाऊ एकमेकांच्या सहमती आणि सामंजस्याने वाडवडिलोपार्जित संपत्तीतील जमीनजुमला, दागिने, वस्तु, रोख किंवा बँकेतील ठेवी इत्यादींची समान वाटणी करू शकतात. परंतु, त्याची कायदेशीर कागदपत्त्रे तयार करून रीतसर नोंदणी करणे अत्यावश्यक असते. कोर्टाची पायरी चढण्यापेक्षा हा मार्ग योग्य आहे.

   २. मतभेद झाल्यास मध्यस्थ म्हणजे लवाद किंवा न्यायालयातील मेडिएटरच्या मदतीने वाद सोडवता येतील. यामुळे वेळ आणि पैसा दोन्हीची बचत होते.

३.मालमत्तेच्या वाटणी संदर्भातील कोणताही व्यवहार हा लिखित स्वरुपात असावा व त्याची रीतसर नोंदणी केली जावी. तोंडी व्यवहारांना कायद्यापुढे काहीही अर्थ नसतो.
४. शेवटचा पर्याय म्हणून दावा दाखल करणे आवश्यक असते. यात योग्य साक्षी-पुरावे, वारसदार इत्यादि गोष्टी पुढे आणणे खर्चीक, त्रासदायक आणि वेळखावू ठरू शकते.

६. मृत्यूनंतर आपल्या मुला-मुलींमधील वाद टाळण्यासाठी प्रत्येकाने आपल्या वडीलोपार्जित किंवा स्वकष्टार्जित संपत्तीचे इछापत्र, मृत्यूपत्रं करून ठेवणे जास्त योग्य ठरते.

..........................................................................

## आरोग्याशी संबंधित अधिकार व कायदे

**वैद्यकीय गर्भपात कायदा १९७१- (वैद्यकीय गर्भपात (सुधारित) कायदा, २००२ तसेच वैद्यकीय गर्भपात सुधारित नियम २००३ सह)**

**प्रस्तावना-**

असुरक्षित गर्भपातामुळे महिलांचे होणारे मृत्यू आणि दीर्घकालीन आजारपणाच्या शक्यता दूर करण्याच्या हेतूने १९७१ साली हा कायदा करण्यात आला. गर्भपात कोणत्या परिस्थितीत करता येईल, किती काळापर्यंत करता येईल, कसा करता येईल आणि कोण करू शकतं यासाठीचे नियम या कायद्यानुसार निश्चित केले गेले आहेत. प्रशिक्षित आणि पात्र व्यक्तीकडूनच गर्भपात करणे बंधनकारक आहे. थोडक्यात, मानवी हस्तक्षेपाने केलेले गर्भपात म्हणजे शस्त्रक्रिया करून किंवा गर्भपाताच्या गोळ्या देवून केलेले गर्भपातच या कायद्याच्या चौकटीत येतात. नैसर्गिकरीत्या झालेले गर्भपात या कायद्यात मोडत नाहीत. या कायद्यातील तरतुदी आणि नियमानुसार एखाद्या वैद्यकीय अधिकाऱ्याने महिलेचा गर्भपात केल्यास तिला/त्याला कायद्यानुसार संरक्षण आहे.

वैद्यकीय गर्भपात कायदा आणि लिंगंनिवड प्रतिबंधक कायदा हे दोन्ही कायदे पुर्णपणे वेगळया कारणांसाठी आणि उद्दिष्टांसाठी आहेत. परंतु, आरोग्य यंत्रणेतील धोरण, नियोजन आणि अंमलजवणीचा विचार करता, या दोन्ही कायद्यांमध्ये टाळता न येणारे काही आंतरसंबंधही आहेत. त्यामुळे लिंगभेदावर आधारित लिंगनिवडीच्या प्रश्नाला सामोरं जातांना महिलांचा कायदेशीर गर्भपाताचा अधिकारही अबाधित राखणे हे वैद्यकीय यंत्रणा तसेच कार्यकर्ता म्हणून आपल्यापुढील आव्हान आहे.

**उद्देश-**

विशिष्ट कारणांसाठी आणि विशिष्ट परिस्थितीत महिलेला गर्भपात करावा लागणार असेल तर तो सुरक्षित आणि कायदेशीर असावा हा या कायद्याचा उद्देश आहे. या कायद्यानुसार गर्भपाताचा अधिकार ही महिलांच्या प्रजनन हक्कांशी संबंधित घटना

असल्यामुळे महिलांच्या मानवी हक्कांशी संबंधित आहे. या कायद्यानुसार जन्माला न आलेल्या मुलाच्या जीवापेक्षाही मातेचे आरोग्य जास्त महत्वाचे मानले गेले आहे.

**महिलांचे प्रजनन हक्कं म्हणजे काय आणि ते कोणते आहेत**?

-प्रजनन, गर्भधारणा या विषयाशी संबंधित हक्कं म्हणजे प्रजनन हक्कं होत. यामध्ये पुढील हक्कांचा समावेश होतो- गर्भवती होण्याचा, मुल जन्माला घालण्याचा, किती मुलं हवीत हे ठरवण्याचा, गर्भपात करावा की नाही हे ठरवण्याचा, गर्भरोधके वापरावीत की नाही हे ठरवण्याचा, कुटुंबनीयोजनाची शस्त्रक्रिया करावी की नाही, आई व्हावं की नाही हे ठरवण्याचा किंवा त्यासंबंधी कोणताही अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार केवळ महिलेचा आहे.

**गर्भपात म्हणजे काय आणि महिलांना गर्भपाताचा अधिकार आहे का**?

- नको असलेला गर्भ वैद्यकीय मदतीने सुरक्षित आणि कायदेशीर पद्धतीने गर्भपिशवीतून बाहेर काढणे म्हणजे गर्भपात करणे होय. भारतात महिलांना गर्भपाताचा संपूर्ण अधिकार आहे. परंतु गर्भपात करण्यासंबधित काही कायदेशीर नियमांचे पालन करणे आवश्यक असते. गर्भपात करवण्याचा अधिकार केवळ सरकारी दवाखाने तसेच सरकारमान्य गर्भपात केंद्रांनाच असतो. परंतु, गर्भाच्या लिंगाची तपासणी करून मुलीचा गर्भ असल्यास गर्भपात करणे मात्र कायद्याने गुन्हा आहे.
- लिंगनिवडीबाबतच्या कडक नियमांचे पालन करण्याच्या भरात कायद्यानुसार मान्यता असणाऱ्या गर्भपातालाही नकार मिळाल्याची अनेक उदाहरणे पुढे येतात. त्यामुळे परस्परांना बाधा न येता ‘वैद्यकीय गर्भपात कायदा’ आणि ‘गर्भलिंग निदान चाचणी मनाई कायदा’ या दोन्ही कायद्यांची योग्य अंमलबजावणी होईल याची काळजी घेणे महत्वाचे आहे.

**कोण-कोणत्या कारणांसाठी गर्भपात करता येतो**?

- गर्भधारणेच्या १२ आठवड्यापर्यंत एका डॉक्टरकडून, परंतु गर्भ १२ ते २० आठवड्यापर्यंत वाढलेला असल्यास किमान दोन नोंदणीकृत अनुभवी स्त्रीरोग व प्रसूतितज्ञ डॉक्टरांच्या सल्ल्याने खालील निदान करण्यात आले असेल, तर गर्भधारणेच्या २० आठवड्यापर्यंत गरोदर महिलेला वैद्यकीय गर्भपात (सुधारित) कायदा, २००२ अंतर्गत गर्भपात करण्याची परवानगी आहे.

(१) जर गर्भवती महिलेच्या जीवाला धोका असेल किंवा तिच्या शारीरिक-मानसिक आरोग्यास गंभीर इजा, दूखापत पोचणार असल्यास;

(२) गर्भातील बाळास जन्मानंतर शारीरिक अथवा मानसिक व्यंग किंवा विकलांगता येण्याची शक्यता असल्यास;

(३) बलात्कारामुळे एखादी महिला किंवा कुमारिकेला गर्भधारणा झाली असल्यास आणि त्यामुळे तिच्या शारीरिक-मानसिक आरोग्यावर गंभीर परिणाम होणार असल्यास;

(४) विवाहित महिला किंवा तिच्या पतीकडून गरभनिरोधके वापरण्यात चूक झाली असल्यास किंवा औषधांच्या निष्क्रियतेमुळे गर्भधारणा झाली असल्यास; (महिलेस मानसिक धक्का बसल्याचे गृहीत घरून);

-20 आठवड्यावरील गर्भपात करणे हे मातेच्या जीवाला धोका निर्माण करते. त्यामुळे ज्या परिस्थितीत मातेला वाचवण्यासाठी गर्भपात करणे अत्यावश्यक असते अशा वेळीच 20 आठवड्यावरील गर्भपात करणे कायद्याने मान्य आहे. परंतु, त्यासाठी उच्च न्यायालयाची परवानगी घेणे आवश्यक असते.

**महिलेस स्वतःचा गर्भपात करवून घ्यायचा असल्यास कुणाच्या परवानगीची गरज असते का**?

- जर गर्भवती महिलेचे वय १८ वर्ष पूर्ण असेल तर गर्भपात करावा की नाही हा निर्णय घेण्याचा अधिकार सर्वस्वी तिचा असतो. १८ वर्ष पूर्ण असलेल्या विवाहित महिलेला गर्भपात करवून घेण्यासाठी तिच्या पती किंवा कुटुंबातील अन्य व्यक्तीची परवानगी घेणे बंधनकारक नाही. परंतु, जर तिचे वय १८ वर्षापेक्षा कमी असेल किंवा ती योग्य निर्णय घेण्यास सक्षम नसेल किंवा मानसिक आजाराने ग्रस्त असेल, तर तिच्या पालकांची किंवा तिला सांभाळणाऱ्यांची लेखी परवानगी घेणे आवश्यक असते.

**वैद्यकीय गर्भपात कोठे केला जावू शकतो तसेच गर्भवस्थेचा कालावधी किती असावा**?

- सरकारी दवाखाना, सरकार चालवत असलेला दवाखाना, सरकार किंवा जिल्हा समितीने मान्यता दिलेला दवाखान्यात गर्भपात करता येतो. परंतु, महाराष्ट्रामध्ये या सर्व केंद्रांची “बॉम्बे नर्सिंग होम नोंदणी सुधारित कायदा,२००५ अंतर्गत नोंदणी करणे आवश्यक आहे.

| **गर्भपात करण्याचे ठिकाण** | **गर्भवस्थेचा कालावधी** |
|---|---|
| वैद्यकीय महाविद्यालयं, जिल्हा रुग्णालयं | २० आठवड्यापर्यंत |
| ग्रामीण रुग्णालयं- नोंदणीकृत पात्रता असलेले डॉक्टर व आवश्यक असलेले साहित्य | १२ आठवड्यापर्यंत |
| प्रा.आ.केंद्र- नोंदणीकृत प्रशिक्षित डॉक्टर आणि आवश्यक असलेले साहित्य | ८ आठवड्यापर्यंत |
| खाजगी दवाखाने आणि रुग्णालयं | जिल्हास्तरीय समितीच्या मान्यतेनुसार- १२ ते २० आठवड्यापर्यंत |

**गर्भपात केंद्रांना मान्यता देण्याचा अधिकार कोणाला असतो**?

- सुरक्षित गर्भपात केंद्रांना मान्यता देण्याची व त्यावर देखरेख करण्याची जबाबदारी जिल्हा पातळीवरील समितीवर आहे. या समितीमध्ये खालीप्रमाणे कमीत कमी तीन ते पाच सदस्य असतात. त्यापैकी किमान एक महिला सदस्य असणे बंधनकारक आहे. महानगरपालिका पातळीवरील समितीची रचनाही अशीच आहे.

**जिल्हा स्तरीय समितीची रचना-**

| | |
|---|---|
| जिल्हा आरोग्य अधिकारी, सामान्य रुग्णालय | अध्यक्ष |
| विभाग प्रमुख महिलारोगतज्ञ/शल्यचिकित्सक/ भूलतज्ञ | सदस्य |
| जिल्हा अध्यक्ष, भारतीय वैद्यकीय संघटना | सदस्य |
| अशासकीय संस्थेचे प्रतींनिधी | सदस्य |
| अध्यक्ष,आरोग्य समिति | सदस्य |

**महानगरपालिका स्तरीय समितीची रचना-**

| | |
|---|---|
| आरोग्य अधिकारी, महानगरपालिका | अध्यक्ष |
| विभाग प्रमुख महिलारोगतज्ञ/ शल्यचिकित्सक/भूलतज्ञ | सदस्य |
| जिल्हा अध्यक्ष, भारतीय वैद्यकीय संघटना | सदस्य |
| आशासकीय संस्थेचे प्रतींनिधी | सदस्य |
| सभापति, आरोग्य समिति | सदस्य |

**वैद्यकीय गर्भपात कायद्यात काही अपवाद आहे का?**

- होय! अतिशय अपवादात्मक परिस्थितीत जर गर्भवती महिलेच्या जिवास तातडीचा व गंभीर धोका निर्माण झाला असेल, तरच गर्भधारणेचा २० आठवड्यांचा कालावधी लक्षात न घेता तसेच दोन नोंदणीकृत डॉक्टरांच्या मताशिवाय कोणत्याही दवाखाना किंवा रुग्णालयामध्ये कायदेशीर गर्भपात केला जावू शकतो. परंतु, संबंधित डॉक्टरांनी अशा प्रकारच्या गर्भपाताची संपूर्ण माहिती त्याच दिवशी किंवा कामकाजाच्या दुसऱ्या दिवशी राज्याच्या मुख्य वैद्यकीय अधिकाऱ्यांना पाठविणे बंधनकारक आहे.

**या कायद्यानुसार शिक्षेची काय तरतूद आहे**?

- या कायद्यातील तरतुदींनुसार नोंदणीकृत नसलेल्या वैद्यकीय व्यावसायिकावर किंवा मान्यताप्राप्त नसलेल्या केंद्रामध्ये गर्भपात केला गेल्यास संबंधित वैद्यकीय व्यावसायिकास २ ते ७ वर्षापर्यंत सश्रम कारावासाची शिक्षा होवू शकते. तसेच अशा प्रकरणातील महिलेसंदर्भातील कोणतीही माहिती संबंधित वैद्यकीय व्यावसायिक किंवा कर्मचाऱ्याने उघड करणे हा देखील गुन्हा आहे.

## गर्भधारणा पूर्व व प्रसूतिपूर्व निदानतंत्र वापर (लिंगनिवडीस प्रतिबंधक) कायदा,१९९४ (PC-PNDT)

**प्रस्तावना-**

गर्भलिंग निदानाला विरोध करणारा कायदा सर्वप्रथम पारित करणारे राज्य म्हणून महाराष्ट्राची ओळख आहे. २०११ च्या जनगणनेनुसार राज्याचे लिंग गुणोत्तरात मुलींच्या संख्येत कमालीची घट दिसून आली. यावरून मुलींबाबतचा सामाजिक भेदभावाचा दृष्टिकोन स्पष्ट झाला. याची परिणीती म्हणून या कायद्याची कडक अंमलबजावणी राज्यभरात सुरू झाली.

भारतामध्ये कायद्यातील काही नियमांनुसार गर्भपात कायदेशीर आहे. परंतु, लिंग तपासणी करून हवे त्या लिंगाचे बालक नसेल तर गर्भपात करणे हा शिक्षापात्र गुन्हा आहे. असे असूनही अनेक शहरी व ग्रामीण भागात लिंगतपासणी केली जाते. भारतात पृरुषप्रधान संकृतीमुळे एकतरी ‘मुलगा’ असणे महत्वाचे मानले जाते. तसेच हुंडाप्रथेमुळे महिलांचे समजातील दुय्यम स्थान हेच मुलींबाबत केल्या जाणाऱ्या भेदाभेदाचं मुख्य कारण आहे. समाजातील मुला-मुलींचे प्रमाण समान रहावे तसेच मुलींच्या गर्भाची हत्या रोखण्यासाठी हा गर्भलिंग निदान प्रतिबंध कायदा महत्वाचा आहे.

**उद्देश-**

तंत्रज्ञानाचा वापर करून गर्भलिंग निदान करण्यास मनाई करणे तसेच प्रसूतिपूर्वी अनुवांशिक गंभीर आजार व विकृतीचे वेळेत निदान करणे, गर्भाची अनैसर्गिक वाढ किंवा लिंगाधारीत दोष/व्यंग कळून येण्यासाठी या कायद्याचा सकारात्मक उपयोग करणे असा यामागे उद्देश आहे.

हा कायदा १९९४ मध्ये लागू करण्यात आला व यात २००३मध्ये सुधारणा करण्यात आली. याचे नियम १९९६ मध्ये तयार करण्यात आले व त्यात २०११,२०१२, आणि २०१३ मध्ये आवश्यक त्या दुरुस्त्या करण्यात आल्या.

**गर्भलिंगनिदान करणे म्हणजे काय?**

- गर्भधारणेच्या काळादरम्यान आणि प्रसूति होण्याच्या आधी काही वैद्यकीय तपासण्या करून गर्भाचे लिंग जाणून घेणे म्हणजे गर्भलिंगनिदान करणे होय. मुलगा होण्याच्या हव्यासापोटी सोनोग्राफी चाचणीच्या मदतीने गर्भाचे लिंग तपासले जाते आणि मुलीचा गर्भ असल्यास गर्भपात केला जातो.

**गर्भलिंग निदान कायद्याने गुन्हा आहे का?**

- होय! तंत्रज्ञानाचा वापर आईच्या गर्भातील बाळाचे लिंग तपासण्यासाठी करणे आणि मुलीचा गर्भ असल्यास पाडून टाकणे हा या कायद्याने गुन्हा आहे. परंतु, गर्भलिंग निदान आणि मुलीचा गर्भ पाडणे हे सर्वांच्या सहमतीने होत असल्यामुळे असे गुन्हे उजेडात येत नाहीत.

**या कायद्यातील महत्वाच्या तरतुदी कोणत्या आहेत?**

- प्रसूतिपूर्वी पोटातील गर्भाचे लिंग निदान करण्यास बंदी;

- पोटातील गर्भाचे लिंग माहीत करून घेण्यासाठी कोणत्याही प्रकारची चाचणी, तपासणी करण्यास बंदी;

- पोटातील गर्भाचे लिंग माहीत करून घेवून मुलगी असल्यास गर्भपात करण्यास बंदी;

- पोटातील गर्भाचे लिंग माहीत करून मिळेल अशी जाहिरात टीव्ही. वर्तमानपत्र, फेसबुक, व्हाट्स एप, व्हीडिओ, पुस्तके, इंटरनेट वेबसाईट्स किंवा इतर कोणत्याही माध्यमाद्वारे करणे यावर कठोर बंदी;

-कायद्यातील कोणतीही तरतूद न पाळल्यास शिक्षा आणि दंड

- दवाखान्यात, सोनोग्राफी केंद्र याठिकाणी सर्वांना स्पष्टपणे दिसेल अशा अक्षरात "येथे गर्भलिंगतपासणी केली जात नाही" असा फलक/बोर्ड लावणे बंधनकारक,

-संबंधित डॉक्टरकडे या कायद्याची प्रत असणे आवश्यक असते,

- सोनोग्राफी मशीन, ते वापरण्याची जागा, वापरणारी व्यक्ति प्रशिक्षित आणि पात्र असणे बंधनकारक आहे तसेच या सर्व गोष्टींची कायदेशीर नोंदणी केलेली असणेही बंधनकारक.

**गर्भलिंगनिदान चाचणी उघडकीस आल्यास कोण-कोण गुन्हेगार ठरू शकतात?**

- ही चाचणी करणारे डॉक्टर किंवा कोणतीही व्यक्ती जी अशी चाचणी करते किंवा करत असल्याची जाहिरात करते.
- ज्या ठिकाणी अशी चाचणी केली जाते त्या ठिकाणची जबाबदार व्यक्ती.
- ज्या सेंटरमधे अशी चाचणी केली जाते त्या सेंटरचा मालक, मेंबर, मॅनेजर इ. संबंधित व्यक्ती
- गर्भवती महिलेचा पती, कुटुंबातील सदस्य किंवा इतर नातेवाईक जे गर्भवतीने लिंग निदान चाचणी करावी म्हणून मध्यस्थाची भूमिका पार पाडत असतील, सल्ले देत असतील किंवा तिच्यावर दबाव टाकत असतील,
- या कायद्यांतर्गत महिलेला दोषी समजले जात नाही. परंतु, जर गर्भलिंगनिदान करण्यासाठी तिने स्वतःच कुणाचाही दबाव नसतांना पुढाकार घेतल्याचे स्पष्ट झाले तरच तिला दोषी समजण्यात येईल.

**तक्रार कुठे करता येते व कोण करू शकतं?**

अश्या तक्रारींवर कारवाई करण्यासाठी शासकीय पातळीवर स्वतंत्र व्यवस्था आहे. ज्याही कुणाला एखाद्या ठिकाणी गर्भलिंग निदान चाचणी होत असल्याचे निदर्शनास आले किंवा खात्री वाटत असेल, तर ती व्यक्ती खालील अधिकाऱ्यांकडे लेखी किंवा तोंडी तक्रार देवू शकते. तसेच, अशी घटना अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आल्यास ते स्वतःहून देखील कारवाई करू शकतात.

| | | |
|---|---|---|
| १. | महानगरपालिका पातळीवर | महानगर पालिकेचे आरोग्य अधिकारी |
| २. | जिल्हा पातळीवर | जिल्हा शल्य चिकित्सक (सिव्हिल सर्जन) |
| ३. | ग्रामीण पातळीवर | स्थानिक ग्रामीण रुग्णालयाचे अधीक्षक |

**जर, वैद्यकीय गर्भपात कायदा, १९७१ नुसार गर्भपात करण्यास परवानगी आहे, तर गर्भलिंगनिदान चाचणी करून मुलीचा गर्भ पाडण्यास बंदी का?**

- वैद्यकीय गर्भपात कायद्यानुसार आई किंवा बाळाच्या शारीरिक-मानसिक आरोग्यास धोका असेल तरच कायद्यातील तरतुदींचे पालन करून गर्भपात करता येतो. परंतु, मुलगा हवा असण्याच्या हव्यासापोटी गर्भलिंगनिदान चाचणी करून मुलीचा गर्भ पाडून टाकणे हा मात्र कायद्याने गुन्हा आहे.

**या कायद्यातील तरतुदींचे उल्लंघन केल्यास काय शिक्षा आहे?**

- पहिल्यांदा गुन्हा केल्यास गुन्हेगारास ३ वर्षापर्यंत कारावास अधिक १०,००० रु. दंड होवू शकतो. जर एकापेक्षा जास्त वेळा गुन्हा केल्यास ५ वर्ष कारावास अधिक ५०,००० ते १,००००० लाखापर्यंत दंड होवू शकतो.
- तसेच, जो कोणी या कायद्याच्या कोणत्याही तरतुदींचे किंवा नियमांचे उल्लंघन करील व त्यासाठी या कायद्यात अन्यत्र कोठेही कोणत्याही शिक्षेची तरतूद केलेली नसेल तर त्याला ३ महिन्यांपर्यंत कारावास किंवा १००० रूपायापर्यंत दंड किंवा दोन्ही शिक्षा होतील. पहिला गुन्हा सिद्ध झाल्यावरही गुन्हा करणे चालूच राहिले तर त्या प्रत्येक दिवसासाठी ५००रुपये पर्यंत असू शकेल इतक्या अतिरिक्त दंडाची शिक्षा होईल.

**कार्यकर्त्याची भूमिका काय असावी**?

वैद्यकीय गर्भपात कायदा आणि गर्भलिंग निवड प्रतिबंध कायद्यातील फरक आणि आंतरसंबंध आपण लक्षात घेतले. लिंगभेदावर आधारित लिंगनिवडीची समस्या हाताळतांना अनेक पैलूंवर विचार करणे आवश्यक आहे. म्हणजे आपण ज्या समाजासाठी काम करत आहोत त्या समाजाची पार्श्वभूमी, त्यांची भाषा, त्यांचा एकंदरीत सामाजिक दृष्टीकोन इ. यामुळे कार्यकर्ता म्हणून त्यांच्यापर्यंत आपल्याला नेमका काय, कोणता आणि कसा संदेश पोचवायचा आहे हे समजण्यास मदत होईल तसेच काय टाळावे हेदेखील लक्षात येईल. त्यासाठी खालील गोष्टीं करता येतील.

- या कायद्यातील कोणत्याही तरतुदीचे उल्लंघन झाल्याचे निदर्शनास आल्यास त्याची लेखी माहिती, (शक्य असल्यास पुराव्यासहित) स्थानिक पोलिस ठाणे किंवा संबंधित आरोग्य अधिकाऱ्यांना देणे.
- महिलांना एकत्र आणून या कायद्यावर मोकळेपणाने चर्चा करणे आणि महिलांना कायदेविषयक साक्षर करण्याचा तसेच लिंगभेद मिटवण्याचा प्रयत्न करणे.

- गर्भवती स्त्रियांचा आहार आणि आरोग्याचे महत्व याविषयी जागृती निर्माण करणे तसेच होणाऱ्या प्रत्येक बाळाच्या नावाची नोंदणी होईल यासाठी आई-वडिलांना प्रोत्साहित करणे.
- बरेचदा लिंगनिवड करणे आणि गर्भपात करणे यातील नेमका फरक लक्षात न आल्यामुळे गर्भपात करणे एक भयंकर नृशंस कृत्य आहे असा गैरसमज होतो. त्यामुळे लिंगनिवड आणि गर्भपात याविषयी माहिती देतांना सकारात्मक शब्द, भाषा, चित्रं, दृश्य वापर जसे की, मुलींबद्दल प्रेम, जिव्हाळा, आनंद, समाधान इत्यादींचा उपयोग करणे परिणामकारक ठरेल.
- नकारात्मकता दाखवणारे शब्द, भाषा, चित्रं, दृश्य वापर जसे की, आईच्या पोटात चाकू, सुई, कात्री, गळ्याभोवती फास आवळलेला गर्भ, आईच्या कुशीतून मुलीचा गर्भ बोलतो आहे किंवा किंकाळ्या सुचवणारे शब्द, चित्रं, रक्ताचे डाग, इ. टाळणे जास्त योग्य ठरेल.

कारण, काही अपरीहार्य कारणामुळे २० आठवड्यापर्यंत गर्भपात करणे वैध असतांनाही असे करणे म्हणजे एका जिवाची हत्या करणे असे सूचित होते. त्याचप्रमाणे, महिलांचे केवळ आई आणि पत्नी असणेच महत्वाचे असेही अधोरेखित करू नये. जसे की, मुली जन्मालाच आल्या नाहीत तर बायको, बहीण, कशी मिळणार? किंवा वराच्या वेशात हार घेवून अनेक मुलगे आणि त्यांच्यापुढे प्रशचिन्ह वगैरे असे काही असू नये. कारण माणूस म्हणून महिलांचे समाजातील स्थान अत्यंत महत्वाचे आहे हे समजणे जास्त गरजेचे आहे.

थोडक्यात, गर्भलिंग निदान आणि निवडीच्या आधारे करण्यात येणाऱ्या गर्भपाताच्या विचारातील चूक तर स्पष्ट करायची परंतु, २० आठवड्यापर्यंत कायद्यातील तरतुदींनुसार सुरक्षित गर्भपात करणे हा अधिकार आहे हे देखील स्पष्ट सांगणे आवश्यक आहे.

---

## महिलांविरूद्धचे फौजदारी गुन्हे व कायदे

# हुंडा प्रतिबंधक कायदा, १९६१

**प्रस्तावना-**

जगात भारत एक वेगाने प्रगति करत असलेला देश म्हणून ओळखला जातो. भारतीय महिलांची शैक्षणिक व आर्थिक प्रगति होत असली तरी सामाजिक पातळीवर महिलाविषयक दृष्टीकोन अजूनही बदलला नसल्याचे ठळकपणे दिसून येते.

आजच्या २१व्या शतकात देश वेगाने प्रगति करत असला, तरी महिलांवरील अत्याचारांच्या वाढत्या समस्यांमुळे भारतीय समाज पुर्णपणे पोखरला जात आहे. यापैकी एक सर्वात ज्वलंत समस्या म्हणजे हुंडा पद्धती आणि हुंड्यासाठी होणारा महिलांचा छळ होय. आज हुंडाच्या गुह्यासाठी कठोर कायदेशीर अस्तित्वात असल्या तरीही हुंडाबळींची संख्या दिवसेंदिवस

वाढतच आहे. आजही विवाहप्रसंगी मुलीकडची बाजू कनिष्ठ आणि मुलाकडची बाजू श्रेष्ठ, असेच मानले जाते. लग्नात दोन्हीकडचा खर्च; तसेच दागदागिने, भेटवस्तू, मालमत्ता, वरदक्षिणा या आणि अशा अनेक मागण्या वरपक्षाकडून अटीच्या स्वरूपात केल्या जातात. या मागण्या पूर्ण झाल्या नाहीत किंवा मनासारखे मानपान झाले नाहीत या कारणांवरून विवाहित स्त्रियांचा सासरी नव-याकडून, त्याच्या इतर नातेवाईकांकडून जाणीवपूर्वक शारीरिक-मानसिक छळ केला जातो, प्रसंगी जाळून, विहिरीत ढकलून खूनही केला जातो किंवा त्यांना आत्महत्या करण्यास भाग पाडले जाते.

या सर्व प्रश्नांचे मुळ आपल्या पुरुषप्रधान सामाजिक व्यवस्थेत दडलेले आहे यात शंकाच नाही. केवळ सासरकडचीच नाही तर माहेरची माणसंही ह्या वाईट प्रथेला बळकटी देण्यात अग्रेसर आहेत. कारण मुलाची किंवा त्याच्या वडिलांची संपत्ती, मुलाची नोकरी, त्याची किंवा त्याच्या कुटुंबाची समाजातील प्रतिष्ठा, आपल्या मुलीचा संसार सुखाने व्हावा, तिला सासुरवास भोगावा लागू नये या दबावाला बळी पडून आई-वडीलही हुंडा देण्यास तयार होतात. शिवाय, महिलांमध्ये स्वत:च्या हक्कांविषयी असणारं अज्ञान, अशिक्षितपणा, अनिष्ट रूढी- परंपरा यामुळे त्यांना त्रास व छळ सहन करावा लागतो. नोंदवल्या जाणाऱ्या गुन्ह्यांपेक्षा वास्तवातील गुन्हे कित्तेक पटीने जास्त आहेत. खोट्या कौटुंबिक, सामाजिक प्रतिष्ठेसाठी अनेक महिला गुन्हा दाखलच करत नाहीत. मुळात कौटुंबिक हिंसाचार हा चार भिंतींच्या आत घडणारी गोष्ट असल्याने त्यासाठी आवश्यक असणारे पुरावे उपलब्ध होण्याची शक्यता फार कमी असते.

विवाहित महिलांवर हुंड्यासाठी घराघरांमध्ये होणारे मानसिक व शारीरिक शोषण, हिंसाचार हे भयावह असूनही त्याबाबत आजही आपला समाज कामालीचा उदासीन आहे.

ज्यांची सामाजिक, आर्थिक आणि राजकीय बाजू भक्कम असते त्यांच्यासाठी लग्न समारंभ आनंदाचा बनण्यापेक्षा प्रतिष्ठेचा आणि सुबत्ता दाखवण्याचा सोहळा बनला आहे. याचे नकारात्मक परिणाम अर्थातच समाजातील इतर घटकांवर पडतात. त्यामुळे हुंड्यासारख्या वाईट प्रथा कायमस्वरूपी टिकून राहतात. परंपरांविषयी आदर असायला हरकत नाही, पण बदलत्या काळानुसार त्यात सुधारणा न करता केवळ चालत आलंय म्हणून अशा जीवघेण्या प्रथांना चालूच ठेवणं दुर्दैवी आहे.

**उद्देश-**

हुंडा देण्या-घेण्याच्या प्रथेला पुर्णतः प्रतिबंध व्हावा आणि या प्रक्रियेत सहभागी असलेल्यांना शिक्षा मिळावी तसेच हुंडा ही प्रथा समूळ नष्ट होवून विवाहित महिलांना संरक्षण मिळावे हा या कायद्यामागील उद्देश आहे.

हुंडा बळींची वाढती संख्या, पती किंवा पतीच्या नातेवाईक (सासू, सासरे, नणंद, दीर इ.) कडून क्रुर/छळाची वागणूक मिळाल्याने विवाहित महिलांच्या आत्महत्या किंवा खून होणे या सर्व समस्यांवर वचक बसावा म्हणून हुंडा प्रतिबंधक कायदा अस्तित्वात आला आहे.

**हुंडा म्हणजे काय**?

हुंडयाची व्याख्या -

**कलम (२)-** हुंडा प्रतिबंधक कायदा, १९६१च्या कलम २ नुसार, हुंडा या शब्दाची व्याख्या विवाहातील एका पक्षाने विवाहातील अन्य पक्षास किंवा विवाहातील कोणत्याही पक्षाच्या आई-वडिलांना अथवा अन्य कोणत्याही व्यक्तीने किंवा तत्पूर्वी किंवा त्यानंतर कोणत्याही वेळी प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे दिलेली किंवा दयावयाचे कबुल केलेली कोणतीही संपती अथवा मौल्यवान वस्तु किंवा रोख रक्कम असा आहे.

परंतु त्यामध्ये ज्या व्यक्तींना मुस्लिम व्यक्तिगत कायदा (शरीअत) लागू आहे त्या व्यक्तींच्या बाबतीत दहेज किंवा मेहर यांचा समावेश होत नाही.

थोडक्यात, हुंडा म्हणजे नवरा मुलगा किंवा त्याच्या कुटुंबातील कोणत्याही सदस्याने लग्नासाठी किंवा लग्नावेळी पत्नी किंवा तिच्या माहेरील सदस्यांकडून मागितलेली किंवा माहेरील लोकांनी देण्याचे कबुल केलेली कोणतीही रोख रक्कम, दागिने, किंमती वस्तु, तसेच कोणत्याही स्वरुपातील संपत्ती होय.

**कलम(३)-** नुसार हुंडा देणे आणि घेणे दोन्ही कृती गुन्हा आहेत. त्यासाठी,

**शिक्षा-** ५ वर्षे कारावास अधिक १५०००/रु. दंड किंवा हुंडयाच्या मूल्याइतकी रक्कम यापैकी जी रक्कम जास्त असेल तितक्या रकमेचा दंड.

**कलम(४)-** हुंडा मागणे हा देखील या कायद्यान्वये गुन्हा आहे. कोणत्याही व्यक्तीने प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्षपणे हुंडा मागणे गुन्हा ठरतो. त्यासाठी,

**शिक्षा-** ६ महिने ते २ कारावास अधिक १०,०००/- रुपये दंड.

**कलम(४)-** नुसार हुंड्याची जाहिरात करणे गुन्हा ठरतो. म्हणजे, कोणत्याही व्यक्तींने लग्नंसंदर्भात कोणत्याही प्रकारची संपत्ती देवू करण्याची जाहिरात छापल्यास किंवा प्रसिध्द केल्यास ती व्यक्ती गुन्हेगार ठरते. त्यासाठी,

**शिक्षा-** ६ महिने ते ५ वर्षापर्यंत कारावास अधिक रुपये १५,०००/- पर्यंत दंड.

**'क्रूर वागणूक' देणे म्हणजे का? त्यात कशाचा अंतर्भाव होतो?**

परिस्थितीनुरूप क्रूर वागणूक वेगवेगळी असू शकते म्हणूनच भारतीय दंड विधानात क्रूर वागणुकीची व्याख्या केलेली नाही. परंतु, खालील कृती ह्या क्रूर वागणूक ह्या प्रकारात मोडतात.

**क्रूर वागणुकीचे प्रकार –**

| मानसिक दुखापती | शारीरिक दुखापती |
| --- | --- |
| ➢ सतत दबाव टाकणे<br>➢ अश्लील शिव्या देणे सतत टोमणे मारणे<br>➢ पत्नीच्या आई-वडिलांबाबत अपशब्द वापरणे<br>➢ घाणेरडे आरोप करणे<br>➢ पत्नीच्या चारित्र्यावर संशय घेणे व खोट्या तक्रारी करणे<br>➢ पत्नीशी न बोलणे, मौनव्रत धारण करणे<br>➢ निर्णयप्रक्रियेत सहभागी करून न घेणे<br>➢ तिचा द्वेष करणे , अपमान करणे<br>➢ हुंड्याची मागणी करणे<br>➢ आत्महत्या करण्याची धमकी देवून तिच्यावर दबाव टाकणे<br>➢ तिच्यासमोर कायम उदास चेहऱ्याने वावरणे<br>➢ कर्ज किंवा आर्थिक अडचण<br>➢ शरीर संबंध ठेवण्यास नकार देणे.<br>➢ मुलांवर दबाव टाकणे, मारणे किंवा मारहाण करण्याची धमकी देणे<br>➢ तिला फोन, पत्र इ. द्वारे कुणाशीही संपर्क करू न देणे<br>➢ नातेवाईक, शेजारी यांचेशी बोलू न देणे इत्यादी. | ➢ जबर मारहाण करणे, लाथा-बुक्क्यांनी मारणे<br>➢ एखादा अवयव मोडणे किंवा निकामी करणे<br>➢ कायमचे पंगु-अधू बनवणे<br>➢ वस्तु फेकून मारणे<br>➢ अंगावर धावून जावून मारणे<br>➢ घरात, बाजारात, चौकात, रस्त्यावर, इतरांसमोर मारहाण करणे<br>➢ गर्भपात करायला भाग पाडणे<br>➢ गर्भधारणा होण्याची जबरदस्ती करणे |

हुंडा प्रतिबंधक कायद्याविषयी जाणून घेतांना हुंडाबळीचे कलम ३०४ ब या विशेष कलमाविषयी सखोल अभ्यास करणे महत्वाचे आहे.

सन १९७० ते १९८० साला दरम्यान नवविवाहितेच्या मृत्युंच्या प्रमाणात विलक्षण वाढ झाली. त्यामागे हुंड्याची मागणी हे प्रमुख कारण होते. हुंड्याच्या कारणामुळे ज्यावेळी एखाद्या महिलेचा मृत्यू होत असे, त्यावेळी अपघात किंवा आत्महत्या म्हणून पोलिस केस नोंदवून घेत असत. तिला जाळून, विष पाजून किंवा विहिरीत ढकलून मारले गेले असले, तरी कायद्यात कडक शिक्षेची तरतूद नसल्याने हुंडाबळींच्या घटनांना आळा घालणे कठीण झाले होते. त्यामुळे, १९८६ मध्ये हुंडा प्रतिबंधक कायद्यात दुरूस्ती करण्यात येवून **भारतीय दंड विधानात ३०४ ब हे हुंडाबळीचे कलम आणि भारतीय पुरावा कायद्यात कलम ३१३ ब** ही दोन विशेष कलमे अंतर्भूत करण्यात आली.

**हुंडाबळी व्याख्या (कलम ३०४-ब)-**

**एखाद्या विवाहितेचा मृत्यू तिचा विवाह झाल्यापासून ७ वर्षाच्या आत कोणत्याही संसायास्पद कारणाने जसे की, जळून, किंवा गंभीर दुखापतीमुळे झाल्यास, तसेच मृत्यूपूर्वी तिचा पती किंवा सासरकडील नातेवाईकांकडून हुंड्याच्या मागणीवरून छळ होत असल्याचे सिद्धं होत असल्यास अशा मृत्युला हुंडाबळी म्हंटले जाते.**

**कलम ३०४ ब लागू होण्यासाठी खालील कारणांचा समावेश असणे आवश्यक आहे.**

1. **अनैसर्गिक किंवा संशयास्पद परिस्थितीत मृत्यू** – जळणे, गंभीर शारीरिक दुखापती, गळा घोटून मृत्यू, विषप्राशन, गळफास इत्यादी, ही अनैसर्गिक मृत्युची उदाहरणे आहेत. कलम ३०४ ब सिद्धं करण्यासाठी केवळ पीडित महिलेचा तिच्या सासरकडील नातेवाईकांविरुद्ध हुंड्यासाठी तिचा छळ होत असल्याचा आरोप आणि त्यासंबंधीचा एखादा पुरावा तिचा अनैसर्गिक मृत्यू झाल्याचे सिद्ध करतो.[7]

2. **लग्नं झाल्यापासून ७ वर्ष्याच्या आत मृत्यू-** सदर कलम लागू होण्यासाठी विवाहितेचा लग्नाच्या सात वर्षाआत अनैसर्गिक मृत्यू झालेला असणे आवश्यक आहे. जर विवाहितेचा मृत्यू लग्नाच्या ७ वर्षानंतर झाला असल्यास हुंडाबळीचे कलम लागू न होता, भारतीय दंड संहितेचे कलम ३०२ नुसार खूनाचा गुन्हा दाखल होतो.

3. **पती किंवा सासरकडील नातेवाईकांकडून विवाहितेस शारीरिक-मानसिक क्रूर वागणूक** – हुंड्याची मागणी पूर्ण होण्याच्या उद्देशाने किंवा पूर्ण न झाल्यास त्याची शिक्षा म्हणून जाणीवपूर्वक विवाहितेचा असा छळ करणे ज्यामुळे तिला गंभीर शारीरिक- मानसिक दुखापत होईल तसेच तीला आत्महत्या करणे भाग होईल.

4. **विवाहितेला दिल्या जाणाऱ्या क्रूर वागणुकीचा हुंड्याच्या मागणीशी संबंध असावा** – कलम ३०४ ब नुसार गुन्हा दाखल करण्यासाठी विवाहितेला दिल्या जाणाऱ्या क्रूर वागणुकीचा हुंड्याच्या मागणीशी संबंध आहे हे सिद्धं होणं आवश्यक आहे. जर विवाहितेचा छळ हा हुंड्यामुळे होत नसेल कलम ३०४ ब लागू होणार नाही. त्या ऐवजी ४९८-अ नुसार गुन्हा दाखल केला जावू शकतो.

   (परंतु, आर्थिक अडचणीत मदत म्हणून मुलीच्या माहेरकडून काही रक्कम दिल्यास त्याला हुंडा म्हणता येणार नाही.)[8]

[7] देविंदर सिंह आणि इतर वि. पंजाब राज्य सरकार,२००५, सीआर एलजे.४१६० एससी

[8] अप्पासाहेब वि. महाराष्ट्र सरकार, एआयआर२००७, एससी ७६३

**भारतीय पुरावा कायदा- कलम ११३ (ब)- अनुमान काढणे** –

भारतीय पुरावा कायद्याच्या कलम ४ (२) नुसार  न्यायालयाने एखादे तथ्य गृहीत धरावे असे म्हंटले आहे. हुंडाबळीचा अपराध घडला आहे आहे का? असा प्रश्न जेव्हा न्यायालयापुढे निर्माण होतो, तेव्हा जर असे दाखवून दिले की, मृत्यूपूर्वी लगतच्या काळात त्या महिलेस क्रूरपणे वागविले जात होते, तिचा शारीरिक-मानसिक छळ केला जात होता आणि या छळामागे हुंडा हे कारण होते, तर न्यायालय असे गृहीत धरते की हुंडाबळीचा अपराध घडला आहे आणि तो तिच्या नवऱ्याने आणि त्याच्या नातेवाइकांनी घवून आणला आहे. कलम ११३ ब मधील अनुमान सक्तीचे व आग्रही स्वरूपाचे असते, त्यसाठी,

**शिक्षा-** कमीत कमी ७ वर्षे किंवा आजन्म कारावास

**अपराध-** दखलपात्र आणि अजामीनपात्र

**मृत्यूपूर्व जबाब** – मृत्यूपूर्व जबाब म्हणजे पिडीत महिलेने तिचा मृत्यू होण्यापूर्वी घटनेचे केलेले कथन होय**.** जेव्हा एखादी महिला गंभीर स्थितीत दवाखान्यात दाखल होते व डॉक्टरांच्या तपासणी अहवालानुसार तिला झालेल्या गंभीर शारीरिक- मानसिक दुखापती ह्या तिच्या मृत्यूस कारणीभूत ठरू शकतात हे स्पष्ट होत असेल तसेच गंभीर दुखापत ही संशयास्पद वाटत असेल आणि महिला जीवंत राहण्याची शक्यता नसेल, तर अशावेळी महिलेचे जवळचे नातेवाईक, डॉक्टर, पोलिस, न्यायदंडाधिकारी यांच्या समोर तीचा मृत्यूपूर्व जबाब घेतला जातो. हुंडाबळीच्या प्रकरणांमध्ये महिलेचा मृत्यूपूर्व जबाब हा सबळ पुरावा मनाला जातो.

**जेव्हाही 'हुंड्यासाठी विवाहितेचा छळ' असा विषय निघतो तेव्हा कलम ४९८-अ चा विचार आपल्या मनात येतो. त्यामुळे हुंडा आणि कलम ४९८अ चा नेमका काय संबंध आहे हे समजून घेणे महत्वाचे आहे**.

हुंडा प्रतिबंधक कायदा आणि कलम ४९८ अ यांचा जवळचा संबंध आहे. कारण बरेचदा कुटुंबातील महिलांवर होणाऱ्या अत्याचाराचं प्रमुख कारण हुंडा हेच असतं. १९८० साला दरम्यान हुंडय़ासाठी विवाहित महिलांचा होणारा छळ, हत्या किंवा त्यांना आत्महत्येस प्रवृत्त करणे या प्रकारच्या गुन्ह्यांचे प्रमाण फारच वाढले होते. त्याची दखल घेवून १९८३ साली भारतीय दंड विधानाच्या कलम ४९८ मध्ये कौटुंबिक हिंसेची दखल घेणारं "४९८-अ" ह्या उपकलामाचा अंतर्भाव करण्यात आला.

कौटुंबिक छळ हा विवाहितेच्या शरीर-मनाचे नुकसान करणारा गुन्हा आहे. त्यामुळे फक्त शारिरीकच नाही, तर मानसिक छळाचीही दखल या कलमांतर्गत घेतली गेली. ४९८-अ हे कलम अतिशय स्पष्ट आहे. कारण या कलमानुसार क्रूरता म्हणजे काय तर नवऱ्याचे किंवा नवऱ्याच्या नातेवाइकांचे असे कोणतेही वर्तन ज्यामुळे विवाहिता आत्महत्येस प्रवृत्त होईल किंवा तिच्या जीविताला, शारीरिक-मानसिक, आरोग्याला नुकसान पोहोचेल, दुखापत होईल किंवा ती आत्महत्येस प्रवृत्त होईल. या व्याख्येच्या दुसऱ्या भागात म्हटले आहे की पत्नी किंवा तिच्याशी संबंधित इतरांकडून पतीने केलेली हुंडा किंवा तत्सम बेकायदेशीर मागणी पूर्ण व्हावी यासाठी तिचा कोणत्याही प्रकारचा होणारा छळ म्हणजे क्रूरता. यावरून स्पष्ट होते की, ४९८ अ ही तरतूद फक्त हुंडय़ावरून होणाऱ्या छळाविरोधात नाही तर हुंडय़ाची मागणी नसलेल्या पण, इतर कोणत्याही कारणामुळे कौटुंबिक छळाची नोंद घेण्यासाठी आहे. परंतु, सर्वसामान्यांच्या, शासकीय कर्मचाऱ्यांच्या, आणि अगदी पोलीस-वकिलांच्याही मनात ४९८ अ म्हणजे हुंडाबंदी किंवा हुंडाबळी असाच समज आजही कायम आहे.

**कलम ४९८अ ची कायद्यातील तरतूद**?

- **४९८(अ)-** जेव्हा पती किंवा त्याच्या नातेवाईकाकडून विवाहितेला हेतूपुरस्कर अश्याप्रकारे वागणूक दिली जाते की, ज्यामुळे विवाहितेला आत्महत्या करणे भाग पडते, किंवा तिला गंभीर शारीरिक – मानसिक दुखापत होते, तिच्या जीविताला, किंवा शारीरिक-मानसिक आरोग्याला धोका निर्माण होतो.
- **४९८(ब)-** जेव्हा पती किंवा त्याच्या नातेवाईकाकडून एखाद्या विवाहितेवर किंवा तिच्या जवळच्या व्यक्तीवर कोणत्याही प्रकारची मालमत्ता, सोने-नाणे, रक्कम, मौल्यवान वस्तुची मागणी करणे आणि सदर मागणी पूर्ण न झाल्यास विवाहितेला जाणीवपूर्वक त्रास देणे. त्यासाठी,
  **शिक्षा-** ३ वर्षापर्यंत कारावास अधिक दंड किंवा दोन्ही

**अपराध- दखलपात्र आणि अजामीनपात्र**

2017 मध्ये सर्वोच्चं न्यायालयाने कलम ४९८अ नुसार गुन्हा दाखल करण्याबाबत काही बंधने घातली होती.

परंतु, २०१८ मध्ये सरन्यायाधीश दीपक मिश्रा, न्या. ए. एम. खानविलकर आणि न्या. डी. वाय. चंद्रचूड यांच्या खंडपीठाने कलम ४९८अ नुसार गुन्हा दाखल करण्याबाबतची सर्व बंधने रद्द केली आहेत. त्यामुळे, आता महिलेने तक्रार केल्यावर नवरा किंवा सासरच्या लोकांना अटक करण्याबाबत कुटुंब कल्याण समितीची कोणतीही भूमिका असणार नाही. त्यामुळे आता पोलिस ठाण्यात पूर्वीसारखीच थेट तक्रार नोंदवता येते.

**ही तक्रार कधी व कोण दाखल करू शकतं?**

लग्नापूवी, लग्नावेळी किंवा लग्नानंतर हुंड्याची मागणी होत असल्यास आणि त्यासाठी विवाहितेचा छळ होत असल्यास, तक्रार दाखल करता येते. सदर तक्रार पीडिता स्वतः, तिचे पालक किंवा रक्ताच्या, सोयरीकीच्या अथवा दत्तक नात्याने संबंधित व्यक्ति किंवा इतर कुणीही नातेवाईक व्यक्ती, तसेच हुंडा प्रतिबंधक अधिकारी किंवा एखादी सामाजिक संस्थादेखील पीडितेच्या वतीने तक्रार दाखल करू शकते.

**हुंडा प्रतिबंधक अधिकारी-** हुंडा प्रतिबंधक कायद्याच्या कलम ८-ब नुसार या कायद्याचे आणि हुंड्यासंबंधी तक्रारींचे कामकाज पाहण्यासाठी शासनाने या विशेष अधिकाऱ्याची नेमणूक केलेली आहे.

**हुंड्यासाठी विवाहितेचा छळ झाल्यास भारतीय दंड विधांनातील कोणत्या कलामंतर्गत गुन्हा दाखल होवू शकतो?**

| गुन्ह्याचे स्वरूप | गुन्ह्याचे स्पष्टीकरण | भादवि कलमे (आयपीसी/ IPC) (दखलपात्रं व अजामीनपात्र) | शिक्षेचे स्वरूप | |
|---|---|---|---|---|
| | | | जास्तीत जास्त | कमीत कमी |
| हुंडाबळी | लग्नानंतर ७ वर्ष्याच्या आता विवाहितेचा संशयास्पद मृत्यू झाल्यास | कलम- ३०४-ब | जन्मठेप | ७वर्षे |
| आत्महत्तेस प्रवृत्तं करणे | हुंडामागणीच्या सततच्या छळाला कंटाळून विवाहितेने लग्नानंतर ७ वार्ष्याच्या आत आत्महत्या केल्यास | कलम – ३०६ | १० वर्षे | ---- |
| हुंड्यासाठी छळ किंवा हुंडा मागितला नाही तरी एकूणच क्रूर वागणूक देणे | हुंड्याची मागणी पूर्ण होण्यासाठी किंवा हुंडा न मागता इतर कोणत्याही कारणांसाठी विवाहितेच्या जीवाला धोका निर्माण होईल किंवा तिला आत्महत्या करणे भाग होईल अशी हेतूपुरस्सर वागणूक दिल्यास | कलम- ४९८-अ | ३ वर्षे | ----- |
| विवाहितेचे स्त्रिधन हडपणे | विवाहितेच्या कोणत्याही प्रकारच्या वस्तु, दागिने, कपडे, संपत्ति लुबाडणे व तिने मागितल्यास तिला परत न करणे. | कलम – ४०६ | ३ वर्षे | |

**पतीने पत्नीशी जबरदस्तीने शरीरसंबंध ठेवणे ४९८-अ नुसार गुन्हा ठरतो का?**

-होय! पत्नीशी कोणत्याही प्रकारे जबरदस्तीने शरीरसंबंध ठेवणे ज्यामुळे तिच्या शारीरिक मानसिक आरोग्यास धोका निर्माण होवू शकतो अशी कृती करणे गुन्हा आहे.

**पतीपासून पत्नी विभक्त विभक्त राहत असताना पतीने पत्नीशी शरीरसंबंध ठेवणे गुन्हा आहे का?**

-होय! कोणत्याही कारणामुळे पती-पत्नी वेगळे राहत असतील किंवा त्याच्यातील वाद-विवादाची केस कोर्टात सुरू असेल, अशा परिस्थित पतीने-पत्नीशी जबरदस्तीने शारीरिक संबंध ठेवणे हा भारतीय दंड विधानाच्या कलम ३७६-बी नुसार बलात्काराचा गुन्हा ठरतो.

****************************************************

## महिलांशी निगडीत लैंगिक गुन्हे आणि संबंधित कायदे-कलमे

**प्रस्तावना**

लैंगिक अत्याचाराला गुन्हा ठरवणारी कलमे आणि त्यासाठीची शिक्षा ब्रिटीशकाळात १८६० मध्ये अस्तित्वात आली. त्यावेळी असलेली भारतीय समाजरचना आणि आजच्या सामाजिक परिस्थितीत फार मोठा बदल झालेला आढळतो. काळ आणि परिस्थितीनुरूप कायद्यामध्ये आवश्यक ते बदल करणे हे सुधृड सामाजिक व्यवस्था आणि जीवंत सरकारी यंत्रणेचे लक्षण आहे. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानंतर जुन्या कायद्यातील त्रुटी दूर करण्यासाठी भारतीय कायदे मंडळाने मार्च २००० मध्ये प्रसिद्ध केलेल्या १७२ व्या अहवालात बलात्काराची व्याख्या बदलून त्याऐवजी लैंगिक अत्याचार/आघात (sexual assault) अशी व्यापक व सर्वसमावेश व्याख्या करण्याची सुचविले होते व त्यानुसार अखेर २०१३ मध्ये 'निर्भया'[9] केसनंतर बलात्काराच्या व्याख्येत; तसेच शिक्षेमध्ये अनेक दुरुस्त्या केल्या गेल्या व बलात्कार हा शब्द वगळून त्याऐवजी 'लैंगिक' अत्याचार अशी दुरुस्ती केली गेली.

त्याचप्रमाणे, लैंगिक अत्याचारामध्ये, आता मर्जीविरुद्ध शरीरसंबंधाव्यतिरिक्त, अनैसर्गिक शरीरसंबंध; तसेच कुठल्याही वस्तुचा वापर करून केलेला संबंध इ. बाबींचा समावेश करण्यात आला आहे. त्याप्रमाणे लैंगिक अत्याचार हा केवळ जननेंद्रियांबाबत मर्यादित न ठेवता मूत्रमार्ग, गुदद्वार यासंबंधीच्या अत्याचारांचाही लैंगिक अत्याचाराच्या व्याख्येत समावेश केला आहे. दुसरा सर्वांत महत्त्वाचा बदल म्हणजे लैंगिक अत्याचाराने पीडित व्यक्तीला 'महिला' असे न संबोधता फक्त 'व्यक्ती' असे संबोधले आहे. त्याचप्रमाणे बलात्कार/लैंगिक अत्याचाराच्या गुन्ह्यांसाठी अधिक कडक शिक्षेच्या तरतुदी करण्यात आल्या आहेत.

[9] मुकेश आणि इतर वि. स्टेट फॉर एनसीटी. दिल्ली २०१७.

बलात्काराची प्रत्येक घटना ही अपवादात्मक असते. सर्वोच्च न्यायालयाने मध्य प्रदेश सरकार वि. बाबू बारकारे[10] या खटल्यातील निकालात असे स्पष्टपणे नमूद केले आहे की, जर आरोपीस वाजवीपेक्षा जास्त आस्था दाखवून गुन्ह्याच्या तीव्रतेपेक्षा कमी शिक्षा दिली, तर लोकांच्या न्यायव्यवस्थेवरचा विश्वास उडून जाईल. कारण, बलात्काराचा गुन्हा हा केवळ त्या महिलेविरुद्धच नाही संबंध समाजाविरुद्ध घडत असतो आणि त्याची कारणे आपल्या पुरुषसत्ताक समाजव्यवस्थेत दडलेली आहेत यात शंकाच नाही.

**उद्देश-**

बलात्कार असो किंवा इतर कोणत्याही लैंगिक गुन्ह्यामुळे समाजस्वास्थ्यावर विपरीत परिणाम होतो. त्यामुळे अशा क्रूर व विकृत गुन्ह्यासाठी तितकीच कठोर व इतरांवर जरब बसेल अशी शिक्षा देणे न्यायालयाचे कर्तव्यच आहे. त्यामुळे, एक सजग नागरिक म्हणून महिलांवरील लैंगिक अत्याचाराच्या गुन्ह्यविषयीचे कायद्याचे ज्ञान सर्व महिला-पुरुषांना असणे हे लैंगिक अत्याचाराच्या घटनांना आळा घालणे, घटनेविषयी न घाबरता बोलणे आणि बळी पडलेल्या महिलेला योग्य न्याय देणे आणि एक निकोप समाज निर्माण असा यामागे उद्देश आहे.

बलात्कार तसेच इतर लैंगिक गुन्ह्यांची सविस्तर माहिती आपण पुढीलप्रमाणे अभ्यासूया-

१. **बलात्कार-**

भारतीय दंड विधांनाच्या कलम ३७५ मध्ये बलात्कारासारख्या गंभीर घटनेचा सूक्ष्मपणे विचार केला गेला असून या गुन्ह्याची व्याख्या अतिशय व्यापक करण्यात आली आहे. पीडित महिलेच्या जननअंगाशी संबंधित केली गेलेली कोणतीही कृती ही बलात्काराच्या व्याख्येनुसार गुन्हा आहे. महिलेच्या इच्छेविरुद्ध, जबरदस्तीने, धमकी देवून, दबाव टाकून, भीती दाखवून, कोणत्याही प्रकारे फसवणूक करून, लग्नाचे किंवा इतर कोणतेही आमिष दाखवून,गुंगीचे औषध पाजून, ती मतिमंद/गतीमंद असल्याचा गैरफायदा घेवून तिच्याशी शरीरसंबंध ठेवणे हा बलात्काराचा गुन्हा ठरतो.

**बलात्काराचा कोणताही गुन्हा हा दखलपात्र व अजामीनपात्र गुन्हा आहे.**

**कलम ३७५** – नुसार खालीलपैकी **कोणतीही कृती** हा बलात्काराचा गुन्हा आहे.

**(अ)-** जेव्हा एखादी व्यक्ती महिलेच्या योनिमार्गात, तोंडात, मूत्रमार्गात, गुदद्वारात कोणत्याही हद्दीपर्यंत/प्रमाणात स्वतःच्या लिंगाचा प्रवेश करते किंवा त्या महिलेस त्याच्यासोबत असे करण्यास भाग पाडते किंवा त्या महिलेस इतर व्यक्तीबरोबर असे करण्यास भाग पाडते;

**(ब)-** जेव्हा एखादी व्यक्ती लिंगा व्यतीरिक्त एखादी वस्तु किंवा शरीराचा एखादा अवयव कोणत्याही हद्दीपर्यंत/प्रमाणात महिलेच्या योनिमार्गात, मूत्रमार्गात किंवा गुदद्वारात प्रवेश करवते किंवा त्या महिलेस त्याच्यासोबत असे करण्यास भाग पाडते किंवा इतर व्यक्तीबरोबर असे करण्यास भाग पाडते;

---

[10] मध्य प्रदेश सरकार वि. बाबू बारकारे (२००५) ५ एससीसी ४१३)

**(क)-** जेव्हा एखादी व्यक्ती एखाद्या महिलेच्या शरीराच्या एखाद्या भागाला / अवयवाला इजा पोहचवून इछित हालचाल घडवून आणण्यासाठी महिलेच्या योनिमार्ग, मूत्रमार्ग किंवा गुदद्वारात प्रवेश करवते किंवा तिला त्याच्यासोबत किंवा इतर व्यक्तीबरोबर असे करण्यास भाग पाडते;

**(ड)-** जेव्हा एखादी व्यक्ती महिलेच्या योनिमार्ग, मूत्रमार्ग किंवा गुदद्वारास स्वतःचे तोंड लावते किंवा तिला त्याच्यासोबत किंवा इतर व्यक्तीबरोबर असे करण्यास भाग पाडते.

**कलम ३७५ (१)**- नुसार खाली दिलेल्या सातपैकी कोणत्याही **परिस्थितीत बलात्कार झाल्यास सदर कृती ही बलात्काराचा गुन्हा आहे.**

(१) महिलेच्या इछेविरुद्ध

(२) महिलेच्या सम्मतीशिवाय

(३) जेव्हा तिला स्वतःला किंवा ज्या व्यक्तीबद्दल तिला आस्था आहे अशा कोणत्याही व्यक्तिला जीवे मारण्याचे किंवा शारीरिक इजा करण्याची भीती दाखवून महिलेची सम्मती मिळवली असल्यास;

(४) जेव्हा पुरुषाला तो एखाद्या महिलेचा पती नाही हे माहीत असतं परंतु, सदर पुरुष हा आपला कायदेशीर पतीच आहे असा तिचा समज झालेला असतो, अशा वेळी महिलेची सम्मती मिळवली असल्यास;

(५) जेव्हा एखादी महिला मनोविकलांगता, नशा किंवा गुंगीचे औषध घेतल्याने किंवा इतर कुणी दिल्याने, आपण ज्या कृतीला सम्मती देत आहोत त्याचे परिणाम समजण्यास असमर्थ असते, अशा परिस्थितीत महिलेची सम्मती मिळवली असल्यास;

(६) जेव्हा एखादी महिला अठरा वर्षापेक्षा कमी वयाची असल्यास तिची सम्मती असतांना किंवा नसतांना केली गेलेली वरीलपैकी कोणतीही कृती बलात्काराच्या कक्षेत येते.

(७) जेव्हा एखादी महिला होकार किंवा नकार देण्यास असमर्थ असते. **म्हणजे जर महिला लिंगप्रवेशाला विरोध करत नसेल याचा अर्थ सदर कृत्याला तिची सम्मती आहे असे गृहीत धरता येणार नाही.**

- **अपवाद-** वैद्यकीय उपचारांच्या कारणासाठी महिलेच्या योनि, मूत्रमार्ग किंवा गुदद्वारात केला गेलेला हस्तक्षेप बलात्कार म्हणता येणार नाही.

**<u>बलात्काराच्या गुन्ह्यासाठीची शिक्षा</u>**

**<u>कलम ३७६- हे बलात्काराच्या गुन्ह्याची शिक्षा स्पष्ट करते.</u>**

**कलम ३७६ (१)** नुसार, पोटकलम (२) मधील व्यक्ती सोडून इतर कोणत्याही व्यक्तीने बलात्कार केल्यास त्यास,

**शिक्षा- ७ वर्षापर्यंत** सश्रम कारावास किंवा जन्मठेप अधिक दंड.

**कलम ३७६ (२)** नुसार, खाली नमूद केलेल्या लोकांनी त्यांच्या अधिकाराचा वापर करून महिलेवर बलात्कार केल्यास कडक शिक्षेची तरतूद आहे.

| | |
|---|---|
| १ | पोलिस अधिकारी |
| २ | लोकसेवक |
| ३ | सशस्त्र दलातील अधिकारी किंवा सदस्यांपैकी कुणी |
| ४ | तुरुंग, सुधारगृह, महिलांची किंवा बालकांच्या संस्थेच व्यवस्थापक किंवा कर्मच्याऱ्यांपैकी कुणी |
| ५ | रुग्णालयाचे व्यवस्थापक किंवा कर्मच्याऱ्यांपैकी कुणी |
| ६ | नातेवाईक, पालक, शिक्षक या नात्याने विश्वासातील कुणी |
| ७ | जातीय व सांप्रदायिक दंगलीदरम्यान केलेला बलात्कार |
| ८ | महिला गरोदर असल्याचे माहीत असतांना केलेला बलात्कार |
| ९ | महिला सोळा वर्षाच्या आतील असल्यास |
| १० | सम्मती देण्यास अक्षम असलेल्या महिलेवरील बलात्कार |
| ११ | नियंत्रण किवा वर्चस्व किंवा प्रभावाखालील महिलेवरील बलात्कार |
| १२ | मानसिक किंवा शारीरिक दृष्ट्या अपंग असलेल्या महिलेवरील बलात्कार |
| १३ | बलात्कारादरम्यान महिलेच्या शरीरावर अशा जखमा केल्यास ज्यामुळे ती पंगु, विद्रूप किंवा तिचा मृत्यू होईल किंवा ती मरणासन्न अवस्थेत जाईल किंवा |
| 14 | एकाच महिलेवर पुन्हा-पुन्हा बलात्कार केल्यास |

**शिक्षा-** १० वर्षापर्यंत सश्रम कारावास किंवा आजीवन कारावास म्हणजे गुन्हेगाराचे नैसर्गिक आयुष्य संपेपर्यंत कारावास अधिक दंड.

**कलम ३७६ (अ)- नुसार, बलात्काराच्या गुन्ह्यांसाठी असणाऱ्या शिक्षा-**

कलम ३७६ चे पोटकलम (१) व (२) नुसार गुन्हा असलेल्या अपराधाच्या परिणांमस्वरूप महिलेचा मृत्यू किंवा मरणासन्न अवस्था झाल्यास,

**शिक्षा-** २० वर्षे किवा अपराध्याचे उर्वरित नैसर्गिक आयुष्याच्या शेवटापर्यंत सश्रम कारावास किंवा मृत्युदंड/ देहदंडाची शिक्षा अधिक दंड.

नव्याने अंतर्भूत केलेले-

**कलम ३७६ (ए बी)-** नुसार, १२ वर्षा खालील मुलीवर बलत्कार केल्यास, **शिक्षा-** कमीतकमी २० वर्षे अथवा मृत्यूपर्यंत जन्मठेप अधिक दंड किंवा मृत्युदंड.

**३७६ (ब)- विभक्त राहणाऱ्या पत्नीवर पतीने बलात्कार केल्यास शिक्षा-** घटस्फोट किंवा इतर एखाद्या कारणामुळे पतीपासून पत्नी विभक्त राहत असतांना पतीने-पत्नीशी जबरदस्तीने किंवा फसवून, आमिष दाखवून शरीर संबंध ठेवणे हादेखील बलात्काराचा गुन्हा आहे.

**शिक्षा-** २ ते ७ वर्षापर्यंत कारावास अधिक दंड.

**३७६ (क)- अधिकार पदावरील व्यक्तिने बलात्कार केल्यास शिक्षा** –

एखाद्या महिलेवर नियंत्रण किंवा वर्चस्व असलेल्यांपैकी कुणी, विश्वासाच्या नात्यातील, लोकसेवक, तुरुंग, सुधारगृह, महिलांचे किंवा बालकांच्या संस्थेच व्यवस्थापक किंवा कर्मच्याऱ्यांपैकी, किंवा रुग्णालयाचे व्यवस्थापक तसेच कर्मच्याऱ्यांपैकी कुणी बलात्कार केल्यास,

**शिक्षा- ७ ते १० वर्षापर्यंत सश्रम कारावास अधिक दंड.**

**कलम ३७६ (ड)- सामूहिक बलात्कारासाठी शिक्षा-**

एकापेक्षा जास्त लोकांनी मिळून बलात्कार करण्याच्या सामायिक उद्देशाने पीडित व्यक्तीच्या जनन अंगाशी संबधित कोणतीही कृती केल्यास गुन्ह्यात सहभागी असलेली प्रत्येक व्यक्ती सामुहिक बलात्काराच्या गुन्ह्यासाठी सारखीच दोषी आहे.

**शिक्षा-** २० वर्षे किंवा त्या अपराध्याचे उर्वरित नैसर्गिक आयुष्याच्या शेवटापर्यंत सश्रम कारावास किंवा मृत्युदंड/ देहदंडाची शिक्षा अधिक दंड.

**कलम ३७६ (ड-अ)** – नुसार, एक अथवा जास्त व्यक्तींनी मिळून १६ वर्षा खालील मुलीवर बलत्कार केल्यास,

**शिक्षा-** कमीतकमी २० वर्षे किंवा मरेपर्यंत जन्मठेप अधिक दंड.

**कलम ३७६ (ड-ब)-** या कलमानुसार एकापेक्षा अधिक व्यक्तींनी १२ वर्षा खालील मुलीवर बलत्कार केल्यास,

**शिक्षा-** कमीतकमी दंडासह २० वर्षे करावास अधिक दंड किंवा मरेपर्यंत जन्मठेप किंवा मृत्युदंड.

**कलम-३७६(ई)- अपराधाची पुनरावृत्ती करणाऱ्यास शिक्षा** –

जर एखादी व्यक्तीला कलम ३७६ किंवा ३७६ अ मध्ये दिलेल्या गुन्ह्यासाठी सिद्धं दोषी ठरवले असेल आणि त्या व्यक्तीने गुन्ह्याची पुनरावृत्ती केली असेल तर,

**शिक्षा-** आजीवन कारावास म्हणजे उर्वरित नैसर्गिक आयुष्याच्या शेवटापर्यंत सश्रम कारावास किंवा मृत्युदंडाची शिक्षा अधिक दंड.

भारतीय फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ नुसार कलम १७३ (१-अ) मधील नवीन तरतुदीनुसार, यापुढे दाखल होणाऱ्या सर्व लहान मुलांच्या बलत्काराच्या गुन्ह्यांचा तपास दोन महिन्यात पूर्ण करणे बंधनकारक आहे. तसेच यापुढे अटक केलेल्या आरोपींच्या जामीन अर्जाच्या सुनावणीच्या वेळी गुन्हा दाखल करणारा प्रथम तक्रारदार अथवा त्याने अधिकृत केलेली व्यक्ती यांनी न्यायालयात हजर राहणे बंधनकारक आहे.

**बलात्कार पीडितेला काय मार्गदर्शन करणे गरजेचे असते?**

बलात्काराच्या घटना इतक्या गुंतागुंतीच्या असतात की, अनेक कारणांमुळे बलात्कार होऊनही आरोपी निर्दोष सुटण्याची शक्यता असते. वैद्यकीय तपासणी हा बलात्काराच्या घंटनांमधील अत्यंत महत्वाचा पुरावा असतो. बरेचदा नकळतपणे असे पुरावे नष्ट होतात. त्यामुळे, बलात्काराची घटना घडली असल्यास खालील गोष्टींची काळजी घेणे अत्यावश्यक आहे. अन्यथा खटला कमकुवत होवून गुन्हेगार निर्दोष सुटण्याची शक्यता असते.

**बलात्काराची घटना घडल्यास घ्यावयाची काळजी-**

- घटनेनंतर शक्य तितक्या लवकर जवळच्या पोलिस ठाण्यात फिर्याद द्यावी.
- पीडितेने आंघोळ करू नये तसेच कपडेही बदलू नये.
- पीडितेचे कपडे, गुप्तांग, अंगावरचे डाग, इत्यादीची तपासणी होणे महत्वाचे असते. म्हणून हे सर्व स्वच्छ न करता जसेच्या तसे वैद्यकीय तपासणीसाठी द्यावे. कारण, जनुकीय तंत्रज्ञानामुळे महिलेच्या अथवा पुरुषाच्या अंगावरचे, कपडयावरचे डाग तपासून बिनतोड पुरावा प्राप्त करता येतो.
- पीडितेच्या अंगावरच्या जखमा, ओरखडे मिटवण्याचा किंवा लपवण्याचा प्रयत्न करू नये. हे सर्व तपासणीत व वैद्यकीय दाखल्यात नोंदविणे गरजेचे आहे.
- घटनेनंतर ताबडतोब वैद्यकीय तपासणी होणे गरजेचे आहे. त्यामुळे योनिमार्गात वीर्य व शुक्रपेशी आढळतात. वीर्य योनिमार्गाच्या आत अथवा बाहेर सांडण्याचा पुरावा मिळू शकतो.
- पीडितेच्या किंवा पुरूषाच्या कपडयावरचे डाग वीर्याचे आहेत याचे पुरावे मिळू शकतात.
- दोघांच्याही कपडयावरचे रक्ताचे डाग हा देखील महत्वाचा पुरावा असतात.
- घटनेमुळे पीडित महिला प्रचंड घाबरलेली असते. अशावेळी ती जखमी असेल किंवा बोलण्याच्या मनस्थितीत नसेल तर फिर्याद देण्यासाठी तिला प्रत्यक्ष पोलिस ठाण्यात जाण्याची आवश्यकता नसते. कायद्याने तिच्या वतीने

तिचे नातेवाईक, मैत्र-मैत्रीण, सामाजिक कार्यकर्ता किंवा इतर कुणीही फिर्याद देवू शकतात. पीडितेचा जबाब महिला पोलिस अधिकारी  तिला योग्य वाटेल अशा ठिकाणी नंतर नोंदवू शकतात.

- पोलिस पीडितेने पोलिस ठाण्यात येण्याबाबत आग्रही असल्यास त्यांना या तरतुदीबाबत स्पष्ट सांगावे.

- वैद्यकीय तपासणी, फिर्याद, जाब-जबानी घेतांना पीडितेसोबत तिच्या जवळची व्यक्ती असावी.
- फिर्याद नोदवितांना घटनेचे ठिकाण, वेळ, आरोपी ओळखीतला असल्यास त्याची संपूर्ण माहीती, अनोळखी असल्यास त्याच्या शरीराचे चेहऱ्याचे वर्णन, त्याचे कपडे, त्याने वाहन वापरले असल्यास ते कोणते? इत्यादीची संपूर्ण माहिती देणे आरोपीस अटक करण्याच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचे आहे.

- प्रथम माहिती अहवाल (FIR) तसेच वैद्यकीय अहवालात घडलेल्या सर्व घटनांची योग्य नोंद झाली आहे की नाही हे वाचून, तपासून घेणे गरजेचे आहे.

****************************************************

## विनयभंगाचे गुन्हे त्यासाठीची शिक्षा

भारतीय दंड विधानाच्या कलम ३५४ विनयभंगाचे गुन्हे आणि त्यासाठी कायद्यात असलेली शिक्षेची तरतूद स्पष्ट करते. विनयभंगाची कोणतीही कृती ही दखलपात्र व अजामीनपात्र गुन्हा आहे.

1. **विनयभंग (**कलम ३५४ )-

एखाद्या महिलेच्या मनात लज्जा उत्पन्न होईल अशा वाईट  उद्देशाने शारीरिक जवळीक किंवा अशी कोणतीही कृती करणे आणि त्यासाठी बळाचा वापर करणे व पिडीतेस शारीरिक किंवा मानसिक त्रास होईल असे वागणे म्हणजे वियनयभंग करणे होय. यामध्ये पिडीतेकडे एकटक बघणे, वाईट नजरेने बघणे, तिला उद्देशून अश्लील शेरेबाजी करणे, गाणी म्हणणे, शिट्टी वाजवणे इ. कृतींचा समावेश होतो.

**शिक्षा-** ३ ते ५  वर्षाची कैद, दंड किंवा दोन्ही.

**गुन्हा -**दखलपात्र व अजामीनपात्र

२. **लैंगिक शोषण (**कलम ३५४- अ)**-**

यामध्ये वाईट हेतूने महिलेच्या शरीरास स्पर्श करणे, शरीर-संबंधाची मागणी करणे, तिच्या इछेविरुद्ध अश्लील चित्रं तसेच साहित्य दाखवणे, अश्लील टीका करणे, छेडछाड किंवा **लैंगिक** विषयाशी संबंधित शब्दप्रयोग करणे इत्यादि कृतींचा समावेश होतो.

**शिक्षा- १ ते** ३ वर्षापर्यंत कैद, दंड किंवा दोन्ही.
गुन्हा- दखलपात्र व जामीनपात्र

**३. महिलेला नग्न करणे (**३५४- ब**)-**
महिलेस नग्न करण्याच्या उद्देशाने तिच्यावर हल्ला करणे किंवा बळाचा वापर करणे.
**शिक्षा-** कमीत कमी ३ ते जास्तीत जास्त ७ वर्षाची कैद, दंड किंवा दोन्ही.
गुन्हा- दखलपात्र व अजामीनपात्र

**४. चोरून बघणे (**३५४-क**)-**
एखादी महिला आंघोळ, कपडे बदलणे, संडासला जाणे अशा कोणत्याही प्रकारची खाजगी कृती करत असतांना तिच्या परवानगी शिवाय तिला चोरून बघणे, तिचे फोटो काढणे, चित्रण करणे तसेच ते फोटो किंवा चित्रण दुसऱ्याला देणे किंवा सार्वजनिक करणे.
**शिक्षा-** प्रथम गुन्ह्यासाठी कमीत कमी १ ते ३ वर्षापर्यंत कैद अधिक दंड तसेच दुसऱ्यांदा किंवा त्यापेक्षा जास्त वेळा गुन्हा सिद्धं झाल्यास ७ वर्षाचा कारावास अधिक दंड किंवा दोन्ही.
**प्रथम गुन्हा दखलपात्र व जामीनपात्र.**
**द्वितीय गुन्हा दखलपात्र व अजामीनपात्र**

५.**पाठलाग करणे (**३५४-ड) – एखाद्या महिलेने स्पष्टपणे नकार दिल्यावरही जर एखादी व्यक्ती तिच्या कळत-नकळत तिचा मागोवा घेत असेल, जाणीवपूर्वक तिच्याशी संपर्क करण्याचा, तिच्याशी वैयक्तिक संभाषण करण्याचा वेळोवेळी प्रयत्न करत असेल, किंवा फेसबुक, व्हाट्स एप, इ-मेल द्वारे सतत तिचा पाठलाग करत असेल ती व्यक्ति गुन्हेगार ठरते.
**शिक्षा-** कमीत कमी ३ ते जास्तीत जास्त ५ वर्षा पर्यंत शिक्षा, दंड किंवा दोन्ही.
**प्रथम गुन्हा दखलपात्र व जामीनपात्र.**
**द्वितीय गुन्हा दखलपात्र व अजामीनपात्र**

**विनयभंगाशी संबंधित भारतीय दंड विधानातील इतर कलमे आणि शिक्षा-**

**कलम ५०९-** महिलेचा विनयभंग करण्याच्या उद्देशाने आक्षेपार्ह शब्दोच्चार, हावभाव किंवा कृती करणे. म्हणजेच एखाद्या व्यक्तीने जर महिलेचा विनयभंग करण्याच्या उद्देशाने तिला ऐकू जाईल असा आवाज करणे किंवा शब्द उच्चारणे, लैंगिक टिप्पणी करणे तसेच एखाद्या वस्तूकडे तिने बघावे या उद्देशाने शब्दोच्चार, आवाज वा हावभाव करणे, आणि सदर वस्तु प्रदर्शित करणे आणि तिच्या एकांताचा भंग करणे गुन्हा आहे.

**शिक्षा-** ३ वर्षा पर्यंत शिक्षा, दंड किंवा दोन्ही.
गुन्हा- दखलपात्र व जामीनपात्र

**कलम ५०३-** लैंगिक सुखाच्या मागणीला एखाद्या महिलेनं दिल्यास तिच्या शारीरिक, वैयक्तिक किंवा सामाजिक प्रतिष्ठा किंवा मालमत्तेला हानी पोहचवणं किंवा तशी धमकी देणं हा देखील गुन्हा आहे.
**शिक्षा-** २ वर्षांपर्यंत तुरुंगवास, दंड किंवा दोन्ही.
गुन्हा- अदखलपात्र व जामीनपात्र

**कलम ४९९-** एखाद्या महिलेच्या फोटोशी छेडछाड करणं (फॉटोशॉप करून फोटोत बदल करणे), तिच्याविषयी आक्षेपार्ह माहिती छापणे किंवा शेअर करून बदनामी करणे आणि त्याद्वारे तिच्या प्रतिष्ठेला हानी पोचवणे हा लैंगिक छळाचा भाग आहे.
**शिक्षा-** २ वर्षांची शिक्षा, दंड किंवा दोन्हीही होऊ शकतं.
गुन्हा- अदखलपात्र व जामीनपात्र

**कलम ६७-** त्रास देण्यासाठी एखाद्या महिलेविषयी कोणत्याही प्रकारच्या आक्षेपार्ह गोष्टी किंवा माहिती सोशल प्लॅटफॉर्म/मेडियावर शेअर करणं हादेखील गुन्हा आहे. आय.टी कायद्यानुसार गुन्हा आहे.
**शिक्षा-** प्रथम गुन्हा- ३ वर्षांची कैद आणि ५ लाख दंड.
द्वितीय गुन्हा - ५ वर्षांची कैद आणि १० लाख दंड.
गुन्हा- दखलपात्र व अजामीनपात्र

**बलात्कार तसेच विनयभंगाच्या गुन्हा घडल्यास किंवा तशी शक्यता वाटल्यास बचाव करण्यासाठी महिलेने काय करावे.**?

- तत्काळ १०० नंबरवर फोन करून घटना आणि पत्ता पोलिसांना कळवावा तसेच नातेवाईकांना कळवावे.
- नजीकच्या पोलिस ठाण्यात गुन्हा (**FIR**) नोंदवावा.
- शक्य असल्यास गुन्हेगारांचा ऑडिओ किंवा व्हिडिओ काढावा.
- शारीरिक दुखापत झाली असल्यास पोलिसांच्या मदतीने ताबडतोब सरकारी दवाखान्यातून तपासणी करवून घ्यावी व सरकारी डॉक्टरांचे प्रमाणपत्र घ्यावे.
- अश्या घटनेत पीडितेचे कपडे फाटले असल्यास ते पुरावा म्हणून महिला पोलिसांच्या ताब्यात द्यावेत.

- तक्रार नोंदवत असतांना तुम्हाला समजणाऱ्या भाषेत तक्रार नोंदविली जातेय, याची खात्री करून घ्या. हा तुमचा हक्कं आहे.
- कायद्यानुसार, एखाद्या महिलेनं लैंगिक छळाची तक्रार दाखल केल्यानंतर ९० दिवसांच्या आता त्याची चौकशी पूर्ण होणं बंधनकारक आहे.
- न घाबरता, कुणाच्याही दबावाला बळी न पडता लैंगिक छळाची तक्रार करणं आवश्यक आहे.
- महिलांशी संबंधित लैंगिक अत्याचाराच्या घटनेबाबत पीडित व्यक्ती व्यतिरिक बघणाऱ्यांपैकी कोणत्याही महिला-पुरुषाने पोलिसांना खबर देणे हे त्यांचे कर्तव्य आहे, कारण अश्या घटना कोणाहीसोबत, कधीही, आणि कुठेही घडू शकतात.

**माहलांशी संबंधित गुंह्यांचा संक्षिप्त तक्ता**

| **गुन्ह्याचे स्वरूप** | **भारतीय दंड विधांनातील कलम (IPC)** | **दखलपात्र/ अदखलपात्र** | **जामीनपात्र/ अजामीनपात्र** | **शिक्षा + दंड** | **न्यायालय/कोर्ट** |
|---|---|---|---|---|---|
| बलात्कार पीडित महिलेची ओळख देणारी माहिती छापणे | २२८ अ | दखलपात्र | अजामीनपात्र | २ वर्षे + दंड | प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी |
| हुंड्यासाठी महिलेचा शारीरिक व मानसिक छळ करणे | ४९८ अ | दखलपात्र | अजामीनपात्र | ३ वर्षे + दंड किंवा दोन्ही | प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी |
| हुंडाबळी- लग्नानंतर ७ वर्षाच्या आता विवाहितेचा संशयास्पद आणि अनैसर्गिक मृत्यू झाल्यास | ३०४-ब (हुंडाबळी प्रतिबंधक कायदा,१९६१) | दखलपात्र | अजामीनपात्र | कमीत कमी ७ वर्षे कैद किंवा जन्मठेप | सत्र न्यायालय (सेशन कोर्ट ) |
| महिलेच्या संमतीशिवाय गर्भपात करविणे | ३१३ | दखलपात्र | अजामीनपात्र | जन्मठेप किंवा 10 वर्ष कैद + दंड किंवा दोन्ही | सत्र न्यायालय |
| महिलेच्या संमतीशिवाय गर्भपात केल्यास व त्यात तिचा मृत्यू झाल्यास | ३२३ | अदखलपात्र | जामीनपात्र | १ वर्ष + १०००रु. दंड किंवा दोन्ही | प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी |
| गर्भलिंग चाचणी कायद्यातील कोणत्याही तरतुदींचे उल्लंघन केल्यास | - | दखलपात्र | अजामीनपात्र | प्रथम गुन्हा- ३ वर्षे + १००००दंड किंवा दोन्ही<br><br>द्वितीय गुन्हा- ५ वर्षे + १ लखापर्यंत दंड किंवा दोन्ही | प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी |
| पत्नीला मारहाण किंवा गंभीर जखमा | ३२५ | दखलपात्र | जामीनपात्र | ७ वर्षे + दंड | प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी |
| बेकायदेशीररित्या डांबून ठेवणे | ३४२ | दखलपात्र | जामीनपात्र | १ वर्ष + १०००रु. दंड किंवा दोन्ही | प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी |
| १० किंवा त्यापेक्षा जास्त दिवस बेकायदेशीररित्या | ३४४ | दखलपात्र | जामीनपात्र | ३ वर्षे + दंड | प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| डांबून ठेवणे | | | | | |
| बळाचा वापर करून महिलेचा विनयभंग करणे | ३५४ | दखलपात्र | अजामीनपात्र | ३ ते ५ वर्षे +दंड किंवा दोन्ही | प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी |
| महिलेच्या शरीरास स्पर्श, लैंगिक संबंधाची मागणी किंवा अश्लील साहित्य दाखवणे करून | ३५४ अ | दखलपात्र | जामीनपात्र | १ ते ३ वर्षे + दंड किंवा दोन्ही | प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी |
| बळाचा वापर करून महिलेस नग्न करणे | ३५४ ब | दखलपात्र | अजामीनपात्र | ३ ते ७ वर्षे + दंड किंवा दोन्ही | प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी |
| महिला आंघोळ, कपडे बदलणे, संडासला जातांना चोरून बघणे त्याचे फोटो काढणे व इतरांना पाठवणे | ३५४ क | दखलपात्र | प्रथम गुन्हा – जामीनपात्र;<br><br>गुन्हा परत केल्यास – अजामीनपात्र | १ ते ३ वर्षे = दंड किंवा दोन्ही<br><br>३ ते ७ वर्षे + दंड किंवा दोन्ही | प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी |
| महिलेशी फोन, व्हाट्स अप, फेसबुक, ई-मेल, द्वारे सतत संपर्क करण्याचा प्रयत्न करणे व त्याद्वारे पाठलाग करे | ३५४ ड | दखलपात्र | प्रथम गुन्हा – जामीनपात्र;<br><br>गुन्हा परत केल्यास – अजामीनपात्र | ३ ते ५ वर्षापर्यंत + दंड किंवा दोन्ही | प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी |
| महिलेचा विनयभंग करण्याच्या उद्देशाने तिला ऐकू जाईल असे अश्लील शब्दोच्चार , लैंगिक टिप्पणी किंवा हावभाव करणे | ५०९ | दखलपात्र | जामीनपात्र | ३ वर्षे + दंड किंवा दोन्ही | प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी |
| शरीर संबंधाच्या मागणीस महिलेने नाकर दिल्यास तिच्या वैयक्तिक सामाजिक प्रतिष्ठेस तसेच मालमत्तेचे नुकसान करणे किंवा तशी धमकी देणे | ५०३ | अदखलपात्र | जामीनपात्र | २ वर्षे + दंड किंवा दोन्ही | |
| महिलच्या फोटोत बदल करून, माहिती छापून इतरांशी शेअर करून बदनामी करणे | ४९९ | दखलपात्र | जामीनपात्र | २ वर्षे + दंड किंवा दोन्ही | प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी |
| महिलेची आक्षेपार्ह माहिती सोशल मेडियावर पसरविणे | ६७ (माहिती व तंत्रज्ञान कायदा- आय.टी ॲक्ट,२०००) | दखलपात्र | अजामीनपात्र | प्रथम गुन्हा- ३ वर्षे = ५ लाख दंड<br>द्वितीय गुन्हा- ५ वर्षे + १० लाख दंड | |
| सार्वजनिक ठिकाणी महिलेकडे पाहून अश्लील हावभाव किंवा हातवारे करणे | २९४ | दखलपात्र | जामीनपात्र | ३ महीने + दंड | प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी |
| अपहरण | ३६३ | दखलपात्र | जामीनपात्र | ७ वर्षे + दंड किंवा दोन्ही | प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी |
| खून करण्याच्या किंवा होईल या उद्देशाने अपहरण करणे | ३६४ | दखलपात्र | अजामीनपात्र | १० वर्षे + दंड किंवा जन्मठेप. | सत्र न्यायालय |
| अल्पवयीन मुलीचे अनैतिक कृत्य करण्यासाठी अपहरण करणे | ३६६ अ | दखलपात्र | अजामीनपात्र | १० वर्षे + दंड किंवा दोन्ही | सत्र न्यायालय |
| जबरदस्तीने लग्न | | दखलपात्र | अजामीनपात्र | १० वर्षे + दंड किंवा | सत्र न्यायालय |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| लावण्यासाठी किंवा संभोग करण्यास भाग पडण्याच्या उद्देशाने पळविणे | | | | दोन्ही | |
| अल्पवयीन मुलींना चोरी करण्याच्या व्यवसायात टाकण्यासाठी पळविणे | ३६९ | दखलपात्र | अजामीनपात्र | ७ वर्षे + दंड किंवा दोन्ही | प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी |
| मुलीला किंवा महिलेस गुलाम बनविणे किंवा गैरमार्गास लावण्यासाठी पळविणे (तस्करी करणे) | ३७० | दखलपात्र | अजामीनपात्र | ७ वर्षे + दंड किंवा दोन्ही | सत्र न्यायालय |
| अल्पवयीन मुलींना वेश्याव्यवसायाठी विकणे किंवा भाड्याने देणे व त्यासाठी ताब्यात ठेवणे | ३७२ | दखलपात्र | अजामीनपात्र | १० किंवा वर्षे + दंड किंवा दोन्ही | सत्र न्यायालय |
| अल्पवयीन मुलीस वेश्याव्यवसायासाठी खरेदी करणे, भाड्याने घेणे किंवा ताब्यात ठेवणे आणि वेश्याव्यवसाय करवून घेणे | ३७३ | दखलपात्र | अजामीनपात्र | १० किंवा वर्षे + दंड किंवा दोन्ही | सत्र न्यायालय |
| बलात्कार | ३७६ | दखलपात्र | अजामीनपात्र | जन्मठेप किंवा ७ वर्षापर्यंत सश्रम कैद + दंड किंवा दोन्ही | सत्र न्यायालय |
| बलात्काराच्या परिणामामुळे महिलेची मरणासन्न अवस्था झाल्यास | ३७६ अ (पोटकलम १ व २ नुसार) | दखलपात्र | अजामीनपात्र | २० वर्षे किंवा मरेपर्यंत सश्रम कारावास किंवा फाशी | सत्र न्यायालय |
| १२ वर्षाआतील मुलीवर बलात्कार केल्यास | ३७६ (अ-ब) | दखलपात्र | अजामीनपात्र | २० वर्षे किंवा मृत्यूपर्यंत जन्मठेप + दंड किंवा मृत्युदंड | सत्र न्यायालय |
| विभक्त राहणाऱ्या पत्नीवर पतीने बलात्कार केल्यास | ३७६ ब | दखलपात्र | अजामीनपात्र | २ ते ७ वर्षापर्यंत कारावास = दंड किंवा दोन्ही | सत्र न्यायालय |
| अधिकार पदावरील व्यक्तीने त्याच्या वर्चस्वाखालील महिलेवर बलात्कार केल्यास | ३७६ क | दखलपात्र | अजामीनपात्र | ७ ते १० वर्ष सश्रम कारावास + दंड किंवा दोन्ही | सत्र न्यायालय |
| सामूहिक बलात्कार करणे | ३७६ ड | दखलपात्र | अजामीनपात्र | २० वर्षे किंवा मरेपर्यंत सश्रम कारावास किंवा फाशी | सत्र न्यायालय |
| १६ वर्षातील मुलीवर सामूहिक बलात्कार करणे | ३७६ ड-अ | दखलपात्र | अजामीनपात्र | मरेपर्यंत सश्रम कारावास + दंड किंवा फाशी | सत्र न्यायालय |
| १२ वर्षातील मुलीवर सामूहिक बलात्कार करणे | ३७६ ड-ब | दखलपात्र | अजामीनपात्र | मरेपर्यंत सश्रम कारावास + दंड किंवा फाशी | सत्र न्यायालय |
| बलात्काराच्या गुन्ह्यात दोषी असतांना पुन्हा बलात्काराचा गुन्हा करणे | ३७६ इ | दखलपात्र | अजामीनपात्र | आजीवन कारावास + दंड किंवा फाशी | सत्र न्यायालय |
| कायदेशीर पत्नी आहे असे | ४९३ | अदखलपात्र | अजामीनपात्र | १० वर्षे + दंड किंवा | प्रथमवर्ग |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| भासवून महिलेसोबत शरीर संबंध ठेवणे | | | | दोन्ही | न्यायदंडाधिकारी |
| प्रथम पत्नी हयात असतांना दुसरे लग्न करणे | ४९४ | अदखलपात्र | जामीनपात्र | ७ वर्षे + दंड किंवा दोन्ही | प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी |
| पहिले लग्न लपवून दुसरे लग्न करणे | ४९५ | अदखलपात्र | जामीनपात्र | १० वर्षे + दंड किंवा दोन्ही | प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी |
| दुसऱ्याच्या पत्नीला फूस लावून पळविणे आणि तिच्याशी शरीर संबंध ठेवणे | ४९८ | अदखलपात्र | जामीनपात्र | २ वर्षे + दंड किंवा दोन्ही | प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी |
| | | दाखलपात्र | अजामीनपात्र | | प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी |
| | | दाखलपात्र | अजामीनपात्र | | प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी |
| | | दाखलपात्र | अजामीनपात्र | | प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी |
| | | दाखलपात्र | अजामीनपात्र | | प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी |
| | | दाखलपात्र | अजामीनपात्र | | प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी |
| | | दाखलपात्र | अजामीनपात्र | | प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी |
| | | दाखलपात्र | अजामीनपात्र | | प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी |

**महिला अत्याचारांच्या घटनांबाबत पोलिसांची कर्तव्ये**

महिलांवरील अत्याचारांबाबत दाखल होणाऱ्या गुन्ह्यांचा तातडीने तपास करण्यासाठी महिला पोलिस उपायुक्त यांच्या अधिपत्याखाली ‘महिला अत्याचार प्रतिबंधक शाखा’ स्थापन करण्यात आलेली आहे. अशा प्रकारच्या घटनांचा परिपूर्ण तपास करून आरोपींविरुद्ध खटले दाखल करून महिलांवरील अत्याचार प्रतिबंधाच्या संदर्भात तसेच महिलांना सन्मानपूर्वक वागणूक देण्याबाबत खालील नियमांचे पोलिस अधिकारी व कर्माचाऱ्यांकडून पालन करणे बंधनकारक आहे.

१. महिला व मुलींच्या तक्रारींची त्वरित दखल घेवून, गुन्हा दाखल करणे, योग्य तपास करणे, आरोपीस अटक करणे आणि पुराव्यानिशी न्यायालयात जाणे.
२. चौकशी/तपासादरम्यान महिलेस प्रश्न किंवा माहिती विचारतांना तिला लज्जा वाटेल, अपमान होईल, किंवा तिच्या चारित्र्याबद्दल शंका निर्माण होईल किंवा एकूणच तिच्या प्रतिष्ठेला बाधा येईल असे प्रश्न विचारू नयेत.
३. आरोपी महिलेस अटक करते वेळी किंवा महिला साक्षीदाराची चौकशी करतांना महिला पोलिस अधिकारी किंवा कर्मचारी उपस्थित ठेवणे.
४. महिला/मुलींना सूर्योदयापूर्वी व सूर्यास्तानंतर अटक करता येत नाही. तसेच पोलिस ठाण्यात ठेवता येत नाही. मात्र अपवादात्मक परिस्थितीत असे करणे अत्यंत आवश्यक असल्यास त्यांच्या नातेवाईकांना त्यांच्या सोबत पोलीस ठाण्यात राहण्याची राहण्याची परवानगी देणे कायद्याने बंधनकारक आहे.
५. महिला आरोपींना त्यांच्या राखीव कक्षात ठेवणे किंवा तो कक्षा उपलब्ध नसल्यात अभ्यागत कक्षात ठेवणे बंधनकारक आहे. महिला आरोपींना पुरुष कक्षात ठेवता कामा नये.

## <u>नागरिकांची सनद आणि फौजदारी गुन्ह्यांची प्रक्रिया</u>

**प्रस्तावना-**

प्रत्येक नागरिकाचा काही ना काही कारणाने पोलिसांशी संबंध येत असतो. नागरीक आणि पोलिस यांच्यामध्ये असलेला  कायमस्वरूपी संबंध लक्षात घेता  दोघांमध्ये सुसंवाद असणे गरजेचे आहे. पोलिस विभागाच्या कामकाजात पारदर्शकता आणणे व जनतेस आवश्यक ती मदत व सहकार्य पोलिस विभागाकडून वेळीस उपलब्ध करून देणे हा 'नागरीकांची सनद' काढण्याचा उद्देश आहे.

कार्यालयातील सर्व अधिकारी कर्मचाऱ्यांची नावे आणि त्यांचा हुद्दा, एखादे काम किती दिवसात पूर्ण होईल? ते काम न केल्यास त्याच्या विरोधात कोणाकडे तक्रार करायची? एफआयआर दाखल करण्याची पद्धत काय? दाखल केलेल्या तक्रारीचे काय झाले? अशा गोष्टींचा नागरिकांच्या सनदमध्ये समविष्ट आहेत. पोलीस ठाण्यात येणाऱ्या नागरिकांना त्यांच्या हक्काची माहिती होण्यासाठी

नागरिकांची सनद ही प्रत्येक पोलिस ठाणे व चौकीत दर्शनी भागात लावणे आणि ती त्या विभागाच्या संकेतस्थळावर देखील टाकणे, कायद्याने बंधनकारक आहे.

**महाराष्ट्र पोलिस दलाची रचना**

**पोलिस महासंचालक**

**!**

**अतिरिक्त पोलिस महानिरीक्षक**

**!**

**पोलिस महानिरीक्षक**

**!**

**पोलिस उपमहानिरीक्षक**

**!**

**पोलिस अधिक्षक**

**!**

**पोलिस उपअधिक्षक**

**!**

**उप विभागीय पोलिस अधिकारी**

**!**

**मंडल पोलिस अधिकारी**

**!**

**वरिष्ठ पोलिस निरीक्षक**

**!**

**पोलिस निरीक्षक**

**!**

**पोलिस उपनिरीक्षक**

**!**

**गावचा पोलिस पाटील**

**!**

**हवालदार**

**!**

**पोलिस नाईक**

**!**

**शिपाई**

## नागरिकांचे अधिकार आणि पोलिसांची कर्तव्ये

केंद्रीय गृहखात्याने पोलिसांसाठी तयार केलेल्या नियमावलीनुसार, भारतीय राज्यघटनेने नागरिकांना दिलेल्या मूलभूत अधिकारांचे रक्षण करण्यासाठी प्रामाणिक आणि सर्वतोपरी प्रयत्न करून सामाजिक शांतता व सलोखा आणि कायदा व सुव्यवस्था टिकवण्यासाठी निष्ठेने काम करणे हे पोलिसांचे आद्य कर्तव्य आहे.
कोणत्याही पोलिस चौकीत किंवा पोलिस ठाण्यात, ठाणे अंमलदाराकडे किंवा त्यांच्या वरिष्ठांकडे गुन्ह्याच्या स्वरूपाची लेखी किंवा तोंडी फिर्याद देण्याचा कायदेशीर अधिकार प्रत्येक नागरिकाला आहे.

१. पोलिस ठाण्याला भेट/तक्रार देण्यास येणाऱ्या नागरिकांचे म्हणणे ऐकून घेणे, त्यावर ताबडतोब कायदेशीर कारवाई करणे, काय कारवाई केली त्याची फिर्यादिस स्पष्टा माहिती देणे हे सर्व पोलिस अधिकारी व पोलिस कर्मचारी यांचे कर्तव्य आहे.

२. दखलपात्र गुंहयाची फिर्याद दिल्यानंतर गुन्हा तत्काल दाखल करून फिर्यादिस प्रथम माहिती अहवालाची प्रत मिळणे हा फिर्यादीचा अधिकार आहे. त्याचप्रमाणे अदखलपात्र गुन्हे नोंदवही मध्ये दाखल करून त्याची फिर्यादिस प्रत देवून न्यायालयात दाद मागण्याची सूचना देणे.

३. पोलिसांना हद्दीचा वाद निर्माण करून गुन्हा दाखल करण्यासाठी टाळाटाळ करता येणार नाही. फिऱ्यादी ज्या पोलिस ठाण्यात फिर्याद देण्यासाठी जाईल त्या पोलिस ठाण्यात फिर्याद नोंदवून घेवून तपासासाठी तो संबंधित पोलिस ठाण्याकडे पाठविणे हे पोलिसांचे कर्तव्य आहे.

४. नागरीकांच्या तक्रारींचे निरसन व्हावे म्हणून ठाणे अंणमलदाराची नियुक्ती केलेली आहे. नागरिकांच्या तक्रारींचे निरसन करणे त्यांचे कर्तव्य आहे.

५. नागरिकांच्या तक्रारींचे ठाणे अंमलदाराकडून समाधान न झाल्यास किंवा पोलिस ठाण्यातील अधिकारी नोंदवून घेत नाही, अशी तक्रार असल्यास पोलिस वरिष्ठ पोलिस निरीक्षक यांच्याकडे दाद मागता येते. तसेच, विभागातील पोलिस उपायुक्त, अतिरिक्त आयुक्त यांच्याकडेही तक्रार मांडता येते.

## नागरिकांनी तक्रार कोठे नोंदवावी?

६. नागरिकांना आपली तक्रार कोणत्याही पोलिस ठाण्यात नोंदविता येते. म्हणजे ज्या हद्दीत गुन्हा घडला तेथून फिर्यादी दुसऱ्या ठिकाणी गेला असल्यास तेथील पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल करता येते. गुन्हा घडले ते ठिकाण आमच्या हद्दीत येत नाही म्हणून पोलिस फिर्याद नोंदविण्यास नकार देवू शकत नाहीत.
७. दखलपात्र गुंहयाची फिर्याद नोंदविल्यानंतर तपासासाठी तो गुन्हा संबंधित पोलिस ठाण्याकडे वर्ग केला जातो. त्याची एक प्रत फिर्यादिस विनाशुल्क देण्यात येते.
८. गुन्हा अदखलपात्र असल्यास पोलिसांना न्यायालयाच्या आदेशाशिवाय तपास करता येत नाही.

**खोटी तक्रार हा गुन्हा-**
फिर्याद दाखल करताना जाणीवपूर्वक खोटी, अवास्तव माहिती देणे, पोलिसांची दिशाभूल करणे हा भारतीय दंड संहिता १८६० नुसार गुन्हा आहे. त्यासाठी खालील शिक्षेची तरतूद आहे. त्यासाठी,
**कलम १८२ नुसार-**
**शिक्षा- ६ महीने कैद + १००० रु. दंड किंवा दोन्ही**

**कलम २११ नुसार –**
**शिक्षा- ७ वर्षे कैद + दंड किंवा दोन्ही**

## फिर्याद किंवा गुंहयाची नोंद

फौजदारी प्रकरणांमध्ये गुंहयाची फिर्याद खालील स्वरुपात केली जाते.

**१. एफ.आय.आर (प्रथम दर्शनी माहिती अहवाल)- सीआरपीसी कलम-१५४**

प्रत्येक दखलपात्र गुंहयाची प्रथम दर्शनी माहिती पोलिसांना लिखित किंवा तोंडी स्वरुपात दिली जाते. तोंडी माहिती दिली असल्यास पोलिसांना ती लिहून घ्यावी लागते. लिखित माहितीची एक प्रत माहिती देणाऱ्यास विनामूल्य द्यावी लागते.

२. **एन.सी-** अदखलपात्र गुंहयाची तक्रार म्हणजेच एनसी होय. अशा गुन्ह्याचा तपास, अटक करण्यासाठी तसेच किंवा नोंदविण्यासाठी न्यायालयाची परवानगी घ्यावी लागते.

३. **न्यायालयात खाजगी तक्रार-** फिर्यादिस वकिलामार्फत न्यायालयात तक्रार अर्जही दाखलकरता येतो.

**एफ.आय.आर (प्रथम दर्शनी माहिती अहवाल) दाखल करतांना लक्षात ठेवण्याच्या महत्वपूर्ण बाबी**

१. गुन्हा ज्या पोलिस ठाण्याच्या हद्दीत गुन्हा घडला असेल त्याच ठिकाणी शक्यतोवर नोंदवावा. काही अपरीहार्य कारणामुळे हे शक्य झाले नाही तर इतर कोणत्याही पोलिस ठाण्यात / चोकीत गुन्हा नोंदविता येतो.
२. फिर्याद शक्यतोवर लेखी स्वरूपातच द्यावी. गुन्हा जसा घडला असेल तसाच वृतांत लेखी स्वरुपात लिहावा.
३. संबंधित अधिकाऱ्याची सही शिक्का असलेली तक्रारीची एक प्रत स्वतःकडे जपून ठेवावी.
४. मारहाणीच्या गुन्ह्यामध्ये वैद्यकीय तपासणीसाठी स्थानिक पोलिस ठाण्यातून पत्र घेवून सरकारी रुग्णालयातून पीडित व्यक्तीची तपासणी करवून घ्यावी व वैद्यकीय अहवाल आणि प्रामानपत्राची एक प्रत पोलिसांना देवून एक स्वतःकडे जपून ठेवावी. ही प्रत विनामूल्य मिळते.
५. प्रथम माहिती अहवाल स्वतः नीट वाचावा किंवा विश्वासातील व्यक्तीकडून वाचून घ्यावा. वाचल्याशिवाय आणि पूर्ण समजल्याशिवाय त्यावर सही करू नये.
६. सांगितल्याप्रमाणे फिर्याद नोंदली गेली नसेल तर सही करू नये. अन्यथा त्यातील चुकांची दुरूस्ती करून प्रत्येक दुरुस्तीवर सही करावी.
७. फिर्याद देतांना संबंधित पोलिस अधिकाऱ्यांची नावे व बिल्ला क्रमांक (बॅच नंबर)याची नोंद आपयाकडे ठेवावी.
८. १५ वर्षाखालील मुलांना चौकशीसाठी पोलिस ठाणे किंवा चौकीत बोलवता येत नाही.

**झिरो एफआयआर (प्रथम माहिती अहवाल) म्हणजे काय व कुठे नोंदवता येतो**?

प्रत्येक पोलीस ठाण्याची हद्द किंवा सीमा ठरलेली असते. कोणताही अपघात किंवा गुन्हा ज्या पोलिस ठाण्याच्या हद्दीत घडला असेल त्याच पोलिस ठाण्यात एफआयआर नोंद करावा लागतो. परंतु, काही कारणांमुळे फिऱ्यादी गुन्हा घडला ठिकाण सोडून इतर ठिकाणी गेला असेल, तर त्याला तेथील पोलिस ठाण्यातही एफआयआर दाखल करता येतो. याला झिरो एफआयआर दाखल करणे असे म्हणतात. ''हा भाग आमच्या हद्दीत येत नाही. गुन्हा घडला तेथील पोलिस ठाण्यात जा'' असा सल्ला पोलिस देवू शकत नाहीत. कारण, झिरो एफआयआर दाखल करता येणे हा कायद्यानुसार हा नागरिकांचा हक्कं आहे

दिल्लीत १६ डिसेम्बर २०१२ मध्ये निर्भया बलात्कार  घटनेनंतर झिरो एफआयआरची कल्पना आली. त्यानुसार फौजदारी कायद्यात सुधारणा केली गेली. झिरो एफआयआर दाखल केल्यानंतर त्वरित पोलीस तपास सुरु होतो किंवा गुन्हा संबंधित पोलिस ठाण्याला सुपूर्द  केला जातो. पोलीस झिरो-झिरो (00...) सीरिअल नंबरने एफआयआर दाखल करतात. जर त्यांनी नकार दिला तर आपण थेट वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांकडे दाद मागू शकतो व एफआयआर नोंदवून घेण्यास नकार देणाऱ्या पोलिसावर शिस्तभंगाची कारवाई होवू शकते.

**ऑनलाइन एफआयआर-**

प्रत्यक्ष पोलिस ठाण्यात न जाता इंटरनेटच्या मदतीने ऑनलाइन एफआयआर दाखल करता येतो. ऑनलाइन एफआयआर मोबाइल किंवा कम्प्युटर च वापर करून कोणत्याही ठिकाणावरून दाखल करता येतो. परंतु त्यासाठी सक्षम इंटरनेटची सुविधा असणे गरजेचे आहे.

महिलां तसेच प्रत्यक्ष पोलिस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात काही अडचणी येत असतील ह्या सुविधेचा फायदा होवू शकतो.

यासाठी महाराष्ट्र पोलिसांच्या संकेतस्थळावर ‘ऑनलाइन प्रथम माहिती अहवाल’ या मुद्यावर क्लिक करून समोर येणाऱ्या फॉर्मवर आपली माहिती भरून लॉग इन करावे. त्यानंतर ऑनलाइन एफआयआरवर क्लिक करू गुन्ह्यासंबंधीची संपूर्ण माहिती अचूकपणे भरावी.

दखलपात्र गुंहयाची नोंद झाल्यावर पोलिस ताबडतोब तपासाला सुरुवात करतात. झडती आणि घटनेचा पंचनामा हे तपाससातील महत्वाचे टप्पे आहेत.

## झडती

दखलपात्र गुंहयाची नोंद झाल्यावर पोलिस ताबडतोब तपासाला सुरुवात करतात. झडती आणि घटनेचा पंचनामा हे तपाससातील महत्वाचे टप्पे आहेत.

१. कोणत्याही पोलिस ठाण्याचे प्रभारी अधिकारी तपासी अंमलदार यांना त्यांच्या पोलिस ठाण्याच्या हद्दीतील गुन्ह्याशी संबंधित कोणत्याही वस्तूसाठी कोणत्याही जागेची किंवा ठिकाणाची झडती घेण्याचे अधिकार आहेत.
२. झडती घेण्यापुर्वी संबंधित पोलिस अधिकारी यांनी त्यांचे ओळखपत्र दाखविणे तसेच नाव आणि हुद्दयाची पट्टी गणवेशावर लावणे आवश्यक असते.
३. झडती घेतांना दोन प्रतिष्ठित पंच, साक्षीदार असणे आवश्याक असते.
४. झडतीचे काम पूर्ण झाल्यावर, जागेवरच झडती पंचनामा तयार करून त्यात जप्त केलेल्या मालाचा तपशील नमूद करून त्यावर दोन पंच/ साक्षीदारांची व मालकाची सही घेणे गरजेचे असते. तसेच, सदर पंचनाम्याची प्रत ही त्या घरमालक किंवा संबंधित व्यक्तीस देणे आवश्य असते.
**५. महिलांची अंगझडती घेतांना महिला पोलिस अधिकारी, कर्मचारी किंवा उपलब्ध महिला नागरिकामार्फत घेणे बंधनकारक असते.**

**पंचनामा**

१. कोणत्याही घटनास्थळी, अपघातस्थळी किंवा गुन्हास्थळी अटक, झडती, जप्ती इत्यादीबाबत पंचनामा हा घटनास्थळीच तयार करून त्याच ठिकाणी दोन पंचांच्या सह्या घेणे बंधनकारक असते.
२. पंचनामा सामान्यतः दिवसा करणे आवश्यक असते परंतु आवश्यकता असल्यास रात्रीही पुरेशा प्रकाशात करता येतो.
३. पंचनाम्याची प्रत संबधित व्यक्तीने मागितली नसली तरी त्यास ती देणे बंधनकारक आहे.
४. अपघास्थळाच्या पंचनाम्याची प्रत फिर्यादिस शुल्क भरून मिळू शकते.

**अटक आणि आरोपीचे अधिकार**

फिर्याद दाखल झाल्यावर आरोपीला अटक करण्याची प्रक्रिया सुरू होते. भारतीय राज्यघनेनुसार गुंहयातील आरोपीस नागरिक म्हणून मूलभूत अधिकार आहेत. डी. के. बसू वि. पश्चिम बंगाल[11] तसेच यातील सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार पोलिसांना कारवाई करतांना खालील गोष्टींचे पालन करणे बंधनकारक आहे.

१. आरोपीला कोणत्या गुन्ह्यात अटक करण्यात आली आहे तसेच याची त्याला कलमासह माहिती देणे तसेच गुन्हा जामीनपात्र आहे किंवा नाही याचीही माहिती देणे. **(सीआरपीसी कलम-५० व ५०(२) )**

२. पोलिस अधिकारी किंवा कर्मचारी यांनी तपास करतांना आपले ओळखपत्र दाखवणे तसेच नाव, हुद्दा याची पट्टीका गणवेशावर स्पष्ट दिसेल अशी लावणे.

३. आरोपीच्या अटकेबाबत स्टेशन डायरीत नोंद करणे आणि त्याने सांगितलेल्या नातेवाईकांना कळविणे. **(सीआरपीसी-कलम ४१(ख) )**

४. अटक करते वेळी त्याच्या अंगावरील जुन्या व ताज्या जखमांची वैद्यकीय तपासणी करून त्याची नोंद घेणे.

५. आरोपी पोलिस कोठडीत असतांना त्याच्या पसंतीच्या वकिलांना आरोपीस भेटण्याची परवानगी देणे.**(सीआरपीसी-केएलएम ४१(घ)**

६. आरोपीस अटक केल्याची माहिती नियंत्रण कक्ष तसेच राज्याचे पोलिस मुख्यालयास देणे.

७. आरोपीच्या अटकेनंतर २४ तासांच्या आत त्यास संबंधित न्यायदंडाधिकारी यांचेसमोर हजर करणे. (सीआरपीसी-कलम-५७) त्यापेक्षा जास्त काळ लोटल्यास आणि समाधानकारक उत्तर नसल्यास ती

[11] डी. के. बसू वि. पश्चिम बंगाल, १९९७,१ एससीसी ४१६

गैरकायदेशीर अटक ठरते. त्यासाठी, अटकेतील नागरिक पोलिसांविरुद्ध भादंवि ३४१,३४२,३४३ अन्वये कारवाई करू शकतो. वरि पोलिसांकडे तक्रार केल्यास ते सुद्धा प्रशासकीय कारवाई करू शकतात.

८. अटक केलेली व्यक्ती जर स्वतःची अटक मान्य करीत असेल व त्याची वर्तणूक चांगली असेल आणि ती पळूण जाण्याची शक्यता नसेल तर त्याला हातकड्या घालणे किंवा दोरीने बांधणे अयोग्य आहे. **(सीआरपीसी-कलम-४९)**

९. याबाबत मा. सर्वोच न्यायालयाने आरोपीस अटक केल्यानंतर पोलिसांचे काय कर्तव्य आहेत त्याबाबत घालून दिलेल्या निर्देशांकाचे वेळोवेळी पालन करणे.

## पोलिस कोठडी (पोलीस कस्टडी रिमांड)-

अटक केलेल्या व्यक्तीची गुन्ह्याच्या तपासासाठी २४ तासापेक्षा अधिक काळ पोलिसांना आवश्यकता असेल तर पोलीस न्यायालयास आरोपीच्या पोलीस कोठडीसाठी विनंती अर्ज करू शकतात. पोलिस कोठडी केवळ दखलपात्र गुन्ह्यांसाठीच मागता येते. न्यायालय पोलीस डायरीतील नोंद, गुन्ह्याची गंभीरता, तपासाची गरज, अटकेतील व्यक्तीची प्रकृती, त्याचे चरित्र इत्यादी सर्व बाजूंचा विचार करून आरोपीस पोलिस कोठडी द्यावी की नाही हे ठरवते. पोलिस कोठडी मध्ये असलेल्या आरोपीस पोलिसांनी मारहाण केल्यास तो न्यायालयात तशी तक्रार करून वैद्यकीय तपासणीची मागणी करू शकतो.[12] वैद्यकीय अहवालावरून मारहाण झाल्याचे सिद्ध झाल्यास न्यायालय पोलिसांविरुद्ध कारवाई करू शकते. (**सीआरपीसी-कलम ५४**).

## न्यायालयीन कोठडी (मॅजिस्ट्रेट कस्टडी रिमांड)-

न्यायालयाने पोलिस कोठडी न दिल्यास न्यायालयीन कोठडी मिळते. न्यायालयीन कोठडी मध्ये असलेली व्यक्ति वैयक्तिक जामीनाचा अर्ज किंवा कॅश सेक्युरिटी किंवा मालमत्ता असणाऱ्या दुसऱ्या व्यक्तीस जामीनदार म्हणून न्यायालयापुढे आणून जामिनासाठी विनंती अर्ज करू शकते. गुन्ह्याचे स्वरूप घेऊन न्यायालय जामीन मान्य किंवा अमान्य करतं.

## जामीन

**जामीन म्हणजे काय**?

जामीन म्हणजे आरोपीकडुन न्यायालयाने किंवा पोलिसांनी न्यायालयात हजार राहावे म्हणून लिहून घेतलेली हमी. आरोपी कोठडीत असताना न्यायदंडाधिकाऱ्याकडे जामिनासाठी अर्ज करू शकतो. या अर्जाची सुनावणी न्यायदंडाधिकाऱ्याकडे होते.

---

[12] शिला बारसे वि. महाराष्ट्र सरकार एआयआर, १९८३, एससी ४१६

## जामीनाचे प्रकार

**१.रोख जामीन-** यामध्ये आरोपीला न्यायालयाने ठरवलेली रक्कम जमा करावी लागते.
**2. हमी जामीन-** यामध्ये आरोपीला हमी म्हणून एका व्यक्तिला हजार करावे लागते. ती व्यक्ति प्रतिष्ठित असणे आणि तिने आरोपीची न्यायालयाने ठरवलेल्या वेळी व दिवशी हजार राहण्याची हमी घेणे आवश्यक असते.
३. **वैयक्तिक जामीन (बॉन्ड)-** यात आरोपी स्वतः न्यायालयाने ठरवलेल्या वेळी व दिवशी हजर राहण्याची हमी देतो.
४. **तात्पुरता जामीन-** काही विशिष्ट कारणांसाठी व ठराविक कालावधीसाठी आरोपीला जो जमीन दिला जातो. न्यायालयाने ठरवलेला कालावधी संपला की आरोपीस पुन्हा ताब्यात घेतले जाते.
**5. अटकपूर्व जामीन-** प्रत्यक्ष अटक होण्यापूर्वी देण्यात येणाऱ्या जामीनास अटकपूर्व जामीन म्हणतात. अटकपूर्व जामीन मिळण्यासाठी सत्र किंवा उच्च न्यायालयात जामीन अर्ज दाखल करावा लागतो. काही बंधांनांसह न्यायालय आरोपीस जामीन देवू शकतं. उदा. न्यायालयाच्या आदेशा शिवाय आरोपीस गाव, शहर, राज्य, देश सोडून इतरत्र जाता येत नाही. अशा प्रकरणात जामीन मंजूर किंवा नामंजूर करणे पुर्णपणे न्यायालयावर अवलंबून असते.

## जामीन मिळण्यासाठी कुठे अर्ज करावा?

जमीनपात्र गुन्ह्यात आरोपीला न्यायालयात न्यायालयात अर्ज करता येतो. तसेच अजामीनपात्र गुन्ह्यातही न्यायालयात अर्ज करता येतो. परंतु, काही खटल्यांमध्ये न्यायालय जामीन मंजूर करत नाही. तसेच ज्या गुन्ह्यांमध्ये आरोपीला एका पेक्षा जास्त वेळा अटक करण्यात आली आहे किंवा ज्यांची शिक्षा ७ वर्षांपेक्षा जास्त शिक्षा, आजन्म कारावास, मृत्युदंड अशी शिक्षा आहे त्यांना न्यायालयात जामीन मिळू शकत नाही. उदा- खून, बलात्कार, दरोडा, चोरी, घरफोडी, मानव तस्करी, अपहरण इत्यादि.

**जामीन मिळण्याची प्रक्रिया काय ?**
गुन्ह्याच्या स्वरूपावरून जामीन मिळवण्याचा अर्ज कोणत्या न्यायालयात करावा हे ठरते. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांच्या न्यायालयात जामीन नामंजूर झाला तर सत्र न्यायालयात, येथे नामंजूर झाल्यास उच्च न्यायालयात आणि येथेही नामंजूर झाल्यास सर्वोच्च न्यायालयांत अर्ज करता येतो.

## गुन्ह्याचे प्रकार आणि वर्गीकरण

फौजदारी प्रक्रिया संहितेमध्ये गुन्ह्याचे वर्गीकरण दखलपात्र व जामीनपात्र तसेच जामीनपात्र आणि अजामीनपात्र असे करण्यात आले आहे

### १. दखलपात्र गुन्हा- सीआरपीसी कलम -१५४

म्हणजे गंभीर स्वरुपाचे आणि तातडीने दखल घेण्यासारखे गुन्हे होत. अशा गुन्ह्यांमध्ये पोलिसांना न्यायालयाच्या आदेशशिवाय गुन्ह्याचा तपास ताबडतोब सुरू करण्याचा व आरोपींना अटक करण्याचा अधिकार असतो अशा गुन्ह्यांची दाखल पोलिसांना घ्यावीच लागते व त्वरित तपास सुरू करावा लागतो. या गुन्ह्यात पोलिस वोरंट शिवाय

आरोपीस अटक करू शकतात. गुंहयाची नोंद एफआयआर नोंदवहीत केली जाते. उदा.- खून, बलात्कार, दरोडा, अपहरण, हुंडाबळी, विनयभंग इत्यादि गुन्हे अदखलपात्र गुन्हे आहेत.

२. **अदखलपात्र गुन्हा- सीआरपीसी कलम -१५५ (एन.सी)**

एनसी हा शब्द अदखलपात्र गुन्ह्यासाठी वापरला जातो. **अशा स्वरुपाच्या** गुन्ह्यांमध्ये पोलिस तक्रार नोंदवून घेवू शकतात परंतु, तपास करणे बंधनकारक नसते. घटनेच्या आवश्यकतेनुसार न्यायालयाच्या आदेशाने अटक किंवा तपास केला जातो.

पोलिस ठाण्यात याची वेगळी नोंदवही असते. उदा. शिवीगाळ, क्षुल्लक क्षुल्लक कारणावरून भांडणे इत्यादि.

३. **जामीनपात्र गुन्हे – सीआरपीसी- कलम ४३६**

जे गुन्हे गंभीर स्वरूपाचे नसतात किंवा जे केल्यावर पोलिस अटक करत नाहीत किंवा अटक केली तरी आरोपींना न्यायालयासमोर नेण्याची आवश्यकता नसते. जामीनदार हजर नसल्यास पोलिस अटकेतील व्यक्तीस वैयक्तिक मुचलक्यावर योग्य तो जामीन भरल्यानंतर बंधनपत्र घेऊन सोडू शकतात. पोलिस अधिकारी जामीन देत नसल्यास आरोपी किंवा त्याचे नातेवाईक संबंधित पोलिस स्टेशनच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना भेटून तक्रार करू शकतात. तसेच, न्यायालयासमोर नेले तरी न्यायालय जामीन देतं अशा गुंह्यांना जामीनास पात्र गुन्हे असे म्हणतात. अशा गुन्ह्यांमद्धे आरोपीस जामीन मिळणे हा मूलभूत अधिकार आहे.

३ वर्षापेक्षा कमी शिक्षा किंवा दंड असलेले गुन्हे जामीनपात्र गुन्हे म्हणून ओळखले जातात. उदा.

- **अजामीनपात्र गुन्हे: सीआरपीसी- कलम ४३७**

  हे गुन्हे गंभीर स्वरूपाचे असतात. अशा गुन्ह्यातील आरोपींना चोवीस तासाच्या आत न्यायालयापुढे हजर करणे पोलिसांना बंधनकारक असते. तसेच जामीन देणे किंवा नाकारणे हे सर्वस्वी न्यायालयावर अवलंबून असते. जसे, खून, खुनाचा प्रयत्न, बलात्कार, खंडणी, अपहरण, दरोडा, दरोड्यावेळी केलेला खून, पत्नीला गंभीर मारहाण करणे इ.

  तीन वर्षांपेक्षा जास्त शिक्षेचे गुन्हे अजामीनपात्र गुन्हे असतात.

४. **तडजोडपात्र गुन्हे – सीआरपीसी कलम ३२०**

अशा गुन्ह्यामद्धे पक्षकार एकमेकांच्या सहमतीने तडजोड करून खटला मागे घेतात म्हणून यास तडजोडपात्र गुन्हे म्हणतात.

उदा.-चेक बाऊन्स होणे, चोरी, फसवणूक इत्यादि

५. **अतडजोडपात्र गुन्हे – सीआरपीसी कलम ३२१**

अशा गुन्ह्यांमध्ये तडजोड करता थेट नाही. उदा. खून, बलात्कार, दरोडा, इत्यादि

**सेशन ट्रायल- सीआरपीसी- (प्रकरण १८ मधील- कलम २२५ ते२३७)**

**माजिस्ट्रेट ट्रायल-सीआरपीसी-(प्रकरण १९ मधील-कलम २३८ ते २५०) -**

गुंहयाची आणि त्यातल्या शिक्षेची गंभीरता लक्षात घेवून फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ च्या वर नमूद केलेल्या कलमांनुसार काही खटले हे सत्र न्यायालयात तसेच काही खटले हे न्यायदंडाधिकारी यांचेकडे चालवले जातात. त्याला सेशन आणि माजिस्ट्रेट ट्रायल असे म्हणतात.

**समन्स ट्रायल –सीआरपीसी- (प्रकरण २० मधील- कलम २५२-२५९)**

कलम २ (**w**) नुसार **वॉरंट** नसलेल्या केसेस म्हणजे समन्स केसेस होय. थोडक्यात, समन्स जास्त गंभीर नसलेले आणि २ वर्षांपर्यंत शिक्षा असलेले गुन्हे समन्स ट्रायल मध्ये चालतात. उदा. एखाद्या व्यक्तीचे किंवा सार्वजनिक नुकसान करण्यासाठी मालमत्तेची तोडफोड करणे.

**वॉरंट ट्रायल सीआरपीसी- (प्रकरण १९ मधील- कलम २३८ ते २५०)**

७ वर्षे किंवा त्यापेक्षा जास्त शिक्षा असलेले जन्मठेप, मृत्युदंड इ. प्रकारचे गंभीर गुन्हे **वॉरंट** ट्रायल मध्ये चालवले जातात. उदा. गंभीर मारहाण, दरोडा, खून, बलात्कार इत्यादि**.**

**समरी ट्रायल – सीआरपीसी- (प्रकरण२१मधील-कलम २६० ते २६५)**

कमीत कमी ६ महिन्याची शिक्षा असणारे लहान सहान गुन्हे लवकरात लवकर निकाली काढण्याच्या पद्धतीला समरी ट्रायल म्हणतात. उदा. दारू पिवून धिंगाणा घालणे, शिवीगाळ, क्षुल्लक वाद इ.

**फौजदारी प्रकरणातील टप्पे**

- गुंहयाची नोंद, तक्रार किंवा फिर्याद पोलिसांकडे दिली जाते.
- गुंहयाची चौकशी होते.
- आरोपीस अटक केली जाते.
- आरोपीस पोलिस कोठडी किंवा न्यायलयीन कोठडी मिळते.
- आरोपी जामीन अर्ज दाखल करतो.
- आरोपीच्या जामीन अर्जाची सुनावणी होते.
- जामीन मिळाल्यास आरोपी पोलिस किंवा न्यायलयीन कोठडीतून बाहेर येतो.
- पोलिस चौकशी पूर्ण झाल्यावर दोषारोपत्र म्हणजेच चार्जशिट दाखल केली जाते.
- न्यायालयात प्रकरण उभे राहते.
- आरोपीवर गुन्ह्याचा आरोप ठेवला जातो.
- आरोपी गुन्हा कबूल करतो किंवा करत नाही.
- गुन्हा कबूल केला नाही तर अभियोग (साक्षीदारास) समन्स काढले जातात.
- सरकारी साक्षीदाराची साक्ष घेतली जाते.

- आरोपीचे निवेदन घेतले जाते
- बचाव पक्षाच्या साक्षीदारांची साक्ष होते.
- दोन्ही पक्षांचा युक्तीवाद होतो.
- न्यायाधीश सदर प्रकरणावर अंतिम निकाल देतात.

**तक्रारींसाठी महत्वाचे दूरध्वनी क्रमांक**
पोलिस नियंत्रण कक्ष १००
राज्य महिला हेल्प लाईन १८१
ज्येष्ठांना तक्रार करण्यासाठी संपर्क क्रमांक (एल्डर लाइन) १०९०
महिला व बालकांशी संबंधित तक्रारी १०३